# ।। चालवीसी हाती धरूनिया ।।

चंद्रकांत अनंत भोसेकर

।।स्वर-संस्कार।।

Scanned by CamScanner

# चालवीसी
# हाती
# धरूनिया......

चंद्रकांत अनंत भोसेकर

।। स्वर-संस्कार ।।

Scanned by CamScanner

लेखक :
चंद्रकांत अनंत भोसेकर
यशोदा-सीताराम को. हौ. सो. लि.,पहिला मजला,
समाज मंदिर हॉलजवळ, टिळकनगर विद्यामंदिर मार्ग,
टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) ४ २ १ २ ० १
दूरध्वनी क्रमांक - ४५४३८२, ४५४४५९, ४४१९८०

प्रथमावृत्ती :
९ मे १९९७
अक्षय्य तृतीया, वैशाख, शके १९१९

अक्षरजुळणी :
सौ. सुज्ञा अ. माहिमकर
D- ३१८, श्री बाळकृष्ण सोसायटी,
गुप्ते रोड, विष्णूनगर, डोंबिवली (प.)

मुद्रक :
वेलकम प्रिंटर्स
३७, S.N.D.T. स्कूल कॉम्प्लेक्स,
कामा कॉर्नर, घाटकोपर (प.)

प्रकाशक :
स्वर-संस्कार
यशोदा-सीताराम को. हौ. सो. लि.
पहिला मजला, समाज मंदिर हॉलजवळ,
टिळकनगर विद्यामंदिर मार्ग,
टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) ४ २ १ २ ० १

(खाजगी वितरणासाठी मुद्रित व प्रकाशित )

Scanned by CamScanner

जिच्या आगमनामुळे

आमच्या घराचं नंदनवन झालं

ती माझी प्रिय सून

सौ. देवयानी धनंजय भोसेकर

हिला

सप्रेम अर्पण

--बाबा

(चंद्रकांत)

Scanned by CamScanner

# ऋणनिर्देश

१. श्री. दिवाकर अ. घैसास

२. श्री. धनंजय चं. भोसेकर

३. श्री. माधव ल. जोशी

४. श्री. विश्वास ल. जोशी

५. श्री. मोहन न. रायचूर

६. श्री. अजित न. रायचूर

७. सौ. सुज्ञा अ. माहिमकर

८. श्री. राजेंद्र वि. चिलेकर

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


प्रस्तावना ..... १

१.जीवनमूल्यांची घसरण, भ्रष्टाचार व संघर्ष..... ५

२.जीवनाचं ध्येय- ईश्वरप्राप्ती .....१७

३.गुणधर्म- ईश्वराचे व जीवाचे .....२४

४.भक्तियोग- सकाम व निष्काम .....२९

५.नवविधा भक्ति .....३४

६.नामस्मरण- प्रक्रिया .....४७

७.नामधारकाची प्रगती .....६८


Scanned by CamScanner

# प्रस्तावना

श्री.भोसेकर महाराजांच्या या अद्वितीय पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आले याला कारण माझी योग्यता हे मुळीच नसून श्री. भोसेकर महाराज जे भक्तिप्रेम वाटून टाकीत आहेत, व पात्रापात्रनिरपेक्ष अशा प्रकारचा जो प्रेमगंगौघ त्यांच्याकडून वाहत आहे, तोच कारण आहे असे वाटते. या पुस्तकाचे एका वाक्यात वर्णन करायचे तर "हा ईश्वरप्राप्तीचा संपूर्ण प्रसादमय ग्रंथ आहे" असेच म्हणता येईल. अध्यात्ममार्ग हे एकमेव सर्वोच्च शास्त्र आहे व सर्व विद्यांची अध्यात्मविद्या ही माता आहे, तेव्हा अध्यात्ममार्गाची शिकवण शास्त्रीय पद्धतीने दिली तरच ती योग्य ठरते. महाराजांचे हे पुस्तक अत्यंत शास्त्रशुद्ध लिहिलेले आहे, त्यातील विचारांची व उपदेशाची मांडणी तर्कसंगत आहे, गहन आशय सुलभ करून सांगण्याची शैली तर अभिजात आहे आणि संवादाच्या अतिशय खुसखुशीत पद्धतीमुळे मन आधीच खुशीत येऊन शब्दन् शब्द आत्मसात करीत वाचत जाते. मुक्ती व भक्ती, तर्क व परतत्व, विवेक व सौहार्द, ज्ञान, मनोबोध व मनोरंजन एवढेच काय, तर संसार आणि सार यांनी या पुस्तकात संपूर्ण परस्परसहकार्याने वाचकाला 'शहाणे करून सोडावयाचे ' म्हणजे 'मुक्त ' करावयाचे कार्य केले आहे.

व्यवहाराच्या आजच्या सर्व संदर्भातील संकल्पना, उदाहरणे, दृष्टांत आणि नेमके मर्म सांगणा-या कथा यांनी हे पुस्तक आबालवृद्ध साधकांना, भाविक-भक्तांना, जिज्ञासू पृच्छकांना व शास्त्राग्रही विचारवंतांना सारखेच स्वागतार्ह वाटणारे आहे. यातील प्रकरणांची नांवे व विषय वरवर पाहता वेगळे वाटले तरी मध्यम स्थितीतील मोक्षपथिकांच्या दृष्टीने सर्व विषय एकच आहे, तो म्हणजे निःश्रेयसाची प्राप्ती !!

पुस्तकाचा प्रारंभ वास्तवाच्या, सद्यःकालीन अवनत मूल्यांच्या परामर्शापासून होतो. वस्तुस्थिती ही अशी आहे, पण तीतून बाहेर पडून परमेश्वराच्या परमानंदमय अनुभूतीला कसे पोहोचावे याचे संपूर्ण मार्गदर्शन मग प्रत्येक पानात, प्रत्येक प्रश्नोत्तरात व शब्दाशब्दात मिळत जाते. परमपदास प्राप्त झालेल्या गुरूने अति कळवळ्याने जिज्ञासू मुमुक्षूला मदतीचा हात येथे दिलेला आहे. चिंतनाच्या पहिल्या विवेकापासून सर्वव्यापी ईश्वराशी तादात्म्य अनुभवण्याच्या पदापर्यंत यात शिष्य हा गुरूचा हात धरून चालत आहे.



Scanned by CamScanner

सर्वांत सोपी व सर्वांत कठीण असे ज्या साधनेचे वर्णन करता येईल, त्या नामसाधनेचे येथे जे स्पष्टीकरण आले आहे ते म्हणजे 'काठवटमें गंगा ' या स्वरूपाचे आहे. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे कमळाची एकेक पाकळीच उमलत जावी आणि सर्व पाकळ्या उमलल्यावर कमळ प्रफुल्ल दिसावे तसे प्रत्येक पान यात उमलत जाते ! एरव्ही कमळ उमलताना त्याच्या पाकळ्या आतून बाहेर सर्व दिशांना एकदम विकसित होतात, तर इथे जिज्ञासूच्या जाणिवेची 'कळा ' लक्षात घेऊन एकेक पाकळी उमलत जाते.

पहिल्या प्रकरणात सत्संगतीचा महिमा सांगितला आहे. तसेच सुखदुःखाचे मानसिक विश्लेषण केले आहे. संसारी माणसांच्या समस्या व त्यांचे निदान चांगले केले आहे. कोणत्याही संज्ञा संभाषणात आल्या, की त्यांची शास्त्राधारे व्याख्या करण्याचे पथ्य पाळण्यात आल्यामुळे शब्दप्रयोगातील दुर्बोधता लगेच जाते व विषय पटकन् आकलन होतो. परोपकार ही सुखाची किल्ली आहे हे तर फारच चांगले पटवून दिले आहे. दुःख किती प्रकारांनी होते व सुखही किती प्रकारांनी होते याची मांडणी, ढोबळ मानाने करुन महाराज 'मी ' नामक शिष्याला आपल्या जीवनाकडे पहायला शिकवितात. धनार्जनातील शुचिता, धनव्ययातील सूज्ञता, कर्ममीमांसा, श्रीमंतीचे पैलू, संघर्षशून्य जीवन, आपल्या विद्या, बल व द्रव्य यांचा सदुपयोग, अशा काही प्रश्नांवर यात चर्चा आहे.

ईश्वरप्राप्ती हेच जीवनाचे ध्येय आहे या सिद्धांताचा उत्तम विचार दुस-या प्रकरणात केला आहे. प्रथम ईश्वर हे तत्व काय आहे याची व्याख्या केली आहे; नास्तिकतेचा प्रश्न उपस्थित करुन, श्रध्देचे महत्त्व सांगितले आहे. ईश्वरप्राप्तीसाठी साधनेला अगदी प्राथमिक सुरूवात कशी करायची याची माहिती दिली आहे व त्यासंबंधी चिंतनही केले आहे. शरीरशुध्दी, विचारशुध्दी, कर्मशुध्दी, ज्ञानदान व प्रेमदान या साधनांचा त्यात उहापोह केला आहे.विश्वाच्या अवाढव्य अनाकलनीय विस्ताराचे गणित मांडून हे सर्व विश्व चालवणा-या ज्ञानघन शक्तीचे ऐश्वर्य मनावर बिंबविले आहे. ईश्वराचे सर्वज्ञत्व, सर्वसाक्षी सर्वव्यापित्व आणि भक्तिद्वारा त्याची अनुभूती मिळविणे यांचे प्रतिपादन चांगले केले आहे.

ईश्वराचे व जीवाचे गुणधर्म कसे काही बाबतीत समान आहेत व भिन्नही आहेत ते पुढच्या प्रकरणात दाखविले आहे. अस्ति, भाति व प्रियत्व, सत्, चित् व आनंद या जीवन-पैलूंचा उहापोह सुबोध भाषेत केला आहे आणि विकारवशतेचा त्या संदर्भात तर्कशुध्द विचार मांडला आहे. सूर्याकडे जसे अंधाराचे कर्तृत्त्व येत



Scanned by CamScanner

नाही तसेच आपल्या जीवनातील दोषविकारांचे कर्तृत्त्व परमेश्वराकडे नसते हा मुद्दा लक्षणीय आहे.

त्या पुढच्या प्रकरणात कामनासंकल्प ठेवून केली जाणारी भक्ति व निष्काम भक्ति यांचा उहापोह केला आहे. सकाम उपासनेचा तपशील व माणसांची त्यातील स्वार्थप्रेरीत सहेतूकता यांची गमतीदार उदाहरणे दिली आहेत. आर्त भक्तांच्या भूमिकेची चिकित्सा केली आहे ती मुळातूनच वाचावी.खरी भक्ती, खरा भक्तियोग व विभक्ती आणि भक्ती यांचीही चर्चा केलेली आहे. त्यापुढील म्हणजे पाचव्या प्रकरणात नवविधा भक्तीची सांगोपांग विस्तृत चर्चा केली आहे. या विषयाची माहिती दासबोध, भागवत आदि ग्रंथात व इतरही भक्तिविषयक ग्रंथात आधी काही वाचकांनी वाचली असणार, परंतू या प्रकरणातील प्रश्नोत्तरात पुष्कळ व्यवहार्य गोष्टी मनाला उमजतात.

अहंकाराचे विश्लेषण तर पुन्हा पुन्हा वाचावे असे आहे. श्रवणादि भक्ती उपासनेच्या अंगांचा विचार मांडता मांडता, ९ या अंकासंदर्भात ५ व ३ या अंकांचे धर्मशास्त्रातील महत्त्व वर्णिले आहे. एकंदरीत या प्रकरणातील विषय सर्वांना थोडा परिचयाचाच आहे. सगुण-निर्गुण भक्तीचा विचारही यात समाविष्ट आहे.

या पुस्तकातील सर्वात महत्त्वाची वाटलेली दोन प्रकरणे यानंतर आहेत. नामस्मरण प्रक्रिया व नामधारकाची प्रगती ही ती प्रकरणे आहेत. या प्रस्तावनेत त्यांचा परिचय करुन देऊ लागलो तर पृष्ठसंख्या उगाच वाढेल. ही प्रकरणे एकदम थेट वाचावीत. त्यातील अत्यंत व्यवहार्य प्रश्न व त्यांची तितकीच प्रयोगाभिमुख उत्तरे यांची प्रशंसा करण्याची इथे आवश्यकताच नाही. 'स्मरण' नामक भक्ती हाच या प्रकरणांचा आत्मा आहे. भक्ताचा दिनक्रम हा भाग तर आत्मपरीक्षण करायला लावणारा आहे. ' सर्वत्र मां पश्यति ' याचा अर्थ ह्यात समजतो. भगवंताचे चिंतन व भगवंताच्या कृपेचे अनुस्मरण कसकसे करावे ते वाचताना तुम्हाला असेच वाटेल की हे सद्गुरो, जेथे जातो तेथे तू माझा सांगाती। चालवीसी हाती धरोनिया। कारण मुलाच्या हातातील दगडी पेन्सिल त्याने कशी धरावी व अक्षर कसे गिरवावे हे दाखविताना गुरूजी त्या मुलाचा हात् आपल्या हातात धरतात व अक्षर गिरविण्यास त्याला शिकवितात तितक्या आपलेपणाने या प्रकरणात महाराज 'मी' नामक शिष्याला मुळाक्षरे शिकवित आहेत. धन्य तो शिष्य की जो 'महाराज, मी येऊ का?' असे सुरूवातीस विचारतो व धन्य ते गुरूमहाराज की जे म्हणतात- "नुसता ये असे नाही, तर चल माझा हात धरून !"



Scanned by CamScanner

या संसाररूपी अरण्यातून न चुकता बाहेर पडायची पायवाट मी तुला दाखवितो व तुला बरोबर घेऊनही जातो !

या पुस्तकाच्या वाचनानंतर आपण भगवंतालाच विचारा- "मी येऊ का ?" आपण विचारताच तो दोनावर दोन हात आणखी प्रगटवून आपल्याला दृढ आलिंगन देण्यास धावत येईल ! "मी येऊ का ?" हा प्रश्न तोच आपल्याला विचारीत असतो ! त्याला आपल्या जीवनात येऊ द्या !

दिनांक- १६.४.९७ कृष्णभक्त दिवाकर अनंत घैसास
ठाणे



Scanned by CamScanner

## प्रकरण पहिले

# जीवनमूल्यांची घसरण- भ्रष्टाचार व संघर्ष

मी :- महाराज, येऊ का ?

महाराज :- ये, ये, अरे वा ! आज अचानक कसं येणं केलंस ?

मी :- होय महाराज, तसं झालंय खरं !या संसाराच्या रगाड्यात आपल्याकडे यायला वेळच मिळाला नाही म्हणून आज वेळात वेळ काढून आलो आहे.

महाराज :- आलास ते उत्तम झालं. घरी सर्वजण आनंदात आहेत ना ?

मी :- होय महाराज. आपल्या कृपेने घरी सर्व क्षेम आहे.

महाराज :- अरे, माझी कसली कृपा म्हणतोस, त्या ईश्वराची कृपा आहे म्हण.

मी :-महाराज,ईश्वराची कृपा असली तरी ती आपल्यासारख्या थोर विभूतींच्या व संतांच्या माध्यमातूनच प्रगट होत असते, म्हणूनच सत्संगती असावी असं म्हटलं आहे.

महाराज :- वा वा ! बरंच वाचन दिसतंय की तुझं. बरं ! (गमतीनं) कुठल्या शास्त्रात हे म्हटलंय ते सांग पाहू ?

मी :- अहो महाराज ! मी सामान्य, संसारी, टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी धडपड करणारा माणूस. माझं कुठलं शास्त्राचं वाचन वगैरे व्हायला ? गणपतीच्या वेळी किंवा कीर्तनात शेवटी आरती म्हणतात तेव्हा " न लगे मुक्ती धनसंपदा ।संत संग दे गा सदा।।" असा तुकाराम महाराजांचा अभंग म्हटलेला मी ऐकला आहे. त्यावरुन सांगितलं, आणि ती संतसंगती मिळावी म्हणून मी आपल्याकडे आलो आहे.

महाराज :- अरे, पण मी संत आहे असं कोणी सांगितलं तुला ? मीही तुझ्यासारखाच संसारी माणूस आहे.

मी :- अहो महाराज,तुम्ही आमच्यापेक्षा वेगळे आहात याची मला पूर्ण खात्री आहे.

महाराज :- कशावरुन ?

मी :- कारण परवा रामनवमीला तुमचं प्रवचन ऐकण्याचा योग आला. त्यादिवशी तुम्ही परंपरागत जुन्या संस्कारांचा अर्थ आमच्यासारख्या संसारी माणसांना कळेल अशा अगदी साध्या शब्दात व सोप्या भाषेत समजावून सांगितलात.



Scanned by CamScanner

त्यावेळीच मला तुमचं वेगळेपण जाणवलं. तेव्हापासून माझ्या डोक्यात विचारांची वादळं घोंगावू लागली आहेत. त्यामुळे मला काही कळेनासंच झालं आहे.

महाराज :- तुझ्या चिमुकल्या डोक्यात एवढे कसले विचार थैमान घालत आहेत ?

मी :- महाराज, तुम्ही त्या दिवशी प्रवचनात सांगितल्याप्रमाणे मला कळायला लागल्यापासून ते आत्तापर्यंतच्या सर्व जीवनाचं मी सिंहावलोकन केलं. माझा जन्म एका सुशिक्षित व सुसंस्कारी कुटुंबात झाला. लहानपणी आईवडिलांनी माझे फालतू लाड कधीच केले नाहीत. मग माझं शिक्षण व माझ्यावर सुसंस्कार सुरू झाले. मला पदवी मिळाल्यावर मी नौकरी करू लागलो. मग माझं लग्न झालं व यथावकाश दोन मुलं झाली. प्रथम त्यांचे फाजील लाड झाले व आता त्यांचं शिक्षण सुरू झालं आहे. म्हणजे माझ्यासारखंच त्यांच्याही जीवनाचं रहाटगाडगं सुरू झालं आहे.

महाराज :- मग त्यात वाईट काय आहे ? आपल्या पूर्वजांनीसुध्दा असंच जीवन व्यतीत केलं आहे.

मी :- तसं नाही महाराज, माझ्या आईवडीलांनी माझ्यावर जे संस्कार केले त्या दृष्टीनं पाहिलं, तर आजूबाजूच्या समाजात सगळीकडे या सुसंस्कारांची पायमल्ली झालेली दिसून येते. बरं, रोजचं वर्तमानपत्र वाचलं तर सगळीकडे भ्रष्टाचार व संघर्ष बोकाळला असून सर्व समाजच भ्रष्टाचार व संघर्ष यांच्या कचाट्यात सापडलेला दिसतो. आपल्या जीवनमूल्यांची अशीच घसरण होत राहिली तर आपल्या समाजाचं काय होणार ? ही अवनती मला उघड्या डोळ्यांनी पहावत नाही. समजा उद्या आमच्याच घरात हे लोण येऊन पोहोचलं, तर मग मला बाहेर तोंड दाखवायलाच नको. मग मला जगणंच कठीण होईल. म्हणून मी आपल्याकडे आलो आहे. यावर कृपया आपण काहीतरी सांगावं.

महाराज :-(विनोदाने) पण मी सांगितलेलं खरंच तू ऐकणार आहेस का ? की "नळी फुंकिली सोनारे।इकडून तिकडे गेले वारे!"या कानाने ऐकून त्या कानाने सोडून देणार ?

मी :- (काकुळतीने) अशी शंका मनातसुध्दा आणू नका महाराज. आपण जे सांगाल ते मी अगदी जीवाचे कान करून ऐकेन.

महाराज :- बरं, तुझा प्रश्न नक्की काय आहे ?

मी :- महाराज, माणसाला भ्रष्टाचार का करावासा वाटतो व माणसा माणसांत एवढा संघर्ष का निर्माण होतो ? ते मला सोप्या भाषेत समजावून सांगा.



Scanned by CamScanner

महाराज :- जगातील सर्व समस्यांचा उगम हा भ्रष्टाचार व संघर्ष यात आहे. म्हणून तुझ्या प्रश्नाचा अगदी मुळापासून विचार करू या. त्यासाठी तुझ्यापासूनच सुरूवात करू या. तुला स्वतःला कधी भ्रष्टाचार करावासा वाटला आहे का ?

मी :- कधीच नाही.

महाराज :- मग तुला काय करावंसं वाटतं ? आत्तापर्यंतच्या तुझ्या जीवनात तुला काय हवंहवंसं वाटलं आहे ?

मी :- खरं सांगू महाराज, आपण खूप खूप जगावं असं मला वाटतं, पण त्यामुळे मरणाची नेहमी भीती वाटते. आपण खूप चैनीत रहावं आणि त्यासाठी आपल्याला खूप पैसा मिळावा असं वाटतं. त्यामुळे पैसा खर्च झाला की दुःख होतं. तसंच बायको व मुलांनी माझ्याशी नम्रतेनं वागावं व इतर लोकांनी माझी स्तुती करावी, मला नावाजावं, असंही वाटतं. पण त्यामुळे कोणी बोललं की मला फार वाईट वाटतं. पण महिन्यातून एखादाच दिवस असा येतो की त्या दिवशी हे सगळं घडतं व त्या दिवशी मी खूप आनंदात असतो.

महाराज :- (चेष्टेने) हा दिवस म्हणजे बहुतेक पगाराचा दिवस असणार.

मी :- अगदी बरोबर महाराज. त्यादिवशी इमारतीच्या गुरख्यापासून ते अगदी साक्षात् बायकोपर्यंत सर्वजण माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करतात. पण एकदा बायकोच्या हातून माझ्या पगाराचं वाटप सुरु झालं, की दुस-या दिवसापासून तेच रहाटगाडगं सुरु होतं व पुढील पगाराच्या दिवसाकडे आशाळभूतपणे पहात मी हा संसाराचा गाडा ढकलत असतो.

महाराज :-तुझ्या सांगण्यावरुन सर्वसामान्यपणे असं म्हणता येईल की आपण श्रीमंत असावं, आपल्याला लोकांनी नावाजावं, मोठं म्हणावं, स्तुती करावी, आपल्यामागेसुध्दा आपलं नांव रहावं, यासाठी माणसाची धडपड चालू असते. "येनकेन प्रकारेण प्रसिध्दो पुरुषो भवेत्।" आपण कोणीतरी विशेष असावं व आपलं वैशिष्ट्य टिकून रहावं म्हणून तो सतत प्रयत्न करत असतो. म्हणून तरुणाला सुंदर बायको हवी असते व तरुण स्त्रीला स्मार्ट व श्रीमंत पती हवा असतो. ("श्रीमंत पतीची राणी मग थाट काय हो पुसता ?"नाटक-शारदा ) तर पती-पत्नीना सुदृढ, गोंडस व निरोगी मुलं हवी असतात. तसंच मुलांना मोठेपणी आईवडीलांचा पैसा हवा असतो. शिवाय सर्वांना आपल्या मनात येईल ते घडावं असं वाटत असतं.

या इच्छा पु-या झाल्या की माणसाला सुख होतं, व न झाल्यास दुःख होतं.



Scanned by CamScanner

मी :- महाराज, आपण म्हणताय तसं होतंय खरं.

महाराज :- याचाच अर्थ असा की प्रत्येक माणसाला सुख हवंहवंसं वाटतं व दुःख अजिबात नको असतं. यालाच गोंदवलेकर महाराज "हवं-नकोपण" असं म्हणतात. थोडक्यात सांगायचं म्हणजे जास्तीत जास्त सुख जास्तीत जास्त वेळ मिळावं हेच माणसाच्या आयुष्याचं प्रयोजन किंवा ध्येय असतं व यासाठीच त्याचं जीवन व्यतीत होत असतं.

मी :- महाराज, सुखदुःख म्हणजे काय ?

महाराज :- "अनुकूल वेदनीयं सुखम्। प्रतिकूल वेदनीयं दुःखम्।" अशी सुख व दुःख या संवेदनांची व्याख्या केली आहे. "ख"म्हणजे आकाश. आपल्या मनातल्या पोकळीला चिदाकाश असं म्हणतात. हे चिदाकाश सु म्हणजे आपल्याला अनुकूल अशा संवेदनांनी व्यापलं की आपण त्याला सुख म्हणतो. त्याच्याच जोडीला ही संवेदना पुन्हा पुन्हा आपल्या मनात निर्माण व्हावी असं आपल्याला वाटू लागतं, याला आसक्ती म्हणतात. तसंच हे चिदाकाश दुर् म्हणजे प्रतिकूल अशा संवेदनांनी व्यापलं की आपल्याला दुःख होतं व ते आपल्याला नको असल्यामुळे आपण ते टाळायचा प्रयत्न करतो. याला आपण तिटकारा असं म्हणतो.

मी :- महाराज, हे सुखदुःख आपल्या मनात कशानं निर्माण होतं ?

महाराज :- आपली ज्ञानेंद्रियं व बाह्य जगातील विशिष्ट वस्तू यांचा संबंध आला की या अनुकूल किंवा प्रतिकूल संवेदना निर्माण होतात. उदा. डोळ्यांनी सुंदर दृश्य किंवा चित्रपट, टी. व्ही.चे कार्यक्रम किंवा छायाचित्र पाहणं, कानांनी मधुर संगीत ऐकणं, जिभेनं स्वादिष्ट पदार्थांची चव चाखणं, नाकाने सुवासिक वस्तूंचा गंध लुटणं व त्वचेनं मृदु व मुलायम स्पर्शाची कोवळीक अनुभवणं, या गोष्टींमुळे आपल्या मनात सुखाच्या संवेदना उमटतात. याउलट कचराकुंडीची दुर्गंधी आपल्याला असह्य होते. तर कडू औषधांचा घोट आपल्या गळयाखाली उतरत नाही. (त्याऐवजी वैद्याच्या नरडीचा घोट घ्यावासा वाटतो.) कारण या वस्तूंमुळे दुःखाच्या प्रतिकूल संवेदना उमटतात. हा सुखदुःखांचा पहिला प्रकार. या सुखदुःख देणा-या वस्तू प्रत्येक माणसाच्या बाबतीत वेगवेगळ्या असू शकतात. "पसंद अपनी अपनी." इतकंच काय ऋतूकालाप्रमाणे एकाच माणसाच्या सुखाचे विषयही बदलत जातात. म्हणून माणूस उन्हाळ्यात आईस्क्रीमचा व शीतपेयांचा आस्वाद घेतो, तर थंडीत चहाचे घुटके घेण्यात त्याला मजा वाटते.



Scanned by CamScanner

आपण एखादी गोष्ट ठरवल्यावर त्याप्रमाणे ती घडून येणं हा सुखाचा दुसरा प्रकार. याला अपेक्षापूर्तीचं सुख म्हणतात. उदा.- आपल्या घरातलं लग्न कोठलंही विघ्न न येता पार पडलं, की आपल्याला सुख होतं.

तसंच आपल्याला असं वाटतं की आपल्या सहवासात येणा-या माणसानी आपलं ऐकावं, आपल्या सांगण्याप्रमाणे वागावं, लहानांनी आपला शब्द शिरोधार्य मानावा. तसं घडलं, की आपण सुखी होतो. हा सुखाचा तिसरा प्रकार. याला आज्ञापालनाचं सुख म्हणतात.

यानंतर निरनिराळ्या कलांचा आस्वाद घेता येणं, किंवा स्वतः कलेची आराधना करणं हा सुखाचा चौथा प्रकार. याचं वैशिष्ट्य असं आहे की या कलेतील सुखाचा उपभोग आपल्याबरोबर इतर रसिकांनाही देता येतो. यामुळे कलावंताला लोकसंग्रहाचं वरदान असतं.

दुस-याचं कल्याण व्हावं म्हणून स्वतः कष्ट करण्यात सुख वाटणं, हा सुखाचा श्रेष्ठ दर्जाचा प्रकार. आपल्या प्रेमाच्या माणसांसाठीच आपण असं झिजू शकतो. "मना चंदनाचे परी त्वां झिजावे।" असं समर्थ रामदास मनाच्या श्लोकांत म्हणतात. तर एखादा आधुनिक संत "मना टोक रे पेन्सिलीचे झिजावे। तयासारिखे तू जना सूखवावे ।" असं म्हणून जाईल.

हे झालं सुखासंबंधी. दुःखाचेही शारीरिक व मानसिक असे दोन प्रकार आहेत. १) <u>शारीरिक दुःख-</u> आपल्या शरीराला वेदना झाल्या की आपल्याला शारीरिक दुःख होतं. उदा.- कापणं, खरचटणं, भाजणं, वगैरे. तसंच शरीरातील रोगजंतूंच्या प्रादुर्भावामुळे आपल्या शरीराच्या आतील भागांना वेदना होऊ लागतात. उदा.- डोकेदुखी, पोटदुखी, मानदुखी, ताप येणं, सूज येणं, वगैरे. वास्तविक या वेदनांमुळेच आपल्या शरीरात काहीतरी बिघाड आहे याची आपल्याला जाणीव होऊ शकते व आपण त्यावर योग्य तो उपचार करुन आपलं आरोग्य व स्वास्थ्य परत मिळवू शकतो. म्हणून समर्थ रामदास म्हणतात, की "देहेदुःख ते सूख मानीत जावे।"

२) <u>मानसिक दुःख-</u> मानसिक दुःखाची अनेक कारणं आहेत.

० प्रिय व्यक्तीच्या मरणाचं आणि आपणही एक दिवस असेच मरणार आहोत याचं दुःख

० दुस-याच्या शारीरिक वेदना पाहून होणारं व आपण त्या कमी करु शकत नाही याचं, तसंच आपल्या शारीरिक वेदना बंद होत नाहीत याचं दुःख.



Scanned by CamScanner

० आपल्या मालकीच्या वस्तूंच्या झालेल्या वियोगाचं दुःख. उदा.- मौल्यवान वस्तूंची चोरी किंवा धमकी देऊन झालेली लूटमार, वगैरे.

० इतर लोक आपल्या मनासारखं वागत नाहीत, म्हणून होणारं दुःख.

० आपल्या मनासारखं आपल्या जीवनात घडत नाही, याचं दुःख.

० दुस-याचं मानसिक दुःख पाहून होणारं व ते आपण कमी करु शकत नाही याचं होणारं दुःख.

हे झाले सुखदुःखांचे काही प्रकार. खरं तर सुख हे वस्तूत भरलेलं नसतंच. त्यांचा ज्ञानेंद्रियांशी संबंध आल्यावर माणसाच्या मनात सुख निर्माण होतं व हे सुख पुन्हापुन्हा मिळावं असं वाटू लागतं.

मी :- पण महाराज, यातून भ्रष्टाचार कसा काय निर्माण होतो ?

महाराज :- तेच आता थोडक्यात सांगतो. या सुखाच्या पुनरावृत्तीसाठी माणसाला वस्तूंच्या मालकीची गरज भासते. पण या वस्तूंच्या मालकीसाठी आपल्याला प्रचंड पैसा मिळवावा लागतो. उदा.- स्वतःच्या मालकीची सदनिका किंवा बंगला, त्याला साजेशी अंतर्बाह्य सजावट, विद्युत उपकरणं, इंधन-वायू (गॅस), धुलाई यंत्र, शीतकपाट (फ्रिज), करमणूकीसाठी रेडिओ, टी.व्ही., व्ही.सी.आर., आपल्यापासून लांब असलेल्या माणसांशी गप्पा मारण्यासाठी टेलिफोन, प्रवासासाठी स्कूटर, मोटार, वगैरे. या वस्तूंच्या मालकीसाठी लाखो रुपये मिळवावे लागतात. त्यासाठीं खूप काळपर्यंत प्रचंड परिश्रम करावे लागतात. आता या वस्तू तर हव्यात, त्यासाठी लागणारा पैसा हा काही आपल्याजवळ नाही. आणि तो मिळवण्यासाठी श्रम तर करायला नकोत अशी एखाद्या माणसाच्या मनाची स्थिती असेल, तर मग शक्य असल्यास भ्रष्टाचार करुन तो पैसा मिळवावा असं त्याला तीव्रतेनं वाटू लागतं. अशा वेळी जर हातात सत्ता असेल, तर तिचा अनीतीच्या मार्गानं व बेकायदेशीरपणानं दुरुपयोग करुन संपत्ती मिळवण्याचा त्याला मोह होतो. याच्या जोडीला शिक्षा करणा-या खात्यातच भ्रष्टाचार सुरु झाला, की मग त्याची भीती वाटेनाशी होते. मग पैशाच्या थैलीची तोंडं उघडली की संबंधितांच्या सहकार्यानं भ्रष्टाचाराच्या महालाची द्वारं खुली होतात.

भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट असलेला आचार. म्हणजेच अयोग्य वर्तन. म्हणून भ्रष्टाचार हा केवळ पैशाच्या बाबतीतच नव्हे तर इतर बाबतीतसुध्दा- वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय पातळीवर घडू शकतो. म्हणून प्रत्येक माणूस जर



Scanned by CamScanner

सदाचाराने वागला, तरच भ्रष्टाचाराला आपोआप आळा बसेल.

सारांश असा, की सुखदायक वस्तूंच्या मालकीची वासना मनात निर्माण झाली की त्यासाठी पैसा मिळवण्याची सक्तमजुरी माणसाला करावी लागते व त्यातल्या मजुरीचीच माजोरी हाव त्याच्या मनात निर्माण होते. पैशानं सर्व काही मिळतं, अशी माणसाची (चुकीची) समजूत होउन बसते. कारण त्याला जगात पहायला मिळतं की,

१) जोवरी पैसा। तोवरी बैसा।।

२) धनवंतालागी। सर्वमान्यता हे जगी।
मातापिता बंधुजन। सर्व मानिती वचन।।

३) सदा शृंगारभूषणे। कांता लवे बहुमाने।।

मी :- महाराज, याचा अर्थ आम्ही पैसा मिळवूच नये का ?

महाराज :- असं कोण म्हणतो ? माणसाने योग्य तेवढा पैसा नीतीच्या मार्गाने जरुर मिळवावा. तुकाराम महाराज म्हणतात,

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ।
उदास विचारे वेच करी ।।

पैसे मिळवण्याचा व्यवहार असा करावा, की त्यात पैसा आणि त्याचबरोबर तो देणारा माणूस हाही आपल्याशी कायमचा जोडला जाईल. पैसा हे आपल्याला हव्या असलेल्या वस्तू मिळवून देण्याचं फक्त साधन आहे.समाजातले व्यवहार सुरळीतपणे चालावे म्हणून माणसाच्या डोक्यातून पैसा या माध्यमाची कल्पना निघाली. पण ती कालांतराने हावरट माणसाच्या डोक्यावरच बसली आणि माणूस पैशाचा गुलाम बनला, आणि यातूनच भ्रष्टाचाराचा जन्म झाला.

मी :- महाराज, "उदास विचारे" म्हणजे काय ?

महाराज :- उदास म्हणजे दुःखी किंवा निराश असा अर्थ नाही. आपण अनेक शब्दांचे अर्थ व्यवहारात पार बदलून टाकतो. उत् म्हणजे वर किंवा पलीकडे आणि आस म्हणजे आशा किंवा आसक्ती. म्हणून उदास या शब्दाचा अर्थ आशेच्या किंवा आसक्तीच्या पलीकडे असा आहे.

अनेक वेळा असं दिसतं की, पैशाच्या संग्रहासंबंधी माणसाची आसक्ती इतकी वाढते की त्यामुळे योग्य कारणासाठी पैसा खर्च करणं त्याच्या जीवावर येतं आणि त्यामुळे दुस-याचा जीव जाण्याची वेळ येते. शिवाय भल्याबु-या



Scanned by CamScanner

मार्गाने दुस-याचं नुकसान करुनसुध्दा असा माणूस आपला संग्रह वाढवीत असतो. तर या आसक्तीच्या पलीकडे जाऊन निरासक्त मनाने योग्य कारणासाठी पैसा खर्च करावा असं महाराज सांगतात.

यावरुन एक गोष्ट आठवली. एक खूप श्रीमंत माणूस होता. इतका की त्याच्या घरात जेवताना मोठ्या वाटीत साजूक रवाळ तूप वाढत असत. एकदा त्या वाटीतल्या तुपात माशी पडली. इतरांना वाटलं, हा माणूस तूप टाकून देणार किंवा अर्ध्या जेवणातून हा उपाशी उठणार. "तुपात पडली माशी। चांदोबा राहिला उपाशी।।" हा माणूस काही चांदोबा नव्हता. हा तर गरगरीत सूर्याजी होता. म्हणून त्यानं तूप टाकून तर दिलं नाहीच, उलट त्यानं ती माशी बाहेर काढली आणि तिला पिळून पिळून तिला लागलेलं सगळं तूप त्यानं वाटीत परत मिळवलं. तूपात पडल्यावर अर्धमेली झालेली ही माशी एव्हाना पूर्ण मेली होती. तेव्हा तिच्या तेराव्याला जेवल्यासारखा हा माणूस वाटीतील सगळं तूप पिउनच उठला.

मी :- (विनोदानं) महाराज, आजच्या जगात हा माणूस कुठल्यातरी करखात्याचा प्रमुख अधिकारी किंवा एखाद्या सरकारातील अर्थमंत्री असावा.

महाराज :- असेलसुध्दा. कारण इतर लोक जरी उपाशी मरत असले, तरी अशा लोकांची श्रीमंती मात्र "हप्त्याहप्त्याने" वाढत असते. तेव्हा अशा त-हेने पैसा मिळवू नये असं तुकाराम महाराज म्हणतात.

मी :- महाराज, गरजेपेक्षा जास्त वस्तूंचा अनाठायी संग्रह करणं अयोग्य आहे हे मला आता चांगलं समजलं. आता पुढे आणखी सांगा.

महाराज :- आता इथे काय गंमत होते पहा. आपल्या ठिकाणी सुख हवं ही जी वासना असते ना, ती कधीही न संपणारी असते. कारण कितीही सुख मिळालं, तरी ती हाव संपत तर नाहीच, पण उलट ययातीने म्हटल्याप्रमाणे आगीत तेल-तूप ओतल्यावर ती अधिकच भडकते, तशी ही सुखाच्या आसक्तीची वासना अधिक तीव्रच होत जाते. आता तुझंच उदाहरण घे ना. आपली एखादी वासना संपूर्णपणे तृप्त झाली आहे म्हणून पुढील जीवनात तिची गरज नाही असं तुला कधीतरी वाटतं का ?

मी :- महाराज, नाही बुवा. आत्तापर्यंत मला असं कधीच वाटलेलं नाही.

महाराज :- होय ना. असंच सामान्य माणसाला वाटत असतं. फक्त एखादी सुख देणारी वस्तू मिळेपर्यंत आपल्याला तिची इतकी उत्कंठा वाटते की सांगून सोय नाही. पण ज्या क्षणी ती मिळते, त्या क्षणापासून तिच्यापासून मिळणा-या सुखाची

गोडी कमी कमी होऊ लागते. व त्याऐवजी एखाद्या नव्याच वस्तूचा हव्यास सुरू होतो, तिचं आकर्षण वाटू लागतं. हे आकर्षण कुठपर्यंत टिकतं ? तर ती मिळेपर्यंत. एका कवीनं म्हटलं आहे, "ये दुनिया इक अजब खिलौना है। मिल जाये तो मिट्टी है, मगर खो जाये तो सोना है।" याचा अर्थ वस्तू मिळेपर्यंत किंवा हरवल्यानंतर आपल्याला ती सोन्यासारखी वाटत असते व ती मिळाली की तिची किंमत हळुहळू कमी होऊ लागते व शेवटी ती मातीमोल होऊन बसते.

आता प्रयत्न करुनही या वस्तू मिळाल्या नाहीत, की माणसाला दुःख होऊ लागतं. व ज्याच्यामुळे या मिळू शकत नाहीत, त्याच्याविषयी द्वेष वाटू लागतो. याच्यातूनच मग इतर विकार जन्माला येतात. म्हणून माणसाच्या जीवनात दुःखाचं पारडं जड होऊन बसतं. तुकाराम महाराज म्हणतात, "सुख पाहता जवापाडे।दुःख पर्वताएवढे।।" अशा त-हेनं सुखाच्या वरदानाला दुःखाचा शाप असतो आणि दुःखाच्या शापाला काळाचा उःशाप असतो. म्हणून "कालाय तस्मै नमः" असं म्हटलं आहे.

यावरुन असं लक्षात येईल की माणसाला सतत सुख हवं असतं व काही प्रमाणात तो ते सुख वस्तूंच्या मालकीमध्ये शोधत असतो. म्हणून त्याला पैसा मिळवण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. पण हा त्याचा प्रयत्न गळक्या बादलीत पाणी भरुन ठेवण्याइतकाच निष्फळ होतो. कारण यातूनच शेवटी दुःखाची निर्मिती होत रहाते. तेव्हा बाहेरच्या जगात सुखाचा शोध घेणं हे जीवनाचं अपुरं प्रयोजन आहे.

मी :- महाराज, याचा अर्थ सुख मिळवण्यासाठी आम्ही प्रयत्न करुच नये की काय?

महाराज :- असं कोण म्हणतो ? माणसानं योग्य मार्गानं पैसा मिळवून त्यातून गरजेपुरत्या वस्तू विकत घेऊन त्यातून मिळणा-या सुखाचा उपभोग जरुर घ्यावा. पण चैनीच्या वस्तूंची हाव धरू नये. तसंच दुस-याशी भलेपणानं वागून सद्वर्तनातील सुखाचा उपभोग घ्यावा. आपल्याला एखादी कला येत असल्यास त्यातील सुखाचा उपभोग घ्यावा. इथे फक्त एक लक्षात ठेवावं की आपण जे जे कर्म करु त्याचं बरं-वाईट कसंही फळ मिळालं, तरी त्याचा शांत मनानं स्वीकार करावा.

यत्न कसून करीन मी, यश दे रामा न दे तुझी सत्ता।
हाचि सुबोध गुरूचा मानावा राम सर्वथा कर्ता।।

मी :- महाराज, कर्म मी करायचं आणि त्याचं फळ मात्र राम देणार असं मानायचं काय कारण ?

महाराज :- माणूस आपल्या जीवनात सदैव काहीतरी कर्म करीत असतो. कर्माशिवाय त्याला एक क्षणसुध्दा स्वस्थ बसवत नाही. त्याच्या प्रत्येक कर्माला काहीतरी हेतू असतो. या कर्माचे नित्य, नैमित्तिक, काम्य व निषिध्द असे चार प्रकार आहेत. नित्य म्हणजे नेहमीची. यात येतात शरीराच्या स्वच्छतेसंबंधीची कर्मं. नैमित्तिक म्हणजे काहीतरी निमित्तानं घडलेली कर्मं. यात लग्न, मुंज, बारसं, वाढदिवस वगैरेंचा समावेश होतो. काम्य म्हणजे स्वतःची कामना पुरी करावी लागण्यासाठी करावं लागणारं कर्म. उदा.- पैसा मिळवण्यासाठी नौकरी, धंदा वगैरे करणं. आणि निषिध्द म्हणजे दुस-याची व आपली हानी होईल असं कर्म. उदा.- व्यसनं, चोरी, भ्रष्टाचार वगैरे.

आता आपल्याला असं दिसतं की माणसाच्या कर्माचं फळ त्याला नेहमीच त्याच्या इच्छेला अनुकूल असं मिळत नाही. अनेक वेळा ते प्रतिकूलही असतं. याउलट आपल्याला असंही दिसतं की काही वेळा माणसाला थोड्याशा प्रयत्नानंसुध्दा भरघोस यश किंवा फळ मिळतं. हे असं का होतं यावर जेव्हा माणूस संशोधन करु लागला, तेव्हा त्याला प्रारब्धाचा शोध लागला. प्रारब्धाचा सिध्दांत हा पुनर्जन्मावर आधारित आहे. माणसाच्या काही कर्मातून त्याला पुण्य तरी मिळतं किंवा पाप तरी लागतं. "परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्।" या अनेक जन्मातल्या पाप-पुण्याच्या साठ्यातून काही पुण्य माणसाला या जन्मी अनुकूल फळ देण्यात खर्च होतं, तर प्रतिकूल फळ देण्यात काही पापाचा भोग संपून जातो. त्यामुळे प्रारब्धाचं समीकरण असं मांडता येतं.

प्रयत्न + प्रारब्ध = अनुकूल फळ (भरघोस यश)

प्रयत्न - प्रारब्ध = प्रतिकूल फळ ( कमी यश किंवा अपयश)

याचा अर्थ असा की आजच्या माझ्या यशापयशाला माझ्या प्रयत्नांच्या जोडीला माझं मागल्या जन्मातील अज्ञात पुण्य-पापही कारणीभूत असतं. हा प्रारब्धाचा नियम ईश्वरानं निर्माण केला असल्यामुळे गोंदवलेकर महाराज या कर्म-फळ प्रक्रियेला रामाची सत्ता म्हणत असावेत. कारण पाप-पुण्याप्रमाणे कर्म-फल देण्याची कामगिरी आपल्या हृदयस्थ रामाला म्हणजे देवालाच करावी लागते. गीतेतसुध्दा भगवान श्रीकृष्ण म्हणतात, की "कर्मणि एव अधिकारः ते मा फलेषु कदाचन।" म्हणजे तुझा फक्त कर्मावर अधिकार आहे, त्याच्या फळावर नाही.

म्हणून आपण निरपेक्ष बुध्दीनं आपलं कर्तव्यकर्म करावं व त्यातून जे सुख मिळेल, त्याचा रामाची कृपा म्हणून उपभोग घ्यावा. मुद्दाम सुखासाठी धापा टाकत धडपड करण्याची काही गरज नाही. कारण राम म्हणजे ईश्वर हा विश्व-



Scanned by CamScanner

चालक असल्यामुळे त्याची इच्छा होईल तेव्हाच आपल्या प्रयत्नातून आपल्याला सुखप्राप्ती होईल.

मी :- महाराज, इथपर्यंत मला चांगलं समजलं. माझा पुढचा प्रश्न. माणसामाणसांच्यात संघर्ष का निर्माण होतो ?

महाराज :- संघर्ष हा शब्द घर्षण या शब्दावरुन बनला आहे. एका गतिमान वस्तूने दुस-या स्थिर किंवा गतिमान वस्तूला स्पर्श केला की त्यातून घर्षण निर्माण होतं. वस्तूंचे चिकटलेले पृष्ठभाग जेवढे गुळगुळीत तेवढा संघर्ष कमी. माणसांच्या बावतीत हा संघर्ष अहंकाराच्या घर्षणातून निर्माण होतो.

मी :- महाराज, तो कसा काय ?

महाराज :- अहंकार म्हणजे मी काहीतरी विशेष कार्य करतो यातून आलेली स्वतःसंबंधीच्या श्रेष्ठत्वाची भावना व त्यातून उत्पन्न होणारा गर्व. प्रत्येक माणसाकडे काही गोष्टी इतरांपेक्षा जास्त असतात म्हणून त्या बाबतीत तो स्वतः:ला इतरांपेक्षा श्रेष्ठ मानतो. उदा.- काही माणसं शरीरानं बलवान असतात तर काही पैशानं श्रीमंत असतात. काही विद्येमुळे स्वतःला विद्वान समजतात तर काही अनुभवाने समृध्द असतात. या सर्व गोष्टी माणसाला विशिष्ट शक्ती प्रदान करतात. या शक्तीमुळेही त्याला आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत व त्यांचे नेते आहोत असं वाटू लागतं. यामुळे इतर माणसांवर आपण वर्चस्व गाजवावं असं त्याला वाटतं. म्हणून मग इतरांनी आपल्या मनासारखं वागावं व आपलं इतरांनी ऐकावं असा त्याचा आग्रह असतो. आता इतर माणसं तशी वागली नाहीत की याच्या श्रेष्ठत्वाच्या व वर्चस्वाच्या भावनेला धक्का बसतो. म्हणजेच याचा अहंकार दुखावतो. यातून मग स्वतःचं श्रेष्ठत्व पटवण्यासाठी माणसामाणसांत संघर्ष सुरू होतो. हा संघर्ष मग दोन कुटुंबं, दोन गट, दोन जाती, दोन धर्म व दोन राष्ट्रं असा चढत्या क्रमानं फैलावत जातो.

मी :- महाराज, हा संघर्ष कसा टाळता येईल ?

महाराज :- आपल्या अहंकाराच्या वर्चस्वाचे दुस-याला बोचणारे कंगोरे काढून टाकून सहकार्याच्या भावनेनं आपल्या मनाचे पृष्ठभाग गुळगुळीत केले की संघर्ष नाहीसा होतो. त्यामुळे जीवनाला गती मिळते व माणसाची प्रगती होते. त्यासाठी आपल्या ठिकाणी असलेल्या शक्तीचा उपयोग दुस-यावर वर्चस्व गाजवण्यासाठी न करता तो दुस-याच्या कल्याणासाठी करावा.



Scanned by CamScanner

विद्या विवादाय धनं मदाय।
खलस्य शक्तिः परपीडनाय।
साधोस्तु सर्वं विपरीतं एतत्।
ज्ञानाय दानाय च रक्षणाय।।

अर्थः- सज्जन आणि दुर्जन यांचे गुणधर्म एकमेकांच्या विरुध्द असतात. उदा.- विद्या, धन आणि बल या शक्तींचा सज्जन अनुक्रमे ज्ञान देण्यासाठी, दान करण्यात व दुस-याचं रक्षण करण्याप्रीत्यर्थ उपयोग करतो तर दुर्जन त्याच शक्तींचा दुरूपयोग अनुक्रमे वादविवाद करण्यासाठी, स्वतःच्या श्रेष्ठत्वाचा गर्व वाहण्यासाठी व दुस-याला शारीरिक पीडा देण्यासाठी करतो.

मी :- वा! महाराज, माझं अर्ध डोकं मोकळं झालं. आज इतकं पुरे, येतो मी.

महाराज :- ये बरं. पुन्हा असाच जमेल तेव्हा ये.

-----oooooo-----



Scanned by CamScanner

# प्रकरण दुसरे
# जीवनाचं ध्येय- ईश्वरप्राप्ती

मी :- महाराज, मी येऊ का ?

महाराज :- अरे ये नं. त्यात विचारायचं ते काय ?

मी :- महाराज, गेल्या वेळी आपण भ्रष्टाचार आणि संघर्ष याबद्दल विचार केला. आज मला जीवनाचं खरं व उच्चतम ध्येय कोणतं असावं याबद्दल आपले अमूल्य विचार ऐकवा व माझं डोकं शांत करा.

महाराज :- माणसाला खरं, चिरंतन व अक्षय सुख हवं असेल, तर त्यानं सुख-निधान असलेल्या ईश्वराशी एकरुप व्हायला शिकलं पाहिजे.

"सर्व सुखाचे आगर। बाप रखुमादेवीवर।।"

समर्थ रामदास म्हणतात,"जयासी वाटे सुखचि असावे। तेणे रघुनाथ भजनी लागावे।।" त्यासाठी त्याचं सतत स्मरण करणं हेच मानवी जीवनाचं अंतिम ध्येय आहे.

मी :- पण महाराज, या ध्येयाला उच्चतम ध्येय का म्हणायचं ?

महाराज :- कारण ईश्वर हे या विश्वातील उच्चतम तत्व आहे. म्हणून जीवनात काही मिळवायचंच असेल, तर अशा उच्चतम ईश्वराची प्राप्ती करुन घ्यावी. कारण याचं सुख कोणीही चोरुन नेऊ शकत नाही शिवाय रोज त्या सुखाची वाढच होत असते. ते कधीच कमी होत नाही.

"खर्चे ना कभी चोर न लिन्हे। दिन दिन बढत सवाइं।" - मीराबाई

हे सुख उपभोगणारा माणूस आतून पूर्ण शांत व तृप्त असतो व बाहेरुन तो सुखरुप व प्रेमस्वरुप झालेला असतो. अहंकार, ममत्व, वासना, ईर्षा, द्वेष, इत्यादी विकारांच्या कचाट्यातून मोकळा झाल्यामुळे तो सर्वांवर निरपेक्ष प्रेम करु शकतो. या प्रेमामुळे त्याच्या हातून इतर माणसांचं कल्याण होऊ लागतं. मग या ध्येयाला उच्चतम ध्येय म्हटलं, तर त्यात गैर ते काय आहे ?

मी :- पण ईश्वरापासून मिळणा-या सुखालाच चिरंतन का म्हणायचं ?

महाराज :- याचं कारण वस्तूपासून मिळणारं सुख चिरंतन स्वरुपाचं नसतं. तर ते वस्तू असेपर्यंतच टिकतं. वस्तू या आज आहेत तर उद्या नाहीत अशा नाशवंत स्वरुपाच्या असतात. पण ईश्वर हा अविनाशी असल्यामुळे तो नाही अशी



Scanned by CamScanner

स्थितीच असू शकत नाही. तसंच जागेपणी आपण नाही अशी अवस्थाच असू शकत नाही. म्हणून आपल्याला ईश्वरस्मरणापासून होणारं सुख हे चिरंतन स्वरुपाचं असतं.

मी :- पण महाराज, ईश्वराचं अस्तित्व मानण्याची गरजच काय आहे ?

महाराज :- ईश्वराचं अस्तित्त्व मानलं नाही, तर आपलं जीवन अहंकाराच्या तावडीत सापडतं व त्याला मानलं तर जीवनातील सर्व समस्या सुटतात. यासंबंधी तुला एक गोष्ट सांगतो.

एका श्रीमंत माणसाला तीन मुलं होती. त्याच्या गजशाळेत १७ हत्ती होते. त्यानं आपल्या मृत्यूपत्रात मोठ्या मुलाला १/२, मधल्या मुलाला १/३ व लहान मुलाला १/९ हिस्सा हत्ती द्यावेत असं नमूद केलं होतं. त्याच्या मृत्यूनंतर हे प्रकरण न्यायाधीशाकडे गेलं. तो मनात म्हणाला, "हात्तिच्या, सोपी गोष्ट आहे." त्याने स्वतःचा एक हत्ती त्यांच्यात मिसळला. आता एकूण १८ हत्ती झाले. नंतर १८ च्या १/२ म्हणजे ९, १/३ म्हणजे ६ व १/९ म्हणजे २ असे एकूण १७ हत्ती वाटले गेले. मग त्याचा स्वतःचा हत्ती त्यानं काढून घेतला. तसं ईश्वर हा १८वा हत्ती आहे. तो स्वतः परिपूर्ण असल्यामुळे तो जीवनात आला की जीवनातील अपूर्णतेचं कोडं सुटतं. असो.

या उच्चतम ध्येयाच्या प्राप्तीसाठी माणसाला काही गोष्टींपासून सुरुवात करावी लागते.

१. शरीर निरोगी व निर्व्यसनी ठेवणे.
२. मनाने चांगले विचार करणे.
३. सद्वर्तनी असणे व जमेल तितकी दुस-याला मदत करणे.
४. ज्ञान मिळवून ते इतरांना वाटणे.
५. स्वतःइतकं प्रेम दुस-यावर करणे.

मी :- महाराज, या गोष्टींची काय गरज आहे ?

महाराज :- आपलं शरीर हे ईश्वरप्राप्तीचं साधन असल्यामुळे ते कार्यक्षम व निरोगी ठेवणं हे आपलं कर्तव्य ठरतं. कारण "शरीरं आद्यम् खलु धर्मसाधनम्। "असं म्हटलं आहे. तसंच आपल्या मनाला आपल्याकडे असलेल्या वस्तूत पुरेसं सुख मिळत नसल्यामुळे जास्त सुख देणा-या वस्तूच्या मालकीच्या कल्पनांच्या मागे भरकटत जायची सवय असते. तसंच अशा निरर्थक कल्पनांची साखळी निर्माण करण्याची आपल्या मनाला सवयच लागून गेलेली असते. कारण प्रत्यक्षात न मिळणारं सुख माणूस कल्पनेतून उपभोगू शकतो. पण यात माणसाची शक्ती त्याच्या नकळत



Scanned by CamScanner

उगाचच वाया जात असते. माणसाच्या फारच थोड्या विचारांचं रुपांतर कृतीत होत असतं. म्हणून माणूस जर अनावश्यक विचार थांबवू शकला तर त्याची खूपच शक्ती वाचेल व ती सद्विचारातून निर्माण होणा-या चांगल्या कार्याकरता वापरता येईल. तसंच दुस-याच्या कल्याणासाठी आपलं शरीर झिजवलं की आपल्याला एक अपूर्व समाधान मिळतं. "एकमेकां साह्य करु। अवघे धरु सुपंथ।।" पण हे केव्हा जमेल? तर स्वतःइतकंच आपलं इतरांवर प्रेम असेल तर. तेव्हा आपल्या संपर्कात जो कोणी माणूस किंवा प्राणी येईल, त्यावर आपण आपंल्याइतकंच प्रेम करण्याचा प्रयत्न करावा. शिवाय आपण जे ज्ञान मिळवलं असेल ते इतरांना देण्याचं आपण माध्यम आहोत हे लक्षात ठेवून या ज्ञानाचं, विद्येचं व कलेचं दुस-यांना मुक्त हस्तानं आणि मोकळ्या मनानं दान करावं. आणि पुढच्या क्षणी आपण काही महान कृत्य केलं हे विसरुन जावं.

ईश्वराशी एकरुप होणं याचा अर्थ, आपण आपल्या वाट्याला आलेलं कर्तव्य त्या ईश्वराचं स्मरण करुन योग्य त-हेनं पार पाडावं आणि सहज व नैसर्गिक जीवन आनंदात जगावं. त्यात इतरांनाही आनंदी करावं. हे माझ्या दृष्टीनं जीवनाचं अत्युच्च ध्येय आहे.

मी :- महाराज, ईश्वराशी एकरुप होण्यासाठी अगोदर ईश्वर म्हणजे काय ते तर सांगा.

महाराज :- अरे, ईश्वर म्हणजे काय आहे यापेक्षा तो काय नाही ते विचार. ईश्वर म्हणजे या विश्वाला निर्माण करणारं व त्याचं नियंत्रण करणारं, त्याला अंतर्बाह्य व्यापून असलेलं, सर्वशक्तिमान असं स्वयंभू तत्त्व. या तत्त्वाचं प्रतीक म्हणून आपण निरनिराळे देव मानले आहेत. या तत्त्वाला कोणी राम म्हणतो, कोणी कृष्ण म्हणतो, कोणी शंकर म्हणतो, कोणी दुर्गादेवी तर कोणी कालीमाता म्हणून पुकारतो. याला मुसलमान अल्लाह तर ख्रिश्चन येशू म्हणतात. गंमत म्हणजे देव न मानणारा नास्तिक माणूससुध्दा याला निसर्ग असं नांव देतो.

मी :- महाराज, या देवाला "सर्वशक्तिमान" का म्हणायचं?

महाराज :- अरे, आत्तापर्यंत आपल्याला जे ज्ञान मिळालं आहे त्यावरुन असं दिसतं की वस्तूच्या अणूकेंद्रकाभोवती एका सेंटिमीटरचा एक कोट्यांश, इतक्या लहान भागात अनेक इलेक्ट्रान दर सेकंदाला हजारो किलोमीटर इतक्या प्रचंड वेगाने सतत परिभ्रमण करत असतात. अशा हजारो अणूंनी वस्तूंचा , आपल्याला



Scanned by CamScanner

डोळ्यानी जेमतेम दिसेल, इतका लहान भाग तयार होतो. म्हणजेच एका सुईच्या अग्रामध्ये लोखंडाचे हजारो अणू सामावलेले असतात. अशी १०९ मूलद्रव्यं व त्यापासून तयार झालेली हजारो संयुगं यांनी आपली पृथ्वी व तिच्याभोवतालचं वातावरण बनलं आहे. आपल्या सूर्यमालेत सूर्याभोवती आपल्या पृथ्वीसारखे ९ ग्रह फिरत असतात. आपल्या सूर्यासारखें अब्जावधी तारे आपल्या आकाशगंगेत आहेत व अशा सुमारे १०० अब्ज आकाशगंगा मानवाला आतापर्यंत सापडल्या आहेत. ही झाली निर्जीव अशा विश्वाची कथा. आता सजीव सृष्टीकडे वळूया. यात व्हायरस, अमीबा यासारखे एकपेशीय जीव, फक्त सूक्ष्मदर्शकाखाली दिसणारे अनेकपेशीय जीव, लहानसहान कीटक, छोटेछोटे प्राणी, मासे व इतर जलचर, आकाशात उडणारे डासांपासून ते गरुडापर्यंत पक्षी, लहान अळीपासून ते नामशेष झालेल्या महान डायनॅसोरपर्यंत जमिनीवरचे पशु व शेवटी आपण माणसं या सर्वांचा समावेश होतो. इतर प्राण्यांपेक्षा प्रगत असलेली बुध्दी हे माणसांचं वैशिष्ट्य. अनेक पेशी एकत्र येऊन माणसाचा एक अवयव बनतो. तर अनेक अवयव एकत्र येऊन ठराविक काम करणारी संस्था बनते. अशा अनेक संस्थांच्या सहकार्याने माणूस जिवंत राहू शकतो. उदा.- श्वसन, रुधिराभिसरण, पचन, मलोत्सर्ग, अस्थि, स्नायू, चेता, संरक्षण वगैरे संस्था हातात हात घालून गुण्यागोविंदाने काम करत असतात.

विश्व निर्माण झाल्यापासून या विश्वात सतत असंख्य घडामोडी चालू असतात. आपल्या पृथ्वीवरही नैसर्गिक ऋतुचक्र चालू असतं. त्यामुळे वस्तूंच्यामध्ये सतत बदल किंवा रुपांतर होत असतं. याच्याच जोडीला सजीव प्राण्यांच्या बाबतीत जन्म-मरणाचं रहाट-गाडगं सदैव फिरत असतं. या सर्व गोष्टी पाहिल्या की ईश्वराच्या सर्वशक्तिमानतेची जाणीव होते व मग आपोआपच "तेथे कर माझे जुळती."

मी :- महाराज, हे मला पटलं. आता पुढे सांगा.

महाराज :- ईश्वरानं निर्माण केलेल्या या सृष्टीत आपल्याला असं दिसतं की यातील प्रत्येक वस्तूला उत्पत्ती, स्थिती व लय या तीन अवस्था असतात. तसंच कुठलाही जीव हा जन्म-मरणाच्या चक्रातून सुटलेला दिसत नाही. म्हणून प्रत्येक जीवाला "अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते, क्षीयते, नश्यते "या सहा अवस्थांतून जावं लागतं.

मी :- म्हणूनच आमच्या ग.दि.मांनी "जीवासवे जन्मे मृत्यू जोड जन्मजात" असं म्हटलं आहे.



Scanned by CamScanner

महाराज :- आता तू अगदी साधा विचार कर की देवाला या अवस्था असतील का ?

मी :- का असू नयेत ?

महाराज :- समजा, तुझ्या म्हणण्याप्रमाणे या देवालाही जन्म व मृत्यू असेल, तर तो विश्वातील इतर वस्तूंप्रमाणे सांत किंवा मर्यादित आकाराचा असला पाहिजे. म्हणजेच त्याच्याहीपलीकडे काहीतरी असलं पाहिजे. मग या विश्वनिर्मात्या ईश्वराचा व पलिकडच्या "काहीतरी"चा मूळ निर्माता एकच असला पाहिजे व त्याच्या पलिकडे काही असणार नाही. म्हणजे हा मूळ निर्माता ईश्वर अनंत असला पाहिजे. तसंच या ईश्वराला जन्म व मरण असू शकणार नाही. म्हणून हा मूळ महादेव हा अजर, अमर व अनंत असला पाहिजे. पटतं की नाही ?

मी :- हो, महाराज. हा मुद्दा मला नवीनच आहे. आणखी पुढे सांगा.

महाराज :-आणखी एक गोष्ट. या विश्वातील प्रत्येक वस्तू दुस-या वस्तूच्या आधारावर असते. आता हेच पहा ना. पाण्यात बर्फ घातला की त्याला पाण्याचा आधार असतो. पाण्याला भांड्याचा आधार असतो. भांडं जमिनीवर ठेवलं आहे. जमिनीला पृथ्वीचा आधार आहे. व पृथ्वी आकाशात तरंगत असते म्हणून तिला आकाशाचा आधार आहे.

मी :- महाराज, आकाशाला कशाचा आधार आहे ?

महाराज :- आकाशाला ज्याच्या सूक्ष्म आधाराची गरज आहे, त्यालाच आम्ही देव म्हणतो. याचा आकाशाला आतूनच आधार असतो. जसा पायमोज्याला आतूनच पायाचा आधार असतो तसा.

मी :- हे मात्र आपल्या गाजलेल्या भावगीतात कविवर्य मधुकर जोशींनी सांगितलं आहे. ते म्हणतात, "जगी ज्यास कोणी नाही, त्यास देव आहे।
निराधार आभाळाचा तोच भार साहे।।"

महाराज :- म्हणजे मधुकर जोशींनी सांगितलं, म्हणून तरी तुला पटायला हरकत नाही. की सर्व सजीव व निर्जीव वस्तूंचा व आकाशाचाही अंतिम आधार देवच आहे.

मी :- महाराज, मला इथे एक प्रश्न पडतो आहे की जर सृष्टीच्या जन्मापूर्वी काहीही नव्हतं व फक्त ईश्वरच होता, तर त्यानं ही सारी सृष्टी कशापासून निर्माण केली असावी ?

महाराज :- कशापासून म्हणजे ? स्वतःपासूनच.

मी :- ती कशी काय बुवा ?



Scanned by CamScanner

महाराज :- अगदी साध्या शब्दात सांगायचं, तर त्या अव्यक्त ईश्वरी तत्वानं आपल्या शक्तीच्या मदतीनं विश्वातील सर्व वस्तूंची व्यक्त रुपं धारण केली असावीत व त्यांचे गुणधर्महीं त्यानंच निश्चित केले असावेत. अगदी इलेक्ट्रॉनपासून ते या विश्वापर्यंत सर्व काही तोच झाला आहे. म्हणून त्याला सर्वव्यापक म्हणायचं.

मी :- म्हणजे महाराज, माझ्यातही तोच असला पाहिजे.

महाराज :- अरे, तुझ्यात त्या ईश्वरी शक्तीचा वास आहे, म्हणूनच त्या शक्तीच्या आधारावरच त्याच्या अस्तित्वाविषयी तू शंका घेऊ शकतोस व तिचं निरसनही करुन घेऊ शकतोस. ईश्वरानं धारण केलेल्या वस्तूंच्या रुपांच्या गुणधर्मांचा अभ्यास करत असताना रोज नवीन शोध लागत असतात. त्यांचं आपल्याला नेहमी कौतुक वाटतं. त्यातल्या काही शोधांची नावं सांग पाहू.

मी :- त्यात काय कठीण आहे, महाराज ? असे शोध कितीतरी आहेत. माणसाला चाकाचा शोध लागला तेव्हा हातगाडी, बैलगाडी, सायकल, स्कूटर, मोटार, रेल्वे या गोष्टी तयार झाल्या. तसंच विजेचा शोध लागल्यावर मग विजेचे दिवे, रेडिओ, टेलिफोन, टेपरेकॉर्डर, टी.व्ही. या वस्तू घरोघर दिसू लागल्या. पण महाराज, याचा देवाशी काय संबंध ?

महाराज :- अरे, संबंध उघडच आहे. ज्या शास्त्रज्ञांनी या वस्तू निर्माण केल्या, त्यांना या वस्तूंचं पूर्ण ज्ञान असलंच पाहिजे. उदा.- रेडिओ बनवणा-या तंत्रज्ञाला रेडिओचं पूर्ण ज्ञान असतं, म्हणून त्याच्या ज्ञानावर भरवसा ठेवून आपण या वस्तू विकत घेतो आणि त्यांचा आनंद उपभोगतो. याच तत्वानुसार ज्या ईश्वरानं ही सृष्टी व त्यातला माणूस निर्माण केला, त्याचं पूर्ण ज्ञान त्याला असलंच पाहिजे. याकरिता आपल्या जीवनात आपल्या मनानं काही बिघाड होतो, तेव्हा आपण या सर्वज्ञानी ईश्वराचा धावा करतो. बाबारे, असशील तिथून धावत ये व माझी लाज राख असं सांगतो. व नवसफेडीच्या रुपानं आपण त्याची व्हिजिट फी देऊ असंही त्याला आश्वासन देतो. (नंतर आपण ते सोयिस्करपणे विसरुन जातो ही गोष्ट वेगळी ) अगदी विज्ञानवादी अमेरिकेतसुध्दा तिथल्या शास्त्रज्ञांनी अंतराळात पाठवलेलं अवकाशयान कोसळण्याची भीती जेव्हा निर्माण झाली, तेव्हा अमेरिकेतील सर्व चर्चेसमधून देवाची प्रार्थना केली गेली व घंटा वाजवण्यात आल्या. ते अवकाशयान सुखरुपपणे खाली आल्यावर सर्वांना हायसं वाटलं. म्हणून तो सर्वज्ञानी असला पाहिजे.



Scanned by CamScanner

मी :- म्हणजे माझ्या मनातलं सगळं देवाला कळत असलं पाहिजे ?

महाराज :- हो ना. जसं दोन माणसांतील टेलिफोनवरील संभाषण इच्छा असल्यास टेलिफोन ऑपरेटर ऐकू शकतो तसं.

तेव्हा तुझ्या बुध्दीला पटणा-या तर्कांच्या आधारावर असं म्हणता येईल की ईश्वर हा या विश्वाचा निर्माता असून तो अव्यक्त, अनादि, अनंत, अविनाशी, सर्वशक्तिमान, सर्वव्यापक, अजर, अमर व सर्वज्ञानी असला पाहिजे.

मी :- (आश्चर्यानं) महाराज, इतके दिवस हे माझ्या कसं लक्षात आलं नाही ?

महाराज :- कारण तुझं लक्ष भलतीकडेच होतं म्हणून.

मी :- पण महाराज, ईश्वराचे हे गुणधर्म माझ्या अनुभवाला येऊ शकतील काय?

महाराज :- न यायला काय झालं ? पण त्यासाठी तुला ईश्वराच्या भक्तीची म्हणजेच भक्तीयोगाची कास धरायला पाहिजे. बरं, आणखी काही विचारायचंय का ?

मी :- आज इतकं पुरे झालं महाराज. ऐकलं हेच डोक्यावरुन जातंय. पण आज डोकं आणखीन् मोकळं झालंय. आता याच्यावर नीट विचार करुन मग तुमच्याकडे येतो.

महाराज :- बरं ! शांतपणे जा हं.

------ooooooo------



Scanned by CamScanner

# प्रकरण तिसरे

# गुणधर्म - जीवाचे व ईश्वराचे

मी :- महाराज, येऊ का ?

महाराज :- ये, ये, आज ब-याच दिवसांनी येणं केलंस.

मी :- होय महाराज, गेल्यावेळी तुम्ही मला जे सांगितलंत, ते माझ्या डोक्यात पूर्णपणे बिंबलं आहे. आणि मगच आज पुढचं ऐकायला आलो आहे.

महाराज :- ठीक आहे. आज आपण कोठून सुरुवात करु या ?

मी :- गेल्या वेळी तुम्ही सांगितलंत की देव अविनाशी, अनादि, अनंत, सर्वव्यापी, सर्वशक्तिमान व सर्वज्ञानी असलाच पाहिजे. व तो माझ्यातही आहे. माझा आजचा प्रश्न असा आहे, की या देवाचा आणि आमचा काय संबंध आहे व तो माझ्यातही आहे तर तो मला कसा समजेल ?

महाराज :- त्यासाठी देवाचे कुठले गुण तुझ्यात दिसतात ते प्रथम पाहूया. पहिली गोष्ट म्हणजे तू आहेस, तू जिवंत आहेस याविषयी काही पुरावा पाहिजे का ?

मी :- नको. कारण जसं मी मुका आहे असं तोंडानं म्हणू शकत नाही, त्याचप्रमाणे मी जिवंत नाही असं मी तोंडानं म्हणू शकत नाही. कारण लहानपणी मी शाळेत असताना कुत्र्याचं आत्मवृत्त नावाचा निबंध लिहिला होता. त्यात शेवटी मी अपघातात मेलो असं लिहिलं होतं, म्हणून मास्तरांनी मला शून्य मार्क दिले. तेव्हा मला हे समजलं.

महाराज :- यालाच "अस्ति" असं म्हणतात. दुसरी गोष्ट म्हणजे तुझ्या ठिकाणी जाणण्याची शक्ती आहे. कारण तू बुध्दीच्या मदतीने स्वतःला व इतरांना तसेच जगातील निर्जीव वस्तूंना जाणू शकतोस, यालाच "भाति" असं नांव दिलं आहे. कारण "भा" म्हणजे प्रकाश.

मी :- महाराज, बरोबर आहे. लहानपणी मी खूप 'ढ' होतो. मला एखादी गोष्ट समजली, की सर्व वर्गाला समजली असं आमचे मास्तर म्हणायचे. तेव्हा ते मला म्हणायचे, काय ढढ्ढोबा, डोक्यात काही प्रकाश पडला का ? याचा अर्थ मला आज समजला.

महाराज :- आता तिसरी गोष्ट. तुझ्या आयुष्यात तू ब-याच लोकांवर प्रेम केलं असशील ?



Scanned by CamScanner

मी :- हो ना, केलं काय म्हणता ? करतोच आहे, असं म्हणा. आई, बाबा, तसंच बायको, शिवाय मुलं या सर्वांवर माझं खूप प्रेम आहे.

महाराज :- म्हणजे तू 'ढ' होतास, तरी प्रेमळ आहेस म्हणायचा. असो. यापैकी तुझं सर्वांत जास्त प्रेम कुणावर आहे ?

मी :- तसं काही सांगता येणार नाही, महाराज. कारण प्रत्येकाच्या प्रेमाचा प्रकार वेगळा आहे. आई-वडिलांवर माझं आदरयुक्त, तसंच बायकोवर वैषयिक तर मुलांवर वात्सल्यमय प्रेम आहे.

महाराज :- बरं, समजा बायको-मुलांनी तुझ्या मनाविरुध्द वर्तन केलं, तर तुझ्या प्रेमाचं काय होतं ? ते प्रेम तसंच टिकतं का ?

मी :- नाही, माझ्या प्रेमाचं रुपांतर रागात होतं.

महाराज :- का ?

मी :- त्यांनी माझं ऐकलं नाही म्हणून.

महाराज :- पण त्यांनी तुझं का ऐकावं ?

मी :- कारण ती माझी बायको, माझी मुलं आहेत म्हणून.

महाराज :- म्हणजे तुझं त्यांच्यावर खरं प्रेम नाही असं दिसतं.

मी :- कशावरुन म्हणता ?

महाराज :- अरे, ज्या प्रेमाचं रागात, द्वेषात आणि असूयेत रुपांतर होतं, ते खरं प्रेम नव्हे. तू बायको-मुलांवर प्रेम करतोस, कारण ती तुझी आहेत म्हणून. तेव्हा तुझं प्रेम खरं त्यांच्यावर नसून, तुझ्या स्वतःवर आहे.

मी :- ते कशावरुन महाराज ?

महाराज :- अरे, तुझ्या स्वतःविषयीच्या प्रेमाचं रुपांतर कधीतरी रागात, द्वेषात, असूयेत होतं का ? तसंच ते स्वतःवरचं प्रेम कधीतरी कमी जास्ती होतं का? नाही ना? तेव्हा तिसरी गोष्ट म्हणजे स्वतःवरचं प्रेम. याला "प्रियति" असं म्हटलं आहे. म्हणजे अस्ति, भाति आणि प्रियति हे तुझे तीन गुणधर्म आहेत. आणि हे तुला देवाकडूनच मिळाले आहेत.

मी :- ते कसे महाराज ?

महाराज :- सर्वज्ञानी, सर्वव्यापी आणि अविनाशी अशा देवांचे आपल्याला जाणवणारे असे गुणधर्म तीन प्रकारचे आहेत. ते म्हणजे सत्, चित् आणि आनंद. ते कसे जाणवतात, ते तुला सांगतो.



Scanned by CamScanner

या जगात दोन प्रकारचे पदार्थ आहेत. एक सजीव पेशी आणि दुसरी निर्जीव वस्तू. ज्या वस्तूला जाणण्याची शक्ती आहे, आणि जी वस्तू भोवतालच्या सृष्टीतून काही पदार्थ आपल्या शरीराच्या पोषणासाठी आणि वाढीसाठी आपल्या शरीरात भरून घेते व त्यातले आपल्याला उपयोगी असलेले पदार्थ ठेऊन निरुपयोगी पदार्थ शरीराच्या बाहेर टाकते, तिला सजीव असं म्हणतात. या सृष्टीत अशा कोट्यावधी सजीव पेशी आहेत. हे दोन गुणधर्म ज्यांच्या ठिकाणी नाहीत, त्यांना निर्जीव वस्तू असं म्हणतात. काही बाह्य प्रेरणा असल्याशिवाय या वस्तूंमध्ये बदल होत नाही. उदा.- एखादा दगड जागच्या जागी वर्षानुवर्षे राहील. कुणीतरी बाजूला केला, तरच त्याची जागा बदलेल. किंवा वा-यामुळे त्याचा आकार बदलेल. यापलिकडे आणखी काही होणार नाही. यावरुन असं दिसतं, की सजीव सृष्टी ही निर्जीव वस्तूंचा आणि इतर लहान सजीव सृष्टीचा आपल्या इच्छेप्रमाणे उपयोग करुन घेत असते. उदा.- माणूस घर बांधण्यासाठी दगड, विटा, सिमेंट, पोलाद वगैरे निर्जीव वस्तूंचा व खाण्यासाठी वनस्पती, प्राणी, मासे, धान्ये वगैरे जिवंत पेशींचा उपयोग करत असतो. अशा रीतीने सजीव आणि निर्जीव सृष्टीमध्ये अनेक बाबतीत फरक दिसत असला, तरी एका बाबतीत साम्य आहे. ते म्हणजे या सर्व सजीव व निर्जीव सृष्टीला अस्तित्व आहे, किंवा असणेपणा आहे. हे अस्तित्व ईश्वराच्या "सत्" या गुणधर्मावरुन मिळालेलं आहे. पण देवाचं अस्तित्व किंवा सत्व किंवा सत्ता या देव हा सर्वव्यापी असल्यामुळे अनंत व अमर्याद स्वरुपाच्या असतात. सत्व किंवा सत्ता हे शब्द सत् या शब्दावरुनच निर्माण झाले आहेत.

मी :- हे मला आत्तापर्यंत कोणीच का सांगितलं नाही ?

महाराज :- कारण आत्तापर्यंत तुला यासंबंधी जिज्ञासाच निर्माण झाली नव्हती. आता एवढं निश्चित झालं की निर्जीव व सजीव सृष्टीत व आकाशात देव सत् रुपाने असतो. आता सजीव सृष्टीकडे वळूया. इथे अस्तित्वाच्या जोडीला जाणण्याची शक्ती पण असते. ही शक्ती आपल्याला ईश्वराच्या ज्या गुणापासून मिळते, त्या गुणाला "चित्" असं नाव आहे. यालाच चित्ति किंवा चैतन्य असंही म्हणतात. अर्थात इथेसुध्दा जीवाची जाणण्याची शक्ती मर्यादित असते, तर ईश्वर सर्वज्ञानी असतो.

मी :- वा महाराज, किती छान समजावून सांगताय तुम्ही. असं जगाच्या अंतापर्यंत जरी तुम्ही सांगत बसलात तरी मला त्याचा कंटाळा न येता आनंदच वाटेल.



महाराज :- (चेष्टेने) अरे, पण मध्येच जर तुला ईश्वरप्राप्ती वगैरे झाली, तर काय करशील ?

मी :- तसं झालं तर फारच छान होईल महाराज, मग तर मी आनंद सागरात बुडून जाईन.

महाराज :- तुकाराम महाराजांनी म्हटलंच आहे, "आनंदाचे डोही। आनंद तरंग। आनंदची अंग। आनंदाचे।।" तर सांगण्याची गोष्ट म्हणजे हा आनंद हे ईश्वराचं तिसरं लक्षण आहे. तुला पगाराच्या दिवशी होणारा किंवा प्रमोशन(बढती) मिळाल्यावर झालेला आनंद हा बाह्य विषयांवर आधारलेला असल्यामुळे तो क्षणिक, तात्पुरता व कालांतराने कमी होणारा असा असतो. पण ईश्वरीय आनंद हा कोणत्याही बाह्य वस्तूवर किंवा घडामोडीवर किंवा चित्तातल्या वृत्तीवर अवलंबून नसतो, तर तो आंतरिक वृत्तीरहित आनंद असतो. तसंच तुला स्वतःविषयी जे प्रेम वाटतं ते बाह्य विषयांवर अवलंबून नसल्यामुळे या आनंदाचाच तो परिणाम असतो. उपनिषदात एक वाक्य आहे- "आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति।"

तेव्हा या सगळ्याचा सारांश असा की "अस्ति", "भाति", व "प्रियति" हे माणसाचे गुणधर्म आहेत तर सत्, चित्, व आनंद ही ईश्वराची आपल्या तर्कशुध्द बुध्दीला समजणारी लक्षणं आहेत. म्हणून तर ईश्वराला सच्चिदानंद भगवान् असं म्हणतात.

मी :- पण महाराज, इथे मला एक शंका येते. सर्वच गोष्टी जर देवानं निर्माण केल्या आहेत आणि त्याचेच गुण जर माझ्यात आले आहेत तर माझ्यात काम, क्रोध, गर्व इत्यादि जे दुर्गुण आहेत तेही त्यानेच निर्माण केले आहेत का ?

महाराज :- अरे, सूर्यामुळे आपल्याला प्रकाश मिळतो. तोच सूर्य अस्ताचलाला गेला की प्रकाशाच्या अभावामुळे सर्वत्र गडद काळोख पडतो. म्हणून सूर्यामुळे अंधार निर्माण झाला असं म्हणणं बरोबर होईल का ? तसंच ईश्वराच्या ज्ञानामुळे माणसाच्या ठिकाणी सद्‌गुण निर्माण होतात तर त्याच्या ज्ञानाच्या अभावामुळे म्हणजे अज्ञानामुळे किंवा विस्मरणामुळे अहंकार बळावतो व त्यामुळे हे षड्-विकार माणसाच्या मनाचा ताबा घेतात. म्हणून यांचा निर्माता ईश्वर आहे असं म्हणून त्यांचं समर्थन करु नये.

मी :- (कृतज्ञतेनं) महाराज, देव असा असू शकतो याची तुम्ही सांगेपर्यंत मला कल्पनाच नव्हती. मी आत्तापर्यंत देव म्हणजे गणपतीला नवस आणि सत्यनारायणाचा तीर्थप्रसाद इतकंच समजत होतो.

महाराज :- म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात, की

" तुका म्हणे सारे। आंधळे हे जन।
गेले विसरुन। ख-या देवा।।"



Scanned by CamScanner

किंवा "आंधळे हे जन। न देखवे डोळा।

म्हणूनि कळवळा। येत असे।।"

मी :- महाराज, आज इतकंच पुरे. आज जे ऐकलं ते नीट पचवून मग पुन्हा तुमच्या वाक्गंगेत पुनीत होण्यासाठी येतो.

महाराज :- ये बरं. नीट सांभाळून जा.

-----ooooooo-----



Scanned by CamScanner

# प्रकरण चौथे

# भक्तियोग - सकाम व निष्काम

मी :- महाराज, मी आत येऊ का ?

महाराज :- ये ना ! आज बरोबर कसली पुडी घेऊन आला आहेस ?

मी :- महाराज, आपण मागील अंकावरुन पुढे चालू करू या. सच्चिदानंद भगवंताची लक्षणं व त्याचे माणसाच्या ठिकाणी दिसणारे गुणधर्म हे तुम्ही मागल्या वेळी सांगितलेत. पण आपल्या समाजात मात्र असं दिसत नाही. देव म्हटला की मंदीर, देवाची मूर्ती, पुजारी, दर्शनाची लांबलचक रांग, त्या देवतेचे ठराविक वार, त्या दिवशी अजीर्ण होईपर्यंत खाऊन केलेले उपवास, कामनापूर्तीसाठी देवाला केलेले नवस, नंतर ते फेडण्यासाठी केलेली चालढकल व टाळाटाळ, देवळातली दैनिक कीर्तनं किंवा प्रवचनं आणि फुलवाती करत करत ती ऐकणा-या महिला वगैरे गोष्टी डोळ्यासमोर येतात. तसंच अनेक देवतांचे वार्षिकोत्सव व जयंत्या, सत्पुरूषांच्या पुण्यतिथ्या व प्रकटदिन, तसंच आषाढी व कार्तिकीच्या एकादश्या, त्यासाठी पंढरीला जमलेले लाखो वारकरी, त्यानंतर मासिक पौर्णिमांचे उत्सव, पाक्षिक दोन एकादश्या, साप्ताहिक उपवास व भजनं, दैनिक देवपूजा, स्तोत्र पठण, त्रिकाल संध्या व फावल्या वेळात नामोच्चार याही गोष्टी भाविक भक्तजन करत असतात. पण तुम्ही सांगितलेल्या देवाच्या व्याख्येत यातलं काहीच बसत नाही. असं का ?

महाराज :- आपल्या समाजात देवभक्तीचं असं स्वरुप का प्रचलित झालं ते जरा मुळापासून पाहू या. माणसाचं जीवन जोपर्यंत सुरळीत चालू असतं तोपर्यंत त्याला देवाची गरज लागत नाही. म्हणून त्याला देवाची आठवणही येत नाही. त्याऐवजी आपल्या मनात येणा-या सर्व इच्छा, आकांक्षा, कामना, वासना, वगैरे सहज पु-या व्हाव्यात व त्यातच आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता व सार्थक आहे असं त्याला वाटतं. या वासनांना अंत नसल्यामुळे एक वासना पुरी झाली की दुसरी तिची जागा घेते. त्यामुळे "आता पुरे बुवा" असं त्याला कधीच वाटत नाही. पण वासना जेव्हा पुरी होत नाही, तेव्हा त्याचा जीव तडफडू लागतो. अशा वेळी त्याला देवाची आठवण येते. शिवाय जीवनात अनेक वेळा असे दुर्धर प्रसंग येतात की मती



Scanned by CamScanner

गुंग होऊन जाते व काय करायचं ते सुचत नाही. कारण सर्व मानवी उपाय थकलेले असतात. अशा वेळी या गोष्टींवर रामबाण इलाज हवा म्हणून त्याचं मन एक भरभक्कम आधार शोधत असतं. मग कोणीतरी मित्र त्याला सांगतो की अमका देव हा फार पॉवरफुल देव आहे. तो नवसाला लवकर पावतो, म्हणून त्याला नवस कर. किंवा अमुक एक महाराज हे परमार्थातले फार अधिकारी पुरूष आहेत. त्यांच्या दर्शनाला जाऊन ये, आपली अडचण सांग व ते सांगतील तशी उपासना कर. मग हा माणूस त्या मित्राबरोबर देवाच्या किंवा महाराजांच्या दर्शनाला जाऊ लागतो व अंगात थोडासा उत्साह असल्यास घरी देवपूजा, काही स्तोत्रपठण, तीर्थप्रसाद, अंगारा वगैरे गोष्टी पुजारी किंवा महाराजांनी सांगितल्याप्रमाणे करु लागतो.

थोडक्यात सांगायचं म्हणजे, आपल्या जीवनातील वासनापूर्तीचा ताल, सूर आणि ठेका बिघडू नये म्हणून त्या तालेवार सुरेश्वराला म्हणजे देवाला माणूस आपला ठेकेदार उर्फ कॉंट्रॅक्टर करुन टाकतो. तो सुध्दा आधी काम व मग वाटल्यास दाम या पध्दतीनं. आता यात जर त्याची इच्छा पूर्ण झाली, तर त्याचा या देवावर किंवा महाराजांवर विश्वास बसतो. मग तो जास्त जास्त मागण्या देवाकडे करु लागतो. पण बोललेला नवस फेडण्याचं वचन मात्र तो सोयिस्करपणे विसरून जातो. आता एखादे वेळी त्याची मागणी पुरी झाली नाही की तो दुस-या पॉवरबाज देवाकडे जाऊ लागतो. जसं एखाद्या माणसाला एका डॉक्टरचं औषध घेऊन बरं वाटलं नाही, की तो पहिल्या डॉक्टरचे पैसे न देताच दुस-या डॉक्टरकडे जाऊ लागतो.

काही व्यवहारी माणसं धूर्त असतात. त्यांना देवाच्या भोळेपणाचा फायदा घ्यावासा वाटतो. पण देव त्यांचं बारसं जेवलेला असतो हे त्यांना समजत नाही. असंच एका धूर्त व भोंदू भक्ताला स्वप्न पडलं, त्यात त्याला देव भेटला. त्यानं देवाला विचारलं, "देवा, तुझ्या राज्यातला नया पैसा हा आमच्या लाख रुपये किंमतीचा असेल नं ?" देव म्हणाला, "हो". "आणि तुझ्या राज्यातला एक क्षण हा आमच्या पृथ्वीवरच्या लाखो वर्षांइतका असेल नं ?" "होच मुळी "देव म्हणाला. त्यावर भक्त म्हणाला,"देवा, लई नाही, लई नाही मागणं. मला फक्त 'तुझा' एक नया पैसा दे". देव हसून म्हणाला, "तथास्तु. पण फक्त 'एक' क्षणभर थांब." असो.

मी :- महाराज, खरोखर अगदी शेवटपर्यंत माणसाच्या वासनांना अंतच नसतो असं दिसतं. यासंदर्भात मला ती म्हतारीची गोष्ट आठवली. एक ऐंशी वर्षांची आंधळी म्हातारी होती. ती एकटी होती, भीक मागून जगत असे व नेहमी



Scanned by CamScanner

तोंडानं, "देवा, आता मला सोडव", असं म्हणत असे. एक दिवस देव खरंच आला व म्हणाला, "म्हातारे, चल माझ्याबरोबर स्वर्गात". म्हातारी म्हणाली,"माझी एक इवलीशी इच्छा पुरी कर !" देव म्हणाला, "काय इच्छा आहे, सांग." त्यावर त्या चलाख म्हातारीनं काय मागावं ? ती म्हणाली,"माझा नातू या देशाचा पंतप्रधान झालेला मला माझ्या डोळ्यांनी बघायचा आहे." म्हणजे प्रथम तिला दृष्टी आली पाहिजे, मग तिचं लग्न झालं पाहिजे. मग तिला इतक्या म्हातारपणी प्रथम मुलगा झाला पाहिजे. त्याचं लग्न होऊन त्याला मुलगा झाला पाहिजे. तो मोठा होऊन मग देशाचा पंतप्रधान झाला पाहिजे. व तितकी वर्ष म्हातारी ठणठणीत राहिली पाहिजे. म्हणजे तिने एका वरात सहा वर मागितले.

महाराज :- अनेक वेळा आपल्याला कटकट करणा-या माणसाला त्रास व्हावा म्हणूनसुध्दा नवस करणारी माणसं असतात. अशाच एका गांजलेल्या सुनेनं केलेल्या नवसाचं व्यंगातून व विनोदानं एकनाथ महाराज वर्णन करतात-

नणंदेचं कार्ट किरकिर करतंय, खरुज होऊ दे त्याला।<br>
सासरा माझा गावी गेला, तिकडेच खपवी त्याला।<br>
भवानी आई रोडगा वाहीन तुला।।

वास्तविक वासनापूर्तीसाठी देवाला वापरणं म्हणजे घरातली कामधेनू देऊन त्याऐवजी एखादं गाढव विकत घेण्यासारखं आहे, असं गोंदवलेकर महाराज म्हणतात. ते अगदी खरं आहे.

यानंतर अनेक माणसं आपल्यावर संकट आलं, तरच देवाचा धावा करतात. एरवी त्यांना देवाची आठवण येत नाही. म्हणून कुंतीने कृष्णाकडे संकटांची मागणी केली. "आपदः सन्तु नः शश्वत्।" कारण सामान्य माणसाला संकटात देवाची हमखास आठवण येते.

मी :- पण महाराज, आपल्यावर संकट आलं, तर आपण देवाचा धावा करु नये का ?

महाराज :- आपल्या मनावर आलेलं संकटाचं दडपण दूर करण्यासाठी वाटल्यास देवाची प्रार्थना करावी. "जिवलगा, पाऊल थकले, माथ्यावरचे जड झाले ओझे ",असं म्हणावं. पण माझं संकट दूर केलंस, तरच तू खरा देव आहेस, असं म्हणू नये.

थोडक्यात माणसानं आपल्या सांसारिक अडचणी सोडवण्यासाठी देवाला वेठीला धरु नये. कारण सकाम भक्तीमध्ये देवाच्या मोठेपणापेक्षा



Scanned by CamScanner

आपल्या वासना किंवा इच्छापूर्तीचंच महत्त्व माणसाला जास्त वाटत असतं किंवा देवाच्या सेवेसाठी मी आहे असं न वाटता माझ्या सुखासाठी देवाची योजना आहे अशी भावना दृढ होते.

मी :- पण महाराज, असं दिसतं की पिढ्यान् पिढ्या माणूस हेच करत आला आहे.

महाराज :- याचं कारण असं, की माणसाचं मन हे पारंपारिक व पिढ्यान् पिढ्या चालत आलेला साधा व सोपा मार्ग चोखाळत असतं. त्याला एखाद्या गोष्टीच्या मुळाशी जाऊन ती तपासून पहाण्याची सवय नसते. म्हणून त्याला पूजा-अर्चा, तीर्थ-प्रसाद, स्तोत्रपठण, उपास-तापास, व्रतं-वैकल्यं हा ढोबळ मार्ग आपल्या वासनापूर्तीसाठी सोपा व बरा वाटतो. शिवाय यामुळे त्याला समाजात भक्त म्हणून मान्यता मिळून त्याचा अहंकार सुखावतो तो वेगळाच.

आता अगदी मुळापासून विचार केला, तर अजिबात भक्ती न करण्यापेक्षा सकाम भक्ती केलेली बरी. पण सकाम भक्ती ही ख-या अर्थानं भक्ती नव्हेच. म्हणून तिला गौणी भक्ती हे नाव आहे. म्हणून सकाम भक्ती करणा-यानं लवकरात लवकर ख-या भक्तीकडे वळावं.

आता काही माणसं जरी सुरूवातीला वासनापूर्तीसाठी व संकटनिवारणासाठी देवाकडे वळत असली तरी कालांतरानं त्यांना भक्तीत गोडी वाटू लागते व ही गोडी जसजशी वाढू लागते, तसतसा त्यांच्या मनावरचा सकाम भक्तीचा पगडा सैल होऊ लागतो व ही सकाम भक्ती मनातून निघून गेली, की मग ही माणसं ख-या अर्थानं ख-या भक्तीमार्गाला लागतात.

मी :- मग महाराज, माणसानं खरी भक्ती कशी करावी ?

महाराज :- ख-या देवाला खरोखर खरेपणानं ओळखून त्याची खरी भक्ती करावी, याला खरा किंवा निष्काम भक्तियोग असं म्हणतात.

मी :- महाराज, भक्तियोग म्हणजे काय ?

महाराज :- माणूस भक्तीनं ईश्वराशी जोडला जाणं याला भक्तियोग असं म्हणतात. योग हा शब्द युज धातूपासून बनला आहे. युज म्हणजे जोडणे. म्हणून योग म्हणजे जोडण्याची प्रक्रिया. आपल्याकडे मुख्य चार प्रकारच्या योगप्रक्रिया आहेत. कर्मयोग, राजयोग, भक्तियोग व ज्ञानयोग. या चार प्रकारच्या योगांनी ईश्वराशी जोडलं जाण्याची किंवा त्याच्याशी एकरुप होण्याची किमया साधते. तसंच भक्त या



Scanned by CamScanner

शब्दाचा अर्थ जो विभक्त नव्हे तो. विभक्त म्हणजे वेगळा झालेला- देवाच्या सृष्टीपासून, त्याच्या कार्यापासून स्वतःला वेगळा मानणारा तो विभक्त. याउलट देवाशी एकरुप झालेला तो भक्त.

मी :- महाराज, याचा व्याकरणातील विभक्तींशी काही संबंध आहे का ?

महाराज :- व्याकरणात विभक्तीचे प्रत्यय असतात. तर भक्तीचा प्रत्यय हा स्वतः घ्यायचा असतो. प्रथम मी स्वतःला जगापासून वेगळा समजतो. त्यातून 'मी' निर्माण होतो. माझा ज्याच्याशी संबंध येतो, तो 'तू' होतो. व इतर जगाला मी 'तो-ती-ते' बनवतो. मग यांना प्रथमेपासून संबोधनापर्यंतचे प्रत्यय लागतात. अर्थात व्यवहारासाठी यांची गरज आहेच.

मी :- महाराज, निष्काम भक्ती म्हणजे नेमकं काय ?

महाराज :- हा आपल्या मनानं कल्पिलेला विभक्तपणाचा प्रत्यय प्रयत्नानं व ऐक्याच्या ज्ञानानं सोडून देऊन त्याऐवजी ईश्वराशी परमप्रेमाचा संबंध जोडून त्याच्याशी एकरुप झाल्याचा प्रत्यय घेणं म्हणजे निष्काम भक्ती. ही प्रक्रिया ज्या प्रयत्नामुळे साध्य होते त्यास साधना किंवा उपासना म्हणतात. उप +.आसन म्हणजे ईश्वराच्या जवळ आसन मिळणं. ही साधना करताना ईश्वराकडून कसलीही अपेक्षा न ठेवणं याचं नाव निष्काम भक्तियोग.

मी :- महाराज, इतकं पुरे झालं. आज आपण जे सांगितलंत, त्याचं चिंतन करुन पुढच्या वेळी येतो.

महाराज :- ये बरं. पुन्हा सवडीने ये.

-----ooooooo-----



Scanned by CamScanner

# प्रकरण पाचवे
# नवविधा भक्ती

मी :- महाराज, येऊ का ?

महाराज :- ये बरं. अवश्य आत ये.

मी :- महाराज, गेल्या वेळी आपण सकाम व निष्काम भक्ती हे दोन प्रकार पाहिले. आज त्याच्या पुढचं काहीतरी सांगा.

महाराज :- सकाम भक्ती संपली की निष्काम भक्ती सुरू होते. ही सगुण, सर्वगुण व निर्गुण या तीन पध्दतीनी करता येते. आपल्या शास्त्रात सांगितल्याप्रमाणे भक्ती ही नऊ प्रकारांनी करता येते.

श्रवणं कीर्तनं विष्णोस्स्मरणं पादसेवनम्।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम्।।

याचा अर्थ तुला माहीत आहेच.

मी :- पण महाराज, भक्तीचे इतके प्रकार का सांगितले आहेत ?

महाराज :- अरे, भक्ती म्हणजे ईश्वरावर केलेलं परम प्रेम. "सा तु अस्मिन् परमप्रेमरुपा" अशी देवर्षी नारदांनी भक्तीची व्याख्या केली आहे. या प्रेमाचं आपल्याला माहित असलेलं स्वरुप म्हणजे आईचं आपल्या मुलावरचं प्रेम. आता आई जेव्हा मुलावर प्रेम करते, तेव्हा ती काय एकाच प्रकारानं प्रेम करते का ? केव्हा ती मुलाचे मटामट मुके घेत असते. तर केव्हा ती त्याच्याशी बोबडं बोबडं बोलत असते. कधी त्याला छातीशी घट्ट धरुन आपली नजर अनंतात खिळवून बसलेली असते. कधी त्याला खांद्यावर घेऊन हलक्या हाताने थोपटून आपल्या मंजुळ आवाजात त्याच्यासाठी अंगाई-गीत म्हणत असते. तर कधी त्याच्या भुरभुरत्या जावळातून (केसातून) आपली मऊ व लांबसडक बोटं फिरवीत असते. तर कधी ती त्याला मांडीवर घेऊन त्याचं डोकं पदराआड धरुन त्याला स्तनपान करवीत असते.

बाळाविण माता आणिक न आणी चित्ता।

अरे, भक्ती म्हणजे कवाईत का आहे ? आपले एकदम सर्वांनी हात वरखाली केले ! भक्ती म्हणजे प्रेम. निर्व्याज, निष्काम, निरपेक्ष, निःखळ प्रेम. भक्ती म्हणजे देवाच्या मूर्तीवर केलेलं मूर्तिमंत प्रेम. विश्वावर आणि त्याच्या अमूर्त



Scanned by CamScanner

निर्मात्यावर केलेलं अव्यभिचारी प्रेम. असं प्रेम प्रल्हादानं खांबावर केलं, एकनाथांनी गाढवावर केलं तर नामदेवांनी कुत्र्यावर केलं. ज्ञानेश्वरांनी रेड्यावर केलं, तुकारामांनी चिमण्यांवर केलं, राका कुंभारानं मांजरीच्या पिलांवर केलं, सावता माळ्यानं कांदा-मुळा-भाजीवर केलं, दामाजीपंतांनी रयतेवर (प्रजेवर) केलं. तर असं प्रेम गोंदवलेकर महाराजांनी नामधारकांवर केलं. ते म्हणायचे, "जो नाम घेतो, त्याच्या दारापाशी कुत्रा होऊन बसण्याची माझी तयारी आहे." अरे, आपला जन्मच आई-वडिलांच्या प्रेमातून होतो. त्यांच्या मायेमुळे व भावा-बहिणींच्या व पुढे बायकोच्या प्रेमातून आपण वाढतो, मोठे होतो. मुलांच्या प्रेमात आपण रमतो व नातवंडांवर प्रेम करता-करताच आपण देह ठेवतो. प्रेम हा जीवनाचा स्थायीभाव असल्यामुळे ईश्वराशी एकरुप होऊन जीवन प्रेममय करणं म्हणजे भक्ती.

मी :- महाराज, माझा प्रश्न मूर्खपणाचा वाटेल, पण विचारतोच. भक्ती ही प्रत्येकानं केली पाहिजेच का ?

महाराज :- (हसून) अरे, हे म्हणजे जगण्यासाठी श्वास घेण्याची गरज आहे का ? असं विचारण्यासारखंच आहे. हे पहा, तुझं जीवन इतकं सुखाचं आहे, तरी तुला माझ्याकडे भक्ती म्हणजे काय हे विचारण्यासाठी यावंसं वाटलं, यातच तुझ्या प्रश्नाचं उत्तर आहे. अरे, माणसाला प्रेम करायला शिकवावं का लागतं !

"प्रेमात राम रमतो प्रेमाला मोल ना जगामाजी"

मी :- महाराज, भक्ती का करावी हे मला समजलं. आता तिनं काय होतं ते जरा सांगा.

महाराज :- (हसून) अरे, तुझी प्रश्नांची भेंडोळी तर संपता संपतच नाहीत की ! "प्रश्न संपता संपेना." बरं, तुझ्या प्रश्नाचा साकल्यानं विचार करु. भक्तीनं काय होतं याचं उत्तर भक्तीनं आपलं अंतःकरण शुध्द, निर्मळ व पवित्र होतं. अशा शुध्द अंतःकरणांच्या परिणामांचं वर्णन तुकाराम महाराजांनी अनेक अभंगांतून केलं आहे.

१) दया, क्षमा, शांती। तेथे देवाची वसती।।

२) अखंड राहे समाधान। हेचि ईश्वरदर्शन।।

३) चित्त शुध्द तरी। शत्रु मित्र होती।।

४) तुका म्हणे होय उपरती चित्ता। अंगी सप्रेमता येणे लागे।।

तुकाराम महाराज पुढे म्हणतात, की वाटल्यास मी तुमच्या पाया पडतो, पण तुम्ही आपलं चित्त शुध्द करा.



Scanned by CamScanner

सकळांच्या पाया माझे दंडवत। आपुलाले चित्त शुध्द करा।।

मी :- म्हणजे आमची अंतःकरणे एरवी अशुध्द असतात काय ?

महाराज :- होय. जसा खाणीतून काढलेला धातू अशुध्द स्वरुपात असतो, तो शुध्द करुन मगच योग्य कामासाठी वापरता येतो, तसं या जीवखाणीतून माणूस जेव्हा जन्म घेतो, तेव्हापासून त्याचं अंतःकरण मलिन होत असतं. आणि रोजच्या व्यवहारात ही अशुध्दता अजाणता वाढत जाते. या अंतःकरणाची शुध्दी भक्तीने होत असते.

मी :- महाराज, अंतःकरण म्हणजे काय आणि ते कशानं अशुध्द होतं ?

महाराज :- अंतर म्हणजे आतील व करण म्हणजे इंद्रिय. म्हणून पाच ज्ञानेंद्रियांच्या जोडीला मन हे सहावं पण आतलं इंद्रिय आहे. यालाच आपण मन, बुध्दी, चित्त, ह्रदय, दिल् असंही म्हणतो. जसं एकाच माणसाला नाना, मामा, काका, दादा, बाबा, वगैरे नावांनी ओळखलं जातं, तसं या अंतःकरणाला मन, बुध्दी, चित्त, अहंकार आणि चैतन्य अशी पाच नावं आहेत.

आपल्याकडे पाचाचं कौतुक फार आहे. पंचमहाभूतांपासून जग निर्माण होतं. पृथ्वी (Solid),आप (Liquid), वायू (Gas), तेज (Energy), आकाश-पोकळी (Space) ही ती पाच महाभूतं. या देहात हाता-पायाची पाच पाच बोटं, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पंचप्राण (प्राण, अपान, व्यान, उदान व समान), अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय असे पंचकोश, तसंच अंतःकरण पंचक अशा अनेक गोष्टी आहेत. तसंच पाचामुखी परमेश्वर, म्हणून गावात पंच असतात. महागाईमुळे आपली 'पाचावर धारण' बसते. या पाचानंतर तीनाचं प्रस्थ आहे. उदा.- द्रष्टा-दृश्य-दर्शन, कर्ता-कर्म-कृती, भोक्ता-भोग्य-भोग, ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान, विकार-विचार-वृत्ती, वगैरे. त्यानंतर दोनपणा म्हणजे द्वैत येतं. उदा.- मी-तू पणा, जीव-शिव, शिव-शक्ती, देव-भक्त, ब्रह्म-माया, वगैरे. असा हा पत्त्यातल्या खेळासारखा पाच-तीन-दोनचा खेळ असतो. भक्तीमुळे हा खेळ एकांत म्हणजे एकमेवाद्वितीय अशा परमेश्वरात विलीन होतो. जसा पत्त्यात हुकुमाचा एक्का असतो, तसा हा ईश्वर असतो. फक्त त्याचा बिनचूक पत्ता असावा लागतो. जीवनातले छक्केपंजे सुटल्याशिवाय अंतिम सत्याचा पत्ता लागत नाही. असो.

आता तुझा दुसरा प्रश्न म्हणजे हे अंतःकरण कशानं अशुध्द होतं ? पहिली गोष्ट म्हणजे ईश्वराविषयीचं अज्ञान (अविद्या), त्याचा परिणाम म्हणजे अहंकार व त्यातून निघणारं ममत्व, त्यामुळे स्वतःविषयी व इतर भोगवस्तूंविषयी



Scanned by CamScanner

निर्माण होणारं अयोग्य महत्त्व, त्यातून निघालेले काम, क्रोध, मोह, भीती, द्वेष, मद, मत्सर, चिंता, काळजी, वगैरे विकार, व इच्छा, आकांक्षा, वासना, सुख, दुःख, राग, द्वेष, वृत्ती, वगैरे यांच्यामुळे अंतःकरण अशुध्द होतं.

मी :- बापरे, माझी बायको जशी वाण्याकडे देण्यासाठी सामानाची मोठी यादी देते, तशी तुम्ही तर एक यादीच सांगितलीत की ! आपल्याकडे जसं गिरण्यांच्या धुरामुळं, वाहनातील इंधनामुळं आणि गटारातील घाणीमुळं प्रदूषण निर्माण होतं, तसंच हेही अशुध्दीकरण दिसतंय.

महाराज :- शरीर आणि शहर दूषित होतं म्हणून माणूस प्रदूषणाला दूषण देतो, पण अहंकाराच्या पिल्लावळीमुळे आपलं अंतःकरण दूषित होतं, हे त्याच्या गावीही नसतं. हे आश्चर्य नव्हे काय ? बरं, आता पुढचा प्रश्न काय आहे ?

मी :- थांबा, थांबा, महाराज. अशी घाई करु नका. मी त्या तुपातल्या माशीसारखा अजून या प्रश्नातच गटांगळ्या खात बसलो आहे. वरच्या यादीतल्या एकेका दोषाची नीट सोप्या शब्दात माहिती सांगा. प्रथम अहंकार म्हणजे काय ? व तो कसा निर्माण होतो ते सांगा.

महाराज :- "अहं करोमि" इति अहंकारः। कोठलीही गोष्ट मी करतो आहे, माझ्या इच्छेमुळेच ही गोष्ट घडते आहे असं वाटणं, म्हणजे अहंकार. अगदी स्थूलातील कृतीपासून सूक्ष्मातील सूक्ष्म कृतीपर्यंत हा अहंकार सर्वांना व्यापून असतो. त्याच्या निर्मितीचं प्रमुख कारण म्हणजे ईश्वराच्या गुणधर्मांचं अज्ञान व विस्मरण. ईश्वराचे गुणधर्मच आपल्यात अंशरुपाने उतरले आहेत याचं विस्मरण होऊन ते आपले स्वतःचेच आहेत असं भ्रमानं वाटणं, देवाची देणगी हे आपलंच कर्तृत्व आहे असं वाटणं यातून अहंकार निर्माण होतो.

आठव तो परब्रह्म। नाठव तो भवभ्रम।।

असं एका संतांनी म्हटलं आहे. उदा.- माणसाचं अस्तित्व ईश्वराच्या 'सत्' पासून निर्माण झालं आहे. आणि त्याची बुध्दीत असलेली शक्ती, ज्ञान मिळवण्याची तळमळ ही ईश्वराच्या 'चित्' पासून निर्माण झाली आहे, तसंच जीवाचं स्वतःवर असणारं प्रेम हे ईश्वराच्या सुख-दुःखविरहित अशा आनंदापासून निर्माण झालं आहे, हे आपण मागे पाहिलं आहेच. पण होतं काय? की नेमकं याच गोष्टीचं विस्मरण झाल्यामुळे जीवाला हे आपले स्वयंभू गुणधर्म आहेत असं वाटतं. त्यामुळे हा अहंकार निर्माण होतो. याचं दुसरं कारण म्हणजे जग ही ईश्वराची एकजिनसी पूर्ण अशी



Scanned by CamScanner

निर्मिती असताना आपण तिचे मी व इतर जग असे दोन भाग करतो. मला जगाचं ज्ञान माझ्या इंद्रियांच्या मदतीने बुध्दीमध्ये होत असतं व अन्न-वस्त्र-निवारा या माझ्या जगण्यासाठी आवश्यक असणा-या गरजा भागवण्यासाठी मला या ज्ञानाची व त्यामधुन होणा-या कृतीची आवश्यकता असते. पण हे ज्ञान मला झालं व मी ही कृती केली की मी कोणीतरी विशेष आहे असा भाव मनात निर्माण होणं म्हणजे अहंकार. खरं पाहिलं तर ज्या क्षणी ज्ञान होतं, त्याच्या पुढच्या क्षणी अहंकाराची निर्मिती झालेली समजते. आणि त्याच्या पुढच्या क्षणी कृती घडते. उदा.- मला कोणी म्हटलं की, "तुम्ही फार हुशार आहात बुवा !" हे शब्द माझ्या कानावर पडतात. बोलणारा गृहस्थ माझी स्तुती करतो आहे, हे ज्ञान मला स्मृतीच्या सहाय्यानं होतं आणि माझा अहंकार जागृत होऊन मी कोणीतरी विशेष आहे असं मला वाटल्यामुळे माझ्या ठिकाणी सुखाची वृत्ती निर्माण होते. मला खूप बरं वाटतं. माझा चेहराही हसरा होतो. मी वरकरणी काहीतरी "अहो, कसचं, कसचं? आहे झालं आमचं गरीबाचं काहीतरी ", असं पुटपुटत असतो. पण मनातून मात्र त्यानं माझी अशी बराच वेळ स्तुती करावी असं मला वाटत असतं. आता या क्षणी म्हणजे स्तुती ऐकण्याच्या क्षणी मला ईश्वराचं स्मरण असतं तर मी मूळात हुशार आहे का ? आणि असल्यास कितपत हुशार आहे ? याचं यथायोग्य ज्ञान आणि त्याचबरोबर माझी हुशारी (असल्यास) ही ईश्वराची निर्मिती आणि त्याचीच कृपा आहे, हेही ज्ञान मला झालं असतं व त्यामुळे माझी स्तुती ऐकताना माझ्या ठिकाणी अहंकार, त्यातून निर्माण झालेली सुखाची वृत्ती व तिचं सातत्य म्हणजे ही वृत्ती जास्तीत जास्त वेळ टिकावी असं वाटणं या गोष्टी निर्माण झाल्या नसत्या. थोडक्यात मी कोणीतरी विशेष आहे या विचारातून म्हणजे कर्तृत्व व भोक्तृत्वातून अहंकार निर्माण होतो. समजलं का ?

मी :- होय, समजलं महाराज. आता हे उमजायला जरा वेळ लागेल, पण पुढे सांगा.

महाराज :- अहंकारातून मग ममत्व म्हणजे माझं-तुझं निर्माण होतं. आणि माझ्या मालकीच्या वस्तूला मी नको तेवढं महत्त्व द्यायला सुरूवात करतो. मी, माझी माणसं आणि माझ्या वस्तू एका बाजूला आणि बाकी सर्व जग हे दुस-या बाजूला, अशी जगाची मी आणखीनच विभागणी करतो. आणि माझ्या वस्तूंचा आणि माणसांचा उपभोग घेत असतानाच उरलेलं जगही माझ्या उपभोगासाठी आहे असं मी मानतो. उदा.- या उरलेल्या जगातील एखादी वस्तू मी पाहतो. ती मला सुंदर वाटते.

ती वस्तू माझ्याकडे असावी अशी माझ्या मनात वासना निर्माण होते. मग मी ती वस्तू पैसे देऊन विकत तरी घेतो किंवा इतर भल्या-बु-या मार्गाने मिळवतो. म्हणजे इतर जगातील वस्तू आता माझ्या मालकीची होते, म्हणजे माझ्या भागात येते. अशा त-हेने मी-पणाचा विस्तार ममत्वाच्या माध्यमातून वाढत असतो. आता आपल्याला आवडलेली वस्तू जास्तीत जास्त काळपर्यंत आपल्या मालकीची असावी असं आपल्याला वाटतं, व त्यासाठीही आपण प्रयत्न करत असतो. थोडक्यात आपल्या वस्तूंना जास्त महत्त्व व इतर वस्तूंना कमी महत्त्व किंवा लघुत्व देत असतो. आपला तो बाब्या आणि लोकाचं ते कारटं अशी म्हण आहे. या अहंकाराची २७ प्रमुख लक्षणं आहेत.

मी :- अगदी २७ नक्षत्रं असल्यासारखीच आहेत म्हणता ?

महाराज :- ईश्वरी ज्ञानाचा पूर्णचंद्र ज्या दिवशी उगवतो, त्या पौर्णिमेला या २७ नक्षत्रांचा लोप झलेला असतो. पण जसं जसं ईश्वरी स्मरणाचं महत्त्व कमी होत जातं, तसं तसं ही अहंकार-लक्षणंरुपी नक्षत्रं आपल्या जीवनाच्या आकाशात धुमाकूळ घालू लागतात. ही सगळी लक्षणं मी सांगत बसत नाही. काही ठळक लक्षणं मात्र सांगतो.

१) मी कोणीतरी महत्त्वाचा विशेष माणूस आहे व हे महत्त्व मला टिकवून धरायचं आहे.

२) माझं कधीच चुकत नाही, चुकतं ते नेहमी दुस-याचं.

३) मला सदैव सुख हवं असतं व दुःख नको असतं व त्यासाठी माझा सतत प्रयत्न चालू असतो.

४) दुस-यांच्यामुळे मला दुःख होतं व त्याची प्रतिक्रिया म्हणून मला दुस-याला दुःख द्यावं असं वाटतं.

५) माझं जीवन हे चार गोष्टी मिळवण्यासाठी आहे. सुख, मालकी, फायदा आणि मनःशांती. **(Pleasure, Possession, Profit and Peace)**

६) माझ्या मनासारखं सर्वांनी वागावं असं मला वाटतं.

७) मला इतरांच्यावर मालकी गाजवावी असं वाटतं.

मला वाटतं इतकी लक्षणं बस झाली. सुखाच्या सातत्याच्या हव्यासासाठी त्याला मालकी हवी असते. या मालकीच्या कल्पनेतूनच मग ती वस्तू मिळवावी अशी इच्छा निर्माण होते व ती वस्तू ज्याच्याकडे आहे त्याच्याविषयी मत्सर निर्माण होतो. वेळप्रसंगी ती वस्तू अयोग्य मार्गानंसुध्दा मिळवावी असा मोह निर्माण



Scanned by CamScanner

होतो. ही इच्छा पुरी होऊन वस्तूची मालकी मिळाली, की मी कोणीतरी मोठा आहे असा गर्व म्हणजे मद निर्माण होतो. आपली ही वस्तू कोणी हिरावून तर घेणार नाही ना याची भीती वाटू लागते आणि ही इच्छा पुरी झाली नाही तर ज्याच्यामुळे ती पुरी होऊ शकली नाही, त्याच्याविषयी मनात क्रोध निर्माण होतो.

अशा त-हेने एका भगवंताच्या विस्मरणातून अहंकार, ममत्व, अयोग्य महत्त्व, सुखाचा हव्यास, तसंच मालकी, फायदा याचं आकर्षण, त्यातून काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, भिती, चिंता, काळजी वगैरे गोष्टींचा जन्म होतो व या सर्व गोष्टींनी आपलं अंतःकरण मलिन होत असतं.

मी :- महाराज, मन, बुध्दी, चित्त, अहंकार आणि चैतन्य हे अंतःकरण पंचक आहे असं आपण म्हणालात, त्याचा अर्थ काय ?

महाराज :- आपल्या अंतःकरणाच्या वेगवेगळ्या कार्यांना ही नावं दिली आहेत.

"संकल्प-विकल्पात्मकं मनं।" जेव्हा असं असेल का, तसं असेल का अशा चांगल्या वाईट कल्पना चालू असतात, तेव्हा त्याला मन असं म्हणतात.

"निश्चयात्मिका बुध्दिः।" एखाद्या गोष्टीचा निश्चय झाला, की ते बुध्दीचं कार्य गणलं जातं.

"चिंतनं तु चित्तं।"जेव्हा एखाद्या विषयाचं चिंतन चालू असतं, तेव्हा त्याला चित्त असं म्हणतात.

"अहं करोमि इति अहंकारः।" माझ्यामुळे हे सगळं घडतं, असं वाटणं हा अहंकार.

वरील चारही गोष्टींचा जेव्हा अभाव असतो, तेव्हा फक्त जाणण्याची स्थिती किंवा जाणीव असते. तिला चैतन्य असं म्हणतात. या अवस्थेत अंतःकरण शुध्द होऊ लागतं. या स्थितीचं महत्त्व आपल्याला वाटू लागलं, की ही स्थिती प्राप्त होऊन जास्तीत जास्त वेळ टिकावी यासाठी आपला जो प्रयत्न सुरु होतो, त्याचं नाव भक्ति-साधना.

आपल्याकडे तीन प्रकारची प्रचीती सांगितली आहे. शास्त्र प्रचीती,गुरू प्रचीती, आत्म प्रचीती. उदा.- अमेरिका नावाचा मोठा देश आहे, असं भूगोलाच्या पुस्तकात लिहीलेलं असतं हे विद्यार्थी खरं मानतो. याला शास्त्र प्रचीती म्हणतात. एखादा माणूस अमेरिकेला जाऊन येतो, तेव्हा तो अमेरिकेविषयी जी माहिती सांगतो, ती विद्यार्थ्याला जास्त जवळची, खरी व महत्त्वाची वाटते. ही झाली गुरू प्रचीती व नंतर जेव्हा या विद्यार्थ्यांला अमेरिकेला जाण्याचा योग येतो, तेव्हा त्याला अमेरिका



Scanned by CamScanner

डोळ्यांनी दिसते, ही झाली आत्म प्रचीती.

तसंच देव जरी इंद्रियांच्या शक्तीच्या पलिकडे असला तरी तो आहे असं शास्त्रात लिहीलं आहे, तसंच त्याच्याशी एकरुप झालेली गुरूतुल्य माणसं आपल्याला दिसतात. त्यांच्यावर विश्वास ठेऊन आपण साधना केली की आपल्यालाही त्याची प्रचीती येऊ लागते.

मी :- महाराज, नवविधा भक्तीविषयी काहीतरी सांगा.

महाराज :- नवविधा भक्तीचा नेहमीचा देवाच्या सगुण, साकार मूर्तीसंबंधीचा अर्थ तुला माहित आहेच. पण मी जरा वेगळा अर्थ सांगतो, ऐक.

१) श्रवण : देव हा अनंत, अविनाशी, सर्वव्यापी व सर्वज्ञानी असा आहे व मी त्याचा अंश आहे हे अनुभवी व्यक्तीकडून ऐकणे.

२) कीर्तन : तसंच हे इतरांना त्यांची इच्छा असल्यास समजावून सांगणे.

३) विष्णु-स्मरण : आपलं सारं जीवन हे भगवंताच्या आधारावर, त्याच्या कृपेनं आणि इच्छेनं चालत आहे याचं सतत स्मरण ठेवणं.

४) पादसेवन : मी आणि उरलेलं जग हे भगवंताचे दोन चरण आहेत, ही जाणीव सतत ठेवणं. ईश्वराच्या चरणाच्या धुळीपेक्षाही माझी बुध्दी खालच्या पातळीवर आहे, याची सतत जाणीव ठेऊन अहंकाराचं निर्मूलन करणं आणि जितकं प्रेम मी माझ्यावर करतो, तितकं प्रेम इतर जगावर करणं.

५) अर्चन : आपला ज्याच्याशी संबंध येईल, त्याचा आधार भगवंत आहे, तो स्वतः भगवंताचं एक रूप आहे व हा भगवंत आपल्याला पूजनीय आहे ही जाणीव सतत असणं.

६) वंदन : आपली पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये हीच जणू काही हाताची दहा बोटे आहेत अशी भावना ठेऊन दोन हस्तक आणि एक मस्तक म्हणजे ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये व बुध्दी यांनी त्या भगवंताच्या कार्यात मदत करणं.

७) दास्य : सर्वज्ञानी परमेश्वरासमोर आपल्या मोडक्या तोडक्या ज्ञानानं व कृतीनं निर्माण होणारा अहंकार हा पै किंमतीचासुध्दा नाही हे जाणून भगवंताच्या इच्छेतच आपली इच्छा मिसळून टाकणं. आपल्याला त्याहून वेगळी इच्छा नसणं, तसंच आपल्यातल्या जीवानं दुस-या माणसातल्या ईश्वराची सेवा करणं.

८) सख्य :- भगवंताची निर्निती म्हणजे हे विश्व आणि आपण यांत सहकार्य किंवा मैत्री असणं.



Scanned by CamScanner

९) आत्मनिवेदन : ईश्वराला पूर्णपणे जाणून त्याच्याशी एकरुप होऊन जाणे.

मी :- महाराज, ही शेवटची आत्मनिवेदन भक्ती मला नीटशी समजली नाही. ती जरा सोप्या भाषेत समजावून सांगाल का ?

महाराज :- ही भक्ती तीन पाय-यांमध्ये करता येते. मी व माझं हे सगळं भगवंताचं आहे हे समजणं ही पहिली पायरी. ईश्वर हा विश्वव्यापक असून तोच खरा कर्ता आहे आणि माझ्यासकट प्रत्येक जीव हा त्याचाच अंश आहे हे जाणणं ही दुसरी पायरी. ईश्वराच्या निराकार, निश्चल व परमशांत अशा रूपाशी, आपला मीपणा नाहीसा करुन एकरूप होणं ही तिसरी पायरी. या तीनही पाय-यांवरची साधना पूर्ण झाली की आत्मनिवेदन भक्ती घडते.

आता या नवविधा भक्तीपैकी ज्याला आपल्या पूर्वसंस्कारानुसार जशी आवड असेल, त्याप्रमाणे कोणतीही भक्ती करुन तिचा आनंद लुटावा व आपली अंतःकरणशुध्दी करुन घ्यावी. मग त्यात विश्वंभराचं व विश्वाचं प्रेम आपोआप प्रकट होईल.

मी :- महाराज, यात आपली नेहमीची मूर्तिपूजा कोठे बसते ?

महाराज :- मूर्तिपूजा हा सगुण, साकार भक्तीचाच एक प्रकार आहे. त्यात पादसेवन, अर्चन आणि वंदन या भक्तीच्या तीन प्रकारांनी देवाशी जवळीक साधता येते.

मी :- महाराज, मूर्तिपूजेची गरज आपल्याला का भासते ?

महाराज :- हे पहा, तू जेव्हा एकटा गावाला जातोस, तेव्हा तुझ्या बायको-मुलांचे फोटो बरोबर घेऊन जातोस की नाही ? आणि तिकडे थोडासा मोकळा वेळ मिळाल्यावर त्या फोटोंकडे टक लावून पहात बसतोस की नाही ? तुला जशी फोटोची गरज भासते, तशी भक्ताला सुरुवातीला मूर्तीची गरज असते. माणसाला या त्रिमिती जगाचं ज्ञान इंद्रियांच्या द्वारा व बुध्दीच्या मदतीने होत असल्यामुळे त्याला ईश्वराचं रूपसुध्दा त्रिमिती स्वरुपात व इंद्रियगोचर असं हवं असतं. म्हणून त्याला भगवंताच्या भक्तीसाठी मुलाच्या, स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या रूपातली मूर्ती हवी असते. म्हणून आपल्याला कोठे लंगडा रांगणारा बाळकृष्ण किंवा मुरलीधर, तर कोठे अंबाबाई, महालक्ष्मी, कालीमाता तर कोठे शेषशायी महाविष्णु, धनुर्धारी मर्यादापुरुषोत्तम राम किंवा योगेश्वर श्रीकृष्ण इत्यादींच्या मूर्ती पहायला मिळतात. या मूर्तींची पंचोपचारे किंवा षोडशोपचारे पूजा करुन माणूस भक्ती करत असतो. या पूजेमध्ये आपण इंद्रियांच्या द्वारा व्यवहारात ज्यांचा उपभोग घेत असतो, अशा सा-या वस्तू आपण देवाला अर्पण करीत असतो.



Scanned by CamScanner

म्हणजे आपली त्या वस्तूत असलेली आसक्तीच, अनासक्त व अतींद्रिय अशा देवाच्या चरणी आपण अर्पण करत असतो. उदा.- त्याला उन्हाळ्यात गार पाण्यानं व थंडीत गरम पाण्यानं स्नान घालून गंध व अत्तर लावतो. त्याला अक्षता व फुलं वाहतो. त्याच्यासमोर उदबत्ती लावतो व त्याला निरांजनानं ओवाळतो. त्याला नैवेद्य अर्पण करतो. त्याच्यासमोर पैसे ठेवतो. याचा अर्थ देवाची मूर्ती जणू काही आपल्याइतकीच जिवंत आहे अशा भावनेनं त्याच्यावर निष्काम व निरपेक्ष असं प्रेम केलं पाहिजे म्हणजे देव्हा-यातील ही मूर्ती कालांतरानं आपल्या अंतःकरणात प्रकट होते. यासंबंधी एक कथा सांगतो.

एकदा एका माणसानं रामाची भक्ती करायची ठरवली. त्यासाठी त्यानं बाजारातून धनुर्धारी रामाची एक मूर्ती विकत आणली व त्याची पूजाअर्चा, स्तोत्र-पठण, जपजाप्य वगैरे करायला सुरुवात केली. असं पाच वर्ष चाललं होतं. पण राम काही त्याच्यावर प्रसन्न होईना. शेवटी तो वैतागला व त्यानं रामाच्याऐवजी कृष्णाची भक्ती करायची ठरवली. बाजारातून त्यानं एक मुरलीधर कृष्णाची मूर्ती विकत आणली. रामाची मूर्ती उचलून वरच्या कोनाड्यात ठेऊन दिली व देव्हा-यात आता कृष्णाची मूर्ती स्थापन केली. कृष्णासमोर सुगंधी उदबत्ती लावली. पण त्याच्या असं लक्षात आलं की उदबत्तीचा वास रामाच्या मूर्तीच्या दिशेनं जात आहे. मी इतके दिवस रामाची भक्ती केली, पण त्यानं माझी काहीच कदर केली नाही. तेव्हा अशा या कृतघ्न रामाला उदबत्तीचा वासदेखील मिळता कामा नये असा सूज्ञ विचार करुन त्यानं उदबत्तीचं तोंड विरुध्द दिशेला वळवलं आणि "हे कृष्णा, या रामाची पाच वर्ष भक्ती केली पण तो काही प्रसन्न झाला नाही. म्हणून मी आता तुझी भक्ती करायला सुरुवात केली आहे. आता तू तरी माझ्यावर कृपा कर." असं म्हणून त्यानं हात जोडले व डोळे मिटले, तो काय चमत्कार झाला. त्याला साक्षात् रामप्रभूंनी दर्शन दिलं. त्याच्या आनंदाला सीमा राहिली नाही. तो म्हणाला, "प्रभू, इतके वर्ष मी तुमची भक्ती करतो आहे पण तुम्ही मला कधी दर्शन दिलं नाही पण आज तुमची भक्ती करायची नाही असं ठरवल्यावर मात्र तुम्ही साक्षात् दर्शन दिलंत. हे कसं काय ?" त्यावर प्रभू हसून म्हणाले, "अरे, इतके दिवस तू भक्ती केलीस ती माझ्या निर्जीव मूर्तीची होती. आज माझी मूर्ती सजीव आहे हे तुला समजलं म्हणून मला सुगंध मिळू नये यासाठी तू उदबत्तीचं तोंड फिरवलंस. त्या क्षणी तुझी पाच वर्ष केलेली भक्ती सफळ झाली. म्हणून मी तुझ्यासमोर प्रकट झालो."



Scanned by CamScanner

तेव्हा सांगायचा हेतू असा की अशा त-हेनं देव्हा-यातील मूर्ती आपल्या ह्रदयात प्रकट झाली की तिच्याविषयी आपल्या ह्रदयात प्रेम निर्माण होतं व त्याचा वर्षाव सा-या विश्वावर होऊ लागतो. मग "कांदा, मुळा, भाजी। अवघी विठाबाई माझी।।" अशी सावता माळ्यासारखी त्याची स्थिती होते. मग तो सर्वगुण व नंतर निर्गुण भक्ती करु लागतो. "सगुणाचेनि आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे।।" असं समर्थांनी म्हटलं आहे.

सगुण भक्ती कशी करु नये याविषयी एक गोष्ट सांगतो. एक श्रीमंत फौजदार होते. त्यांच्या तोंडातून नेहमी शिव्यांचा भडिमार होत असे. त्यांना देवपूजेचा खूप षौक होता. पूजेचा थाट काही विचारु नका. उत्तमपैकी पितांबर, वर उत्तरीय वस्त्र, शिवाय पूजेची भरपूर उच्च प्रतीची सामुग्री. चांगली तासभर साग्रसंगीत पूजा चालायची. आश्चर्य म्हणजे एरवी एवढी वटवट करणारे हे गृहस्थ पूजेच्या वेळी मात्र मौन पाळायचे. पूजेच्या देवात लंगडा बाळकृष्ण होताच. एक दिवस काय झालं ? एका चोराला त्यांच्या हाताखालच्या पोलिसांनी पकडला आणि त्याला काय शिक्षा करायची हे विचारण्यासाठी एक पोलिस साहेबांच्या घरी आला. त्याला साहेबांचा हुकूम काय आहे हे हवं होतं. नेमकी त्याच वेळी साहेबांची पूजा चालू होती, आणि साहेबांचं मौन पण ! साहेबांच्या मनातला फौजदार खडबडून जागा झाला. त्यांनी देवपूजेचा नाद सोडून पोलिसाला खाणाखुणांनी समजावून सांगायला सुरुवात केली. पण पोलिसाच्या डोक्यात प्रकाश पडेना. तेव्हा फौजदार खवळले. त्यांनी ताम्हनातला चांदीचा बाळकृष्ण उचलला. त्याच्या अंगाला आपल्या जान्हव्याचे चांगले ४-५ वेढे घातले, आणि त्याच्या पार्श्वभागावर आपल्या हातातल्या चांदीच्या पळीने जोरात फटके मारले. आता सर्वव्यापी आणि सर्वज्ञानी ईश्वर फौजदारसाहेबांसमोर निर्जीव मूर्तीच्या स्वरुपात असल्यामुळे त्याने ते फटके निमूटपणे सोसले. आता मात्र पोलिसाच्या ध्यानात आलं की चोराच्या मुसक्या बांधा आणि त्याला मरेपर्यंत बडवून काढा असं साहेब सांगताहेत. साहेबाच्या भक्तीची मनातल्या मनात तारीफ करत तो आपल्या कामाला निघून गेला. आता याला भक्ती म्हणायची का ?

मी :- महाराज, भक्ती कशी करु नये यावर आपण छान गोष्ट सांगितलीत. पण भक्ती कशी करावी यावर एखादी छोटीशी गोष्ट सांगा ना !

महाराज :- एका गुरूने आपल्या शिष्याला अनुग्रह दिला व साधनेत जप करण्यासाठी 'सो ऽ हं' हा मंत्र दिला. सो ऽ हं म्हणजे मी 'तो' (ईश्वर) आहे. काही कालानंतर गुरू-शिष्यांची भेट झाली तेव्हा गुरूच्या लक्षात आलं, की सो ऽ हं या



Scanned by CamScanner

जपामुळे शिष्याचा अहंकार कमी होण्याऐवजी वाढतच आहे. एक औषध रोगावर लागू पडलं नाही, की डॉक्टर जसा औषध बदलून देतो, तसं गुरूनं त्याच्या सो ऽ हं च्या मागे 'दा' हे एक अक्षर लावून टाकलं. त्यामुळे तो मंत्र आता 'दासो ऽ हं' असा झाला. त्यामुळे आता त्याचा अर्थ 'मी त्याचा दास आहे' असा झाला. पुन्हा काही कालानंतर गुरूच्या लक्षात आलं, की आपला शिष्य फक्त साधनेच्या काळातच स्वतःला (सो ऽहं) मी 'तो' आहे असं मानतो व इतर वेळी तो स्वतःला (दासो ऽहं) मी 'त्याचा' दास आहे असं मानतो. म्हणून त्यानं आणखी एक 'स' हे अक्षर मंत्राच्या मागे लावलं. म्हणून आता तो 'सदासो ऽ हं' असा मंत्र झाला. व मी सदैव 'तो' आहे असा त्याचा अर्थ झाला. काही काळानंतर या मंत्राच्या जपामुळे शिष्याचा अहंकार पुन्हा वाढत असल्याचा संशय गुरूला आला. म्हणून त्यानं आणखी एक 'दा' मंत्राच्या मागे लावला. आता तो मंत्र 'दासदासो ऽ हं' असा झाला. त्याचा जप केल्यावर व्यवहारात 'मी त्याच्या दासाचाही दास आहे' असा त्याचा अर्थ मनात पक्का झाला. व मी 'सदैव' तो आहे ही त्याची भावना अहंकार न येता स्थिर झाली. यावर आणखी एक गोष्ट मला आठवली. तीही तुला सांगतो.

मी :- म्हणजे अरेबियन नाईट्सच्या गोष्टीतून गोष्ट निघते तसं झालं. बरं, पुढे सांगा.

महाराज :- गोष्ट तू वाचली असशीलच. गजेंद्र नावाचा एक हत्ती होता. तो पाणी पिण्यासाठी एका नदीत उतरला असताना एका शक्तीशाली मगरानं त्याचा पाय आपल्या जबड्यात पकडला. व तो त्याला पाण्यात खेचू लागला. तेव्हा गजेंद्रानं मनोमन भगवान् विष्णूचा धावा केला. सरोवरातील कमळं सोंडेनं उपटून त्याना वाहिली. भगवान् विष्णू प्रकट झाले व त्यानी त्या गजेंद्राला सोडवले. व मोक्ष प्राप्त करुन दिला. या कथेला गजेंद्रमोक्ष असं नाव आहे. नंतर दोघेही वैकुंठाला निघाले असताना "भगवन् थांबा !" असा त्यांना पाण्यातून आवाज आला. भगवंतांनी मागं वळून पाहिलं तर तो मगर त्यांची प्रार्थना करत होता, असं त्यांना दिसलं. तो म्हणत होता, "भगवन्, मी तर असं ऐकलं आहे की जे भक्त आपले दास म्हणून आपले पाय धरतात, त्यांचा तर आपण उध्दार करताच. पण जे भक्त आपले दासानुदास म्हणजे आपल्या दासांचेही दास म्हणून आपल्या भक्तांचे पाय धरतात, त्यांचाही आपण उध्दार करता, होय ना ? " भगवान् विष्णू म्हणाले, "होय." "मग मी तर केव्हापासूनच आपल्या भक्ताचे पाय (माझ्या तोंडात) धरुन राहिलो आहे. मग आपण मला



Scanned by CamScanner

सोडून कोठे निघालात ? आपण कृपया माझाही उध्दार करा व मलाही वैकुंठाला घेऊन चला." यावर मगरानं आपल्याला शब्दात बरोब्बर पकडलं हे पाहून भगवान् हसले व त्या मगरालाही ते बरोबर घेऊन गेले.

मी :- महाराज, आज इतकं पुरे. बाकीचं पुढच्या वेळी विचारीन.

महाराज :- ये बरं. नीट जपून जा हं.

-----ooooooo-----



Scanned by CamScanner

# प्रकरण सहावे

# नामस्मरण - प्रक्रिया

मी :- महाराज, मी येऊ का ?

महाराज :- ये नं, आज कुठला प्रश्न आणला आहेस ?

मी :- महाराज, आज मला नवविधा भक्तीपैकी सोप्यातली सोपी व जी कोणालाही, कोठेही व कधीही करता येईल अशी भक्ती कोणती व ती कशी करायची ते समजावून सांगा.

महाराज :- (हसत) म्हणजे तुला आखूड शिंगाची, लाथ न मारणारी, जास्त दूध देणारी, कमी चारा खाणारी व कोणीतरी तुला दान दिलेली अशी कपिला गाय पाहिजे. पण तू म्हणतोस तशीही एक सोप्यातली सोपी भक्ती आहे. ती म्हणजे नवविधा भक्तीतली तिसरी भक्ती. "विष्णोः स्मरणम्" म्हणजे ईश्वराच्या नामाचं स्मरण. या भक्तीच्या प्रसारासाठी गोंदवलेकर महाराजांनी आपला सारा जन्म वेचला.

मी :- महाराज, इथे विष्णूचं स्मरण असं का म्हटलं आहे ?

महाराज :- कारण आपल्या शास्त्रात ब्रह्मदेव हा निर्माता तर शंकर हा संहारकर्ता व विष्णू हा देव पालनकर्ता म्हणून गणला गेला आहे. आता आपण जिवंत आहोत म्हणून आपण नामस्मरण करू शकतो व स्वतःचा उध्दार करुन घेऊ शकतो. आपण भगवान् विष्णूच्या कृपेनं जिवंत आहोत म्हणून आपण विष्णूचं स्मरण करावं यासाठी या श्लोकात "विष्णोः स्मरणम्" हा शब्द वापरला आहे. या शब्दाचा अर्थ कोठल्याही नामानं केलेलं स्मरण, हे शेवटी भगवान् विष्णूपर्यंत पोहोचतंच.

आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम्।
सर्व देव नमस्कारः केशवं प्रति गच्छति।।

अर्थ- जसं आकाशातून पडलेलं पावसाचं पाणी सागराला जाऊन मिळतं, तसं कोठल्याही देवाला केलेला नमस्कार हा केशवाला म्हणजे कृष्णाला म्हणजेच विष्णूच्या अवताराला पोहोचतो.

मी :- महाराज, हिला तुम्ही सोप्यातली सोपी भक्ती का म्हणता ?

महाराज :- कारण इतर प्रकारच्या भक्तीसाठी कोणत्या ना कोणत्या बाह्य वस्तूंची गरज असते. उदा.- सत्यनारायणाची पूजा करायची किंवा घालायची



Scanned by CamScanner

किंवा हल्लीच्या भाषेत करुन टाकायची असली की त्यासाठी भटजी, मूर्ती, तांब्या, चौरंग, सुपा-या, केळीचे खुंट, फुलं, पानं, तांदूळ, तुळशी, पंचामृत, तीर्थ, सव्वा किलो प्रसाद, पोथी, त्यातील साधू वाण्याची बुडालेली नौका वर काढण्यासाठी उत्सुक असलेले तुरळक श्रोतेजन, लोकांच्या कानठळया बसतील इतक्या 'लहान' आवाजात लावलेला लाऊडस्पीकर, गाण्यांच्या रेकॉर्ड्स् इतक्या सर्व गोष्टींची गरज असते. तसंच नमस्कार करायचा असला, की हातांची आणि डोक्याची किमान गरज लागते. पण या भक्तीत कोठल्याही बाह्य उपाधीची गरज नसते. जीव व शिव यांना जोडणारा दुवा व भवरोगावर लागू पडणारा अचूक व रामबाण इलाज म्हणजे "देवाचं नामानं स्मरण."

मी :- महाराज, आता आपण 'भवरोग' हा शब्द वापरलात, त्याचा अर्थ काय ? आणि नामाचं औषध त्यावर कसं लागू पडतं ?

महाराज :- भू-भव म्हणजे होणं. माणसाच्या मनात आहे त्यापेक्षा काहीतरी वेगळं होण्याची किंवा करण्याची इच्छा असणं. मूळात भगवंताचं सत्-रुपी लक्षण, त्यापासून जीवाचं अस्तित्व निर्माण होतं, व भगवंताच्या विस्मरणामुळे या अस्तित्वापासून म्हणजे भगवंताच्या मूळ स्वरुपापासून वेगळं होऊन काहीतरी निराळं करण्याची उर्मी माणसाच्या मनात निर्माण होते. तिला सा-या संतांनी भवरोग म्हणजे काहीतरी वेगळं होण्याचा रोग असं म्हटलं आहे. रोग म्हणण्याचं कारण असं की आपली प्रकृती निरोगी असली की आपण स्वस्थ असतो. व एखादा रोग झाला असला की आपण बेचैन होतो, अस्वस्थ होतो. तसं माणसाला काही न करता स्वस्थ बसवत नाही. तो बेचैन होतो. काही ना काही उपद्व्याप करावेसे वाटतात.

रिकामा न्हावी। आणि भिंतीला तुंबड्या लावी।।

अशी आपल्याकडे म्हणच आहे. किंवा हल्लीची म्हण-

रिकामा पुढारी। कारखाना बंद करी।।

अशा भवरोगावर औषध म्हणजे नामस्मरण. इ.स. पूर्वी २००० वर्षे, मनाचे प्रख्यात धन्वंतरी भगवान् पतंजली यांनी आपल्या पातंजल योगसूत्रात हे सांगून ठेवलं आहे. "तत् जपः तदर्थ भावनम्।" ईश्वराच्या नामाचा अर्थ नीट समजावून घेऊन त्या भावनेने त्याच्या नामाचा जप केल्यास ईश्वरप्राप्ती होते असं भगवान् पतंजली म्हणतात. म्हणजे योगशास्त्राने नामस्मरणाच्या मार्गाची ही केलेली प्रशंसा आहे. देवाच्या नामाचा अर्थ म्हणजे तो सर्वव्यापी, अविनाशी, अनंत, सर्वज्ञानी सच्चिदानंद स्वरुपाचा असून मी त्याचा अंश आहे. माझ्यासकट सारं जग ही त्याची निर्मिती आहे.



Scanned by CamScanner

हे विश्व त्याचंच स्वरुप असून त्यात त्याच्या शक्तीची लीला चाललेली असते, व त्याचा संकल्प प्रकट होत असतो. हा नामाचा अर्थ नीट लक्षात घेऊन त्या नामाचा ध्यास लागणं म्हणजे भगवंताचं ध्यान करणं. कारण ध्यान या शब्दात ध्यास या शब्दाचा अर्थ अभिप्रेत आहे. म्हणजे अंतःकरणात रुपाचं ध्यान होत नसलं तरी वाचेनं नाम घेऊन झालं तरी चालेल. "चित्ती नसे तरी नसो। परी वाचे तरी असो।।" असं तुकाराम महाराजांनी म्हटलं आहे.

मी :- महाराज, सामान्य, संसारी माणसाला आकर्षण वाटेल, असं नामस्मरणात काय आहे ?

महाराज :- संसारी माणसाला कोणतीही गोष्ट सोडायची जीवावर येते. कारण योग म्हणजे नवीन गोष्ट जोडणे आणि क्षेम म्हणजे जोडलेल्या गोष्टी सांभाळणे, त्याचा नीट वापर करणे, याला योगक्षेम असं म्हणतात. तर संसारी माणसाला योगक्षेमात कोठलीही गोष्ट सोडणे हे बसत नसल्यामुळे ज्यांत काहीही न सोडता नवीन गोष्ट जोडता येईल, असं भक्तीचं साधन त्याला आवडतं. नामस्मरणात कोठलीही गोष्ट मुद्दाम सोडावी लागत नाही व अनायासे भगवंत जोडला जातो. म्हणून संसारी माणसाला आवडणारं साधन म्हणजे नामस्मरण.

मी :- महाराज, नाम म्हणजे काय ?

महाराज :- नाम म्हणजे देवाचं नाव. बाह्य वस्तूचं ज्ञान, इंद्रियाद्वारा बुध्दीत झाल्यावर ते स्मृतीत जातं. हे ज्ञान व्यवहारात उपयोगात आणता यावं, हे ज्ञान लहान मुलालासुध्दा देता यावं, म्हणून आपण प्रत्येक वस्तूला नाव दिलं आहे. हे वाचेनं उच्चारता येणं, डोळ्यांनी लिहिलेलं पाहता येणं, आणि कानांनी ऐकता येणं म्हणजे नामाचं ज्ञान होणं. लहान मुलांची शिक्षणाची प्रक्रिया ही शब्दांवर आधारलेली असते. भगवंताने निर्माण केलेल्या वाणीमुळे आपण वेगवेगळे ध्वनी उच्चारतो. या ध्वनीपासून सूरही बनतात व अक्षरंही बनतात. सुरांचं संगीत बनतं तर अक्षरांचे शब्द, त्यापासून वाक्य व त्यापासून भाषा निर्माण होते. या भाषेमुळे आपले अनुभव व घडलेले प्रसंग आपण इतरांना सांगू शकतो. म्हणून नाव हे वस्तूचं प्रतीक आहे. कारण या नावात वस्तूचे सारे गुणधर्म एखाद्या कुपीतील अत्तरासारखे ठासून भरलेले असतात. प्रत्येक देशाची वेगळी भाषा असते. पण तोंडी भाषा अनेक असल्या तरी अंतःकरणाची भाषा मात्र एकच असते. ती म्हणजे माणसाला स्वतःविषयी, देवाविषयी आणि त्याच्या निर्मितीविषयी म्हणजे या विश्वाविषयी वाटणारं प्रेम हे या हृदयाच्या

भाषेतून निर्माण होतं.

आलेल्या अनुभवांचे संस्कार या शब्दांच्या माध्यमातून बुध्दीत निर्माण होतात, त्यातून भावना चेतवल्या जातात. प्रत्येक शब्दाला त्याची भावना जोडली जाते. उदा.- मूर्खपणा हा शब्द. आपण एखाद्याला तू मूर्खपणाने वागलास असं म्हटलं की तो रागाने लाल होतो. याउलट नव-याने बायकोला तू किती सुंदर दिसतेस असं म्हटलं की तिच्या गालावर अनुरागाने लज्जेची लाली फुलते. तसंच शब्दामुळे आणखीन् एक गोष्ट घडते. ती म्हणजे मनात विचार निर्माण होतात. मनातल्या मनात उच्चारलेली भाषा म्हणजे विचार. हे विचार नेहमी भूतकाळासंबंधी किंवा भविष्यकाळाबद्दल असतात. भूत आणि भविष्य हे शब्दसुध्दा भू-भव या धातूपासून झालेले आहेत. भूत म्हणजे घडलेलं आणि भविष्य म्हणजे पुढे घडू शकेल असं. त्यामुळे घडणारा प्रत्येक प्रसंग हा भविष्यातून वर्तमानात, वर्तमानातून भूतकाळात म्हणजे स्मृतीत बंदिस्त होऊन बसतो. तर सांगायची गोष्ट हे विचार आवश्यकतेनुसार मनात निर्माण होत असतात. पण त्याचा पगडा मनावर इतका बसतो, की अनावश्यक विचार करणं तसंच एखाद्या माकडाप्रमाणे एका विचाराकडून दुस-या विचाराकडे वळणं हे मनाला एक व्यसनच लागून बसतं. त्यामुळे मनाला स्वस्थता किंवा शांतता मिळतच नाही. जरा मोकळा वेळ मिळाला की माणूस भूतकाळातील दुःख आठवून यासंबंधात इतरांना दोष तरी देत बसतो किंवा भविष्यकाळात कसं होईल, याची चिंता किंवा आपल्या इच्छेप्रमाणं घडावं असं स्वप्नरंजन करत बसतो.

हनुमंताने श्रीरामांकडे फक्त राम-नाम मागितलं. त्याचं कारण त्यानं सांगितलं की देवा, तुम्हाला माहितच आहे की, माणसाचं मन माकडाइतकं चंचल आहे. मग माझ्यासारख्या माकडाचं मन किती चंचल असेल ? तेव्हा त्या चंचल मनाला ताब्यात ठेवण्यासाठी तुमच्या नामाची गरज आहे.

मी :- महाराज, आता मला या विषयात गोडी निर्माण झाली आहे. तर तुम्ही मला असं सांगा की नाम मोठ्यानं घ्यावं की मनातल्या मनात घ्यावं ?

महाराज :- आपल्याला जसं येईल व आवडेल तसं नाम घ्यावं. नाम हे मोठ्यानं घेता येतं. तेव्हा इथून सुरूवात करावी. फक्त नाम मोठ्यानं घेत असताना इतर साधकांना त्याचा त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी. मग फक्त आपल्यालाच ऐकू जाईल इतक्या हळू आवाजात नाम घ्यावं. या अवस्थेत आपले ओठ हलत रहातात. इतर माणसांना आपण काहीतरी पुटपुटतो आहोत असं दिसतं. त्यामुळे आपण



Scanned by CamScanner

त्यांना काही वेडे चाळे करत आहोत असं वाटलं तरी त्याची आपण फिकीर करु नये. याची सवय झाली की मग ओठ मिटून व आतल्या आत जिभेची हालचाल करुन नाम घ्यावं. या अवस्थेत इतरांना आपल्या गळ्याची घोटी फक्त हालताना दिसते. याचीही सवय झाली की मग आपण ज्या पातळीवर मनातल्या मनात विचार करतो त्या पातळीवर नाम घ्यावं. ब-याच लोकांना या पातळीवर नाम घेणं जड जातं, म्हणून बराच काळपर्यंत त्यांना याची सवय करायला लागते. या अवस्थेत आपण नाम घ्यायला सुरुवात केली की नामाकडे आपल्याला लक्ष ठेवावं लागतं. नाहीतर नामप्रक्रिया थांबून मन आपले इतर आवडते उद्योग करु लागतं. या स्थितीत बराच काळ नाम घेत रहावं लागतं. मग ते हळूहळू खोल जाऊ लागतं व ते आपोआप घेतलं जाऊ लागतं. मग त्याकडे लक्ष ठेवावं लागत नाही. या अवस्थेत मन नामात इतकं रंगून जातं की स्वतःचा विसर पडतो. आपण नाम घेत आहोत याची आठवणच येत नाही. या अवस्थेचं वर्णन महात्मा कबीरांनी केलं आहे. ते म्हणतात-

राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।

नाम हा शब्दच 'मना'च्या उलट आहे. म्हणून नाम हे मनाला बाहेरून आत असा उलट प्रवास करायला लावतं.

मी :- महाराज, काही लोक माळ घेऊन जप करताना दिसतात. त्याची काही पध्दत असते का ?

महाराज :- हो. माळ ही प्लास्टिकच्या किंवा धातूच्या मण्यांची किंवा रुद्राक्षांची किंवा चंदन किंवा तुळशीच्या लाकडाची बनवलेली असते. यापैकी कोठलीही माळ जपाला वापरली तरी चालते. माळेत १०८ मणी व एक मेरुमणी असतो. पण एक माळ पूर्ण झाली की जपसंख्या १०८ ऐवजी हिशोबासाठी १००च झाली असं समजतात. माळेवर जप करताना नामाचा एकदा उच्चार झाला की एक मणी आपल्याकडे ओढावा. मात्र अंगठ्याजवळचं बोट मणी ओढण्यास वापरू नये तर उजव्या हाताचा अंगठा, मधलं बोट आणि त्यापलिकडचं बोट एवढ्याचा उपयोग करावा. करंगळी आधार म्हणून वापरावी. शेवटी मेरुमण्यापर्यंत आल्यावर मेरुमणी ओलांडू नये. तर माळ फिरवून उलटून घ्यावी व शेवटचा मणी हा पहिला मणी समजून पुन्हा सुरुवात करावी.

मी :- महाराज, माळेऐवजी गणकयंत्र (काउंटर) वापरलं तर चालेल का ?

महाराज :- सोयीचं असेल तर वापरावं की !

मी :- जमिनीवर घालण्यासाठी आसन म्हणून काय घ्यावं ?



Scanned by CamScanner

महाराज :- व्याघ्राजिन, मृगाजिन, रेशमी, लोकरी, घोंगडीचं किंवा कापडाचं अशी अनेक त-हांची आसनं साधक वापरताना दिसतात. सगळ्यात उत्तम आसन म्हणजे चटई किंवा दर्भासन, त्यावर लोकरीचं आसन व त्यावर कापडाचं धूतवस्त्र असं वापरावं. शक्यतो जमिनीवर बसू नये. त्यामुळे जपाच्या वेळी निर्माण झालेली शक्ती जमिनीत जिरून जाण्याची शक्यता असते. तसंच पाटावर पण बसू नये असं म्हणतात.

मी :- महाराज, एकाच देवाचं नाव घ्यावं की अनेक देवांची नावं घेतली तरी चालतात ?

महाराज :- मी सांगितलेला अर्थ आपल्याला ज्या नामामुळे प्रतीत होत असेल असं कोठलंही नाम घेतलं तरी हरकत नाही. जोपर्यंत अर्थ एकच आहे तोपर्यंत नामं अनेक असली तरी चालतील. पण सुरुवातीला जरी अनेक नावं घ्यावी असं वाटलं तरी भक्ताला ज्या नावाची पूर्वसंस्कारामुळे गोडी असेल तेच नाव पुढे घेतलं जातं.

मी :- आणखी एक बालिश प्रश्न. आमच्या हल्लीच्या पिढीत लोकांच्या तोंडात "च्यायला", "साला" हे शब्द बसले आहेत. समजा उद्या मी या शब्दाचा 'जप' केला तर मला देव भेटेल का ?

महाराज :- आपल्याला नको असलेली गोष्ट घडलेली दिसली की हल्ली सर्वसाधारणतः हे शब्द उच्चारले जातात. पण हा अर्थ जाऊन तुझ्या मनात जर हा शब्द म्हणजे देवाचं नाव आहे अशी भावना निर्माण झाली, तर या शब्दाच्या जपानेसुध्दा तुला देव भेटेल. नक्कीच! आपल्यासमोर कबीरांचं उदाहरण आहेच. साहेब शब्दाची आपली व्याख्या म्हणजे ज्यानं बोलावलं असता पाणी पिऊन आणि पॅड, पेन्सिल-पेन घेऊन केबिनमध्ये जाणं आणि 'Yes Sir, Yes Sir' अशी हांजी हांजी करणं. ज्याचा फोन आला तरी आपण खुर्चीवरुन उठून उभे राहून त्याच्याशी बोलणं. (जणू काही आपण उठलेलं त्याला दिसत असेल या कल्पनेने) तो साहेब, अशी आहे. पण कबीरांना साहेब हा शब्द उच्चारला की देवाची आठवण येते. ते म्हणतात,

चिटीके पग नेवर बाजे। सोही साहिब सुनता है।।

किंवा

कहत कबीरा सुन भई साधो। साहिब मिले सबूरीमें।।

साहेब म्हटल्यावर कारकूनाच्या अंगावर काटा उभा रहातो तर त्यांच्या शरीरावर प्रेमानं रोमांच उभे रहात असत. तेव्हा सारांश असा की अर्थ जर एकच असेल तर कोठलाही शब्द देवाला भेटवण्याचे काम करील.



Scanned by CamScanner

मी :- महाराज, पण प्रत्यक्ष नामस्मरणाला सुरुवात कशी करावी ?

महाराज :- नाम घेण्याला दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक म्हणजे नाम घ्यावं असा मनाचा निश्चय व्हायला पाहिजे. आणि नाम आपल्या हातून जास्तीत जास्त वेळ घेतलं जावं अशी मनाला तळमळ लागली पाहिजे. जसं एखाद्या पाण्यात बुडालेल्या माणसाला आपण पाण्यावर येऊन केव्हा एकदा श्वास घेतो असं होतं, तशी तळमळ जीवाला नाम घेण्याबद्दल वाटली पाहिजे. म्हणजे निम्मं काम झालेलं असतं. पुढचं निम्मं काम सोपं असतं. प्रथम ठराविक वेळी एका जागेवर बसून नामस्मरण करायचं. याच्याच जोडीला आपण सकाळी जागे होतो, तेव्हापासून जी सुरुवात करायची ती रात्री झोपेपर्यंत नाम घेत रहायचं. सुरुवातीला फारच थोडा वेळ नाम घेतलं जाईल पण काही हरकत नाही. समजा पहिल्या दिवशी पाचच मिनिटं नाम झालं तरी चालेल. थोडं थोडं वाढवत ते काही दिवसांनी दहा मिनिटं होईल व हेही हळूहळू वाढत जाईल. कारण नामस्मरण ही अगदी नवीन गोष्ट आपण आपल्या दैनंदिन कार्यक्रमात अंतर्भूत करत असतो. तेव्हा या नवीन गोष्टीची सवय होईपर्यंत मधून मधून स्मरण व इतर वेळी विस्मरण होणारच. म्हणून ज्या क्षणी आठवण होईल त्या क्षणापासून पुन्हा सुरुवात करावी. इतका वेळ का घालवला याचं दुःख करु नये. कारण दुःखाच्या पलीकडे जाण्यासाठी आपण नाम घेणार आहोत, व एकतर जे होऊन गेलं म्हणजे जो वेळ नामाशिवाय फुकट गेला तो काही आपण दुःख करुन परत येत नाही. तेव्हा ज्याक्षणी आठवण होईल त्याक्षणापासून पुन्हा नव्यानं व उत्साहानं नाम घ्यायला सुरुवात करावी. एकदा मनाला नाम घ्यायची सवय झाली की विस्मरण कमी कमी होईल व स्मरणाचा काळ हळूहळू वाढत जाईल. जेव्हा आपण यांत्रिकपणे काम करत असतो, तेव्हा त्याबरोबर एकीकडे नाम घ्यायला हरकत नाही, आणि आयुष्यातला बराच काळ आपण यांत्रिकपणेच काम करत असतो. तेव्हा तो सर्व काळ आपण नामस्मरणाकडे वापरायला काही हरकत नाही. हातानं प्रपंचाचं काम आणि मनात नाम अशा त-हेनं दिवसातला बराचसा काळ आपण नाम घेण्यासाठी वापरु शकतो.

मी :- महाराज, नामाचं मोजमाप करु नये असं काही लोक म्हणतात, यावर आपलं काय म्हणणं आहे ?

महाराज :- ते प्रत्येकाच्या स्वभाववैशिष्ट्यावर अवलंबून असतं. जर मोजल्यामुळे माणसाचा उत्साह वाढून जास्त नाम घेतलं जात असेल, तर जरुर मोजावं व कालच्यापेक्षा जास्त किंवा कमीत कमी कालच्याइतकं तरी नाम घेतलं जावं

असं वाटलं पाहिजे. म्हणजे नामाची संख्या वाढून ते जास्तीत जास्त काळ घेतलं जावं असा त्यात हेतू आहे. फक्त ठरवल्याइतकं नाम घेऊन झालं, की दुस-या दिवसापर्यंत आपला नामाशी काही संबंध नाही असं समजू नये. तर जास्तीत जास्त वेळ नाम घ्यावं. शिवाय नाम घेताना ते यांत्रिकपणे घेऊ नये. तर आपलं मन त्यावर एकाग्र करुन त्याचा अर्थ लक्षात घेऊन त्यात आपल्या भावाची गोडी मिसळून ते प्रेमानं घ्यावं. अशा त-हेने नामाची गोडी हळूहळू वाढत गेली, की मग ती सहजक्रिया होऊन बसते व मी नाम घेतो याचीही नंतर आठवण होईनाशी होते. मन नामात रंगून जातं व त्याच्या गोडीमुळे इंद्रियांच्या विषयातून मिळणा-या सुखाची गोडी कमी महत्त्वाची वाटू लागते.

मी :- महाराज, नामावर आपलं मन एकाग्र करावं असं आपण म्हणता, पण नाम घ्यायला लागलं की त्याच वेळी आमचं मन अनेक कल्पनांत भरकटू लागतं, असं काही लोक म्हणतात. यासाठी काय करावं ?

महाराज :- आपण पाहिलंच आहे की कल्पना ही विचारातून निर्माण होते. वस्तुस्थिती अशी आहे की वर्तमानात प्रत्येक क्षणी माणसाला ज्ञान, विचार, क्रिया, सुख-दुःख व विकार यांच्या रुपानं काही ना काही अनुभव येत असतो व तो स्मृतीत म्हणजे भूतकाळात जात असतो. म्हणजे काळाच्या संदर्भात विचार केला तर असं दिसतं की भविष्यकाळ हा वर्तमानाच्या द्वारा भूतकाळात विलीन होत असतो. आता भूतकाळात गेलेल्या घटना कधीच बदलता येत नाहीत. पण आपण मात्र या घटनांवर आपल्याला अनुकूल अशा घटना घडल्या असत्या तर किती बरं झालं असतं अशा त-हेच्या कल्पना करत बसतो. तसंच भविष्यकाळात घडणा-या घटनासुध्दा आपल्याला अनुकूल अशा घडाव्यात अशा कल्पना माणूस करत असतो. आणि त्याची त्याला इतकी सवय होऊन बसते, की त्याचा दिवसाचा बराचसा काळ अशा निरर्थक कल्पना करण्यात जातो. उदा.- एखाद्या माणसाने लॉटरीचं तिकीट घेतलं की १० लाख रुपयांचं बक्षीस मिळाल्यावर आपण काय काय करु याच्या कल्पना तो करत बसतो व निकाल लागेपर्यंत इतर गोष्टी यांत्रिकपणे करत असताना त्याचं मन मात्र बक्षिसाच्या कल्पना करत बसतं. निकाल लागल्यावर आपल्याला बक्षीस तर लागलेलं नाहीच पण तिकिटाचे पैसे पण फुकट गेले आहेत हे जेव्हा त्याच्या लक्षात येतं तेव्हा आपला नंबर किती आकड्यांनी चुकला व आपण तिकीट दुस-या तिकीटविक्रेत्याकडून घेतलं असतं तर आपल्याला बक्षीस मिळालं असतं वगैरे विचार तो करु लागतो. अशा गोष्टींची त्याच्या मनाला सवय लागून बसते. कारण व्यवहारात न मिळणारे

सुख तो काल्पनिकरित्या मिळवत असतो.

आता नाम घ्यायला लागलं, की आपलं मनही नेहमीचीच क्लृप्ती वापरतं. ते नाम यांत्रिकपणे घेऊ लागतं आणि स्वतः अवांतर विचारांच्या सुखात बुडून जातं. आपल्याला हे नको असतं. कारण त्यामुळे आपलं मन नामावर एकाग्र होऊ शकत नाही. म्हणून आपल्याला असं वाटतं की नाम घेताना नको त्या कल्पना येत असतात. एरवी त्या येतच असतात, पण आता मात्र त्या नकोशा वाटत असतात.

मी :- मग यावर उपाय काय ?

महाराज :- आपण विचार मनात आले तरी नाम घेत रहायचं व जे काही विचार आले त्याचं महत्त्व कमी करुन टाकायचं. उदा.- लॉटरीचं तिकीट घेतलंच नाही तर त्यासंबंधी विचार मनात येणार नाहीत. तसंच ऑफिसला जाताना बॅगमध्ये काय सामान न्यायचं याचे विचार मनात येऊ लागले तर रात्रीच ऑफिसची बॅग भरून ठेवावी. अशा त-हेने ज्या ज्या विषयासंबंधी विचार मनात येतील त्यासंबंधात आपल्या हातात जेवढं असेल, तेवढं चटकन् करावं म्हणजे हे विचार कमी होतात. पुन्हा असेच विचार मनात येऊ लागल्यावर त्यांचं महत्त्व मनातून कमी करावं. असं सतत करावं.

मी :- हे महत्त्व कमी कसं करावं ?

महाराज :- प्रत्येक अनावश्यक विचाराची व्यर्थता आपल्या मनाला पटवणारा प्रतिविचार करावा म्हणजे पहिला विचार बंद होईल. उदा.- भूतकाळासंबंधी विचार आपल्या मनात आल्यास भूतकाळातील घटना कितीही अप्रिय असल्या तरी त्या कधीही बदलता येत नाहीत हे लक्षात घेऊन तो विचार बंद करावा. तसंच भविष्यकाळासंबंधी विचार आल्यास भविष्यकाळ अज्ञात असल्यामुळे त्यात कोणत्या सुखकारक घटना घडाव्यात हे आपण ठरवू शकत नाही हा विचार करावा. शिवाय दुस-याचं वागणं आपल्या मनाप्रमाणे असावं असा विचार मनात शिरल्यास प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य असतं म्हणून आपण त्याच्यावर बळजबरी करु शकत नाही, हे समजून घेऊन त्या विचाराला पुढे जाऊ देऊ नये. शिवाय आपलं सर्वच जीवन रामाच्या इच्छेनं चालत असल्यामुळे त्यावर अनाठायी व अयोग्य विचार करुन काही उपयोग नाही हेही ध्यानात ठेवावं. अशा त-हेनं प्रतिविचार करुन हे अनावश्यक विचार बंद करावेत. असं दोन-चारदा घडलं की मग असे विचार येईनासे होतात.
आवश्यक असे विचार फारच थोडे असतात. मग नाम घेताना मन एकाग्र होऊ शकतं.

मी :- महाराज, नाम घ्यायला सद्‌गुरूंची गरज आहे का ? की ते आपल्या आपणच घेतलं तरी चालतं ?

महाराज :- वास्तविक पहाता ईश्वराचं स्मरण होणं हा आपण नाम घेण्याचा हेतू आहे व ईश्वराचं नाम हे स्वयंसिध्दच आहे. तेव्हा आपल्याला नाम घ्यावंसं वाटेल, तेव्हापासून नाम घ्यायला सुरुवात करायला काहीच हरकत नाही. असं नाम त्याचं काम करीलच. पण होतं काय ? की आपल्या बुध्दीनं आपण नाम घ्यायला सुरुवात केली की आपल्या नकळत 'मी' नाम घेतो असा सूक्ष्म अहंकार आपल्या मनात निर्माण होतो. हा अहंकार नामस्मरणाच्या फळासंबंधी मनात अपेक्षा निर्माण करतो व ती अपेक्षा पूर्ण झाली नाही की नामधारक दुःखाच्या चक्रात अडकतो. त्यामुळे नामधारकाच्या मनात नामाविषयी संशय निर्माण होतो. पण आपल्याला सद्‌गुरूंकडून नाम मिळालेलं असलं की ते या नामाच्या पाठी शक्तिरुपाने असतात. शिवाय सद्‌गुरूंच्या आज्ञेनं आता आपण नाम घेत असल्यामुळे 'मी' नाम घेतो असा आपल्या ठिकाणी अहंकारच उत्पन्न होत नाही. तसंच नाम घेताना येणा-या अडचणींचं निराकरण करण्यात आपल्याला सद्‌गुरूंची मदत होतेच. शिवाय आपल्या या मार्गातील प्रगतीची जवाबदारी त्यांच्याच शिरावर असते. त्यामुळे त्यांनी दिलेलं नाम मनापासून, आवडीने व प्रेमाने जास्तीत जास्त वेळ घेणे एवढीच आपली जवाबदारी असते.

सारांश असा की सद्‌गुरूंकडून नाम घेणं म्हणजे जत्रेत फिरत असताना आईनं मुलाचं बोट धरणं. त्यामुळे इथं बोट सुटण्याचा प्रश्नच येत नाही. या उलट आपण स्वतःच नाम घेऊ लागणं म्हणजे एकट्यानंच जत्रेत हिंडणं. यात स्वातंत्र्य असलं तरी वाट चुकण्याची शक्यता असते.

मी :- पण महाराज, सद्‌गुरूंची भेट कशी होईल ?

महाराज :- आपण या मार्गात असलेल्या एखाद्या अधिकारी व्यक्तीला विचारुन देवाचं नाव घ्यायला सुरुवात करावी. हे आपण घेतलेलं नामच आपल्याला सद्‌गुरूंची भेट करवून देईल.

मी :- ते कसं काय महाराज ?

महाराज :- एखादं फळ पिकलं की पक्ष्यांना आमंत्रण करावं लागत नाही. किंवा खडीसाखर उघड्यावर ठेवली की मुंगळ्यांना मुद्दाम बोलवावं लागत नाही. तसं सद्‌गुरूंना प्रिय असलेली गोष्ट म्हणजे भगवंतावर प्रेम व त्याचं नामस्मरण. हे आपण करत असलो, की सद्‌गुरू आपल्याला आपोआप भेटतात.



Scanned by CamScanner

ज्ञानेश्वर माऊलीनं म्हटलंच आहे,

मग कर्मसाम्यदशा। जेथ होय वीरेशा।।
तेथ सद्‌गुरू आपैसा। भेटे गा।।

मी :- महाराज, कर्मसाम्यदशा म्हणजे काय ?

महाराज :- कर्मसाम्यदशा म्हणजे पापपुण्यसमान होणं. नाम घेण्यानं पापनाश होतो व पुण्यप्राप्ती होते. त्यामुळे नाम घेता घेता अशी एक अवस्था येते की ज्यावेळी सूक्ष्मदेहातील एकूण पाप व पुण्य हे समान होतं. त्याक्षणी सद्‌गुरू तुम्हाला आपोआप येऊन भेटतात व तुमची इच्छा असल्यास तुम्हाला अनुग्रह देतात.

मी :- महाराज, अनुग्रह म्हणजे काय ?

महाराज :- अनुग्रह म्हणजे दीक्षा.

मी :- आता दीक्षा म्हणजे काय ते सांगा.

महाराज :- दीयते ज्ञान सद्‌भावं क्षीयते पशुवासना। अशी दीक्षेची व्याख्या आहे. याचा अर्थ ईश्वराच्या अज्ञानातून निघालेल्या अहंकाराच्या वर्चस्वामुळे निर्माण होणारी पशुवासना क्षीण करुन, ईश्वराचं यथायोग्य ज्ञान व त्यातून निर्माण होणारी सद्‌भावना प्रफुल्लित करणं याला दीक्षा किंवा अनुग्रह असं म्हणतात. या अनुग्रहानं सद्‌गुरू व शिष्य यांचं एक विशेष नातं निर्माण होतं. यात सद्‌गुरूंच्या अध्यात्मिक आज्ञेचं पालन करुन त्यांनी सांगितलेली साधना प्राणपणानं करणं हे शिष्याचं कर्तव्य असतं तर शिष्याच्या मुक्तीची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन त्याला साधनेत योग्य ते मार्गदर्शन करणं हे सद्‌गुरूंचं काम असतं.

मी :- पण महाराज, जिथे एखाद्या सत्पुरूषांच्या समाधीला माळ लावून त्याचा अनुग्रह दिला जातो, तिथे काय होतं ?

महाराज :- असे सत्पुरूष जरी देहानं या जगात नसले तरी सूक्ष्मदेहानं त्यांचं वास्तव्य त्यांच्या समाधीपाशी असतंच व त्यांच्या भक्त किंवा शिष्यांच्या द्वारा किंवा त्यांच्या पुस्तकांच्या द्वारा किंवा स्वप्नदृष्टांतांच्या द्वारा त्यांचं मार्गदर्शन चालू असतंच. त्याचा लाभ त्यांच्या प्रामाणिक भक्तांना मिळतच असतो. फक्त शिष्याची तशी श्रध्दा पाहिजे.

मी :- पण महाराज, सद्‌गुरू जे नाम देतात तेच नाम शेकडो माणसं घेत असतात व त्यांच्यात वर्षानुवर्ष काही बदल होत नाही असं दिसतं. असं का होतं ?

महाराज :- हा बदल प्रथम बाह्य स्वरुपात दिसत नाही. तर तो अंतरंगात हळूहळू होत असतो. आपले अनेक पूर्वजन्मांचे संस्कार आपल्या कर्माशयात

किंवा सूक्ष्मदेहात ठिय्या मारून बसलेले असतात. ते काढून टाकून अंतःकरण शुध्द करण्याचं काम प्रथम नामाला करावं लागतं. म्हणून सद्गुरूदत्त नामात विशेष शक्ती असते. याविषयी तुला एक गोष्ट सांगतो.

एका सद्गुरूंनी आपल्या शिष्याला 'राम' हा मंत्र दिला व त्याचा जप करायला सांगितला. तो घरी आला व पाहतो तो त्याच्या आसपासची शेकडो मंडळी याच मंत्राचा जप वर्षानुवर्ष करीत होती, असं त्याला दिसलं. ती होती तशीच होती. त्यांच्यात काडीचाही फरक झाला नव्हता. हे पाहून तो गुरूकडे गेला व म्हणाला, "गुरूजी, तुम्ही तर मला सर्व लोक जप करतात, असाच मंत्र दिला आहे." त्यावर गुरू म्हणाले, "तू एक काम कर. मी तुला एक काचेची वस्तू देतो. तू बाजारात जाऊन याची जास्तीत जास्त काय किंमत होईल याची फक्त चौकशी करायची. ती वस्तू विकायची मात्र नाही." ती वस्तू म्हणजे प्रत्यक्षात एक हिरा होता. या शिष्यानं तो हिरा बाजारात नेला. कुणी एक रुपया तर कुणी दहा रुपये तर आणखी कुणी शंभर रुपये अशी किंमत केली. शिष्याला मोठं आश्चर्य वाटू लागलं. शेवटी तो गावातल्या जवाहि-याच्या दुकानात गेला. तेव्हा जवाहि-याने त्याची किंमत रू.१०/- लाख केली. मग तो हिरा त्यानं गुरूकडे परत नेला. तेव्हा सद्गुरू म्हणाले, "बेटा, आता तुला या नामाची किंमत कळली असेल. जो लक्ष देऊन नाम घेईल, त्याला या नामाची किंमत लक्षावधी रुपयांपेक्षा जास्त आहे असं कळेल. इतरांना मात्र त्याची किंमत शून्य आहे." तसं सद्गुरूनं आपली शक्ती जोडून दिलेल्या नामाचं असतं.

मी :- महाराज, आम्ही सद्गुरूकृपेविषयी बरंच काही ऐकतो. ती फार दुर्मिळ गोष्ट असते म्हणे. सद्गुरूकृपा ही कोणावरही होते का ? व ती आपोआप होते का ? माणसाला सद्गुरूकृपा होण्यासाठी काही पात्रता असावी लागते का ?

महाराज :- कृपा कर आणि एका वेळी एकच प्रश्न विचार.

मी :- (ओशाळून) बरं महाराज, सद्गुरूकृपा म्हणजे काय, तेवढं सांगा.

महाराज :- आपण दीक्षेला कोठल्याही प्रकारे लायक नसताना सद्गुरूंनी परमकरुणामय होऊन आपल्याला दिलेला अनुग्रह म्हणजेच सद्गुरूकृपा. या कृपेच्या वर्षावामुळेच आपल्या मनात ईश्वराशी एकरुप होण्याच्या बीजाचा अंकूर होत असतो. बीज अंकुरे अंकुरे। ओल्या मातीच्या कुशीत।। या कृपेच्या वर्षावामुळेच एरवी आडरानातील खडकासारखं असलेलं आपलं रूक्ष व कोरडं मन ओल्या मातीसारखं बीजाच्या स्वागतासाठी आतुर व उत्सुक होतं.



Scanned by CamScanner

अनुग्रह झाल्यानंतर गुरुकृपा व साधना यांना सायकलची उपमा देता येईल. आपण मुक्कामाला पोहोचण्यासाठी सायकलचा उपयोग करतो. तसं ईश्वराशी एकरुप होण्यासाठी आपण भक्तीची सायकल वापरतो. त्यात नामाचं पॅडल जितक्या जोरात मारू, तितकं साधनेचं मागील चाक जास्त जोरानं फिरू लागतं. गुरूकृपा ही मात्र पुढील चाकासारखी आहे. मागील चाक जितक्या वेगानं फिरेल, तितक्याच वेगानं पुढील चाक आपोआप फिरत असतं. तसंच जितकी साधना जास्त, तितका गुरूकृपेचा वर्षावही आधिक. तसंच हँडलच्या रूपानं विवेकशक्ती गतिमान साधनेला योग्य दिशा दाखवण्याचं दिग्दर्शन करत असते. त्यामुळे जीवाला जीवनाच्या मार्गावरून ईश्वरापर्यंत पोहोचवण्याचं काम भक्तीयोगाची सायकल करीत असते. हां, जसं पुढच्या चाकाला जोरात ब्रेक लावला तर सायकल उलटते, तसंच गुरूकृपेला ब्रेक मारण्याचा शहाणपणा साधकाने करू नये. शिवाय जीवनाच्या मार्गावर घर्षण होऊ नये म्हणून मनाच्या लवचिक रबरी धावांमध्ये ईश्वराच्या प्रेमाची हवा भरून घ्यावी.

मी :- महाराज, नाम हे एकांतात घ्यावं की सर्वांनी एकत्र बसून घ्यावं ?

महाराज :- हा पुन्हा ज्याच्या त्याच्या आवडीचा भाग आहे. 'पसंद अपनी अपनी' ज्यांना एकांताची आवड असते, अशांसाठी तुकाराम महाराज म्हणतात,

ठायीच बैसोनि करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा।।

एकांत म्हणजे जिथे एकाचाही अंत होतो अशी स्थिती. एकांतात अनंताला आवडीनं आळवलं की त्याच्या कृपेने आपल्या मनातच असा एकांत निर्माण होतो. याउलट एखाद्या सत्संगात किंवा वारीत जाऊन एकत्रितपणे नाम घेण्यामध्ये काही लोकांना विशेष गोडी वाटते. असे वारकरी साधक सामुदायिक भजनात किंवा नामस्मरणात विशेष रंगून गेलेले दिसतात. दोघांनाही आनंद मिळतो. नवीन साधकाला नामाची गोडी लागण्यासाठी ख-या सत्संगाचा खूप उपयोग होतो. खरा सत्संग म्हणजे जिथे सद्‌गुरूंच्या मार्गदर्शनाखाली किंवा मुक्त भक्ताच्या सहवासात अनेक साधक नामसाधना करत असतात, असा मेळावा. एखाद्या सत्पुरूषाच्या सहवासालाही सत्संग असे म्हणतात. या सत्संगामुळे आपली नामसाधना दिवसेंदिवस प्रफुल्लित होत रहाते. शिवाय या सत्संगामुळे साधकांना एकत्र येण्याचे फायदे मिळत रहातात ही गोष्ट वेगळीच. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात की,

माझिया जातीचे। मज भेटो कोणी।।

मी :- महाराज, काही लोक असं म्हणतात की देवाचं नाव हे स्नान



Scanned by CamScanner

करून सोवळं नेसूनच घेतलं पाहिजे. नाहीतर त्याचा उपयोग होत नाही. असं काही आहे का ?

महाराज :- आपलं शास्त्र असं सांगतं की ज्या नामाला ओंकार लावला असेल किंवा ज्या नामाच्या जपात शक्तियुक्त बीजाक्षरं (उदा.- गं, ह्रीं, क्लीं, वगैरे) असतील अशा नाममंत्रांचा जप स्नान करून शुचिर्भूत होऊन सोवळ्यात वगैरे करावा. पण याव्यतिरिक्त इतर नाममंत्रांच्या जपासाठी सोवळ्याची गरज नाही. हे नाम कोठेही, केव्हाही व कसंही घेतलं तरी चालतं.

मी :- महाराज, यावरून मला आठवण झाली. महिलांनी मासिक पाळीच्या वेळी नामस्मरण करावं की करू नये ? कारण या बाबतीत काही बायका फार भावनाप्रधान असतात.

महाराज :- ते कसं काय ?

मी :- महाराज, त्याचं असं आहे की समजा एखाद्या बाईनं मासिक पाळीच्या वेळी कुणाला न विचारता स्वतःच्याच बुध्दीनं नाम घेतलं आणि नंतर तिच्या घरात काही दुःखद घटना घडली की तिच्या मनाला उगाचच टोचणी लागून रहाते की आपण पाळीच्या वेळी देवाचं नाव घेतलं, म्हणून तर असं झालं नसेल ना ?

महाराज :- इथे एक गोष्ट लक्षात ठेवावी, की देवासाठी आपण सद्हेतूने काहीही केलेलं असलं, तर त्यानं आपलं वाईट कधीही होत नाही. आता नामाच्या बाबतीत म्हणशील तर नाम जर ओंकारयुक्त किंवा बीजाक्षर शक्तियुक्त नसेल, व बाईला पाळीच्या वेळीही नाम घ्यावं असं मनापासून वाटत असेल, तर तिनं त्यावेळी नाम खुशाल घ्यावं. त्यानं काहीही त्रास होणार नाही. उलट फायदाच होईल. पण जर त्या बाईला सद्गुरूंचा अनुग्रह झाला असेल, तर मात्र तिनं स्वतःची बुध्दी न चालवता सद्गुरूंनी सांगितलं असेल, तसं करावं.

मी :- महाराज, नाम घेताना योगातील एखादं आसन घालून बसण्याची आवश्यकता आहे का ?

महाराज :- अजिबात नाही. ज्या स्थितीत आपल्याला सुख वाटेल, अशा शरीराच्या कोणत्याही स्थितीत राहून नाम घ्यायला हरकत नाही. 'स्थिर सुखं आसनम्।' उदा.- मांडी घालून किंवा मांड्या दुखत असतील तर समोर पाय पसरून किंवा मांडी घालून त्रास होत असल्यास खुर्चीवर बसून किंवा तेही त्रासदायक झाल्यास झोपूनसुध्दा नाम घ्यायला काही हरकत नाही. सुभाषितकार म्हणतात,



Scanned by CamScanner

अहो येता जाता, उठत बसता, कार्य करिता।
सदा देता घेता, वदनी वदता, ग्रास गिळता।
घरी, दारी, शय्येवरी, रतिसुखाचे अवसरी।
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवत्चिंतन करी।।

तेव्हा नामस्मरण न करण्यासाठी कोणतीही सबब न सांगता आपण दिवसाकाठी जास्तीत जास्त वेळ नाम घेण्याचा प्रयत्न करावा.

मी :- महाराज, या नामस्मरणामध्ये काही अडथळे किंवा विघ्नं येतात का ?

महाराज :- पहिला अडथळा म्हणजे आळस. या नामातून दर्शनी असं फळ तत्काळ दिसत नसल्यामुळे मन नामस्मरण करण्याची चालढकल करू लागतं. पण नामस्मरणाचे दूरगामी परिणाम लक्षात घेऊन आळस न करता नामस्मरण करावं. दुसरा अडथळा म्हणजे थोडा वेळ नाम घेतलं की पटकन् केव्हा झोप लागते ते कळत नाही. नामस्मरणात मनाचं अंतिम मरण असल्यामुळे मन मरण पत्करण्याच्या ऐवजी झोप घेणं पसंत करतं. याला योगनिद्रा असंही नाव आहे. या झोपेमुळे आपल्याला चांगली विश्रांती मिळते. यावर उपाय म्हणजे झोपायचं नाही असा निश्चय करून नाम घ्यायला बसावं, व झोप येते असं वाटू लागलं की उठून तोंडावर पाणी मारून पुन्हा ताजंतवानं होऊन नाम घ्यायला बसावं. नामातला तिसरा अडथळा म्हणजे नाम घेता घेता अनेक वेळा आपल्या मनःपटलावर अनेक भीतीदायक दृष्य दिसू लागतात व नाम थांबतं. त्यामुळे घाबरून आपण डोळे उघडतो. पण आपल्या पूर्वसंस्कारानुसार अशी दृष्य आपल्याला दिसतात व यामुळे आपल्या पूर्वजन्म-प्रारब्धाचा क्षयच होत असतो हे जाणून या दृष्यांकडे लक्ष देऊ नये. त्यांना महत्त्व न देता आपलं नाम चालूच ठेवावं. चौथा अडथळा म्हणजे शरीरप्रकृती बिघडल्यामुळे आपल्याला नाम घ्यावंसं वाटत नाही. कारण तेव्हा मन शरीरदुःखावर एकाग्र झालेलं असतं. म्हणून शरीरदुःखावर योग्य तो औषधोपचार करून तिथून आपलं मन काढावं व ते नामस्मरणात एकाग्र करावं. कारण नामाचा मनाशी संबंध असतो, शरीराशी नाही. उदा.- गुरूदेव रानडे यांना मेंदूचा कर्करोग झाला होता. तरीसुध्दा त्यावर योग्य तो औषधोपचार करून त्यांनी रोज ९-९ तास नाम घेतलं व आश्चर्य म्हणजे त्यांचा तो असाध्य रोग नामानं बरा झाला. तसंच एका भक्ताचा पाय कापायचा होता. तो त्यानं भूल न घेताच नाम घेत घेत सर्जनकडून हूं की चूं न करता कापवून घेतला. असं जर नामावर मन एकाग्र करता आलं, तर साधकाच्या जीवनात शारीरिक

दुःख हा शब्दच उरत नाही. पाचवा अडथळा म्हणजे नामस्मरणाबद्दल मनात संशय निर्माण होणं. म्हणजे नामामुळे आपल्याला खरंच ईश्वरप्राप्ती होईल, याची खात्री नसणं. यावर उपाय म्हणजे संतांच्या वाङ्मयाचं प्रिय व्यक्तीच्या पत्राप्रमाणे मन लावून वाचन करणं व त्याची पारायणं करणं. अशा वेळी तुकाराम महाराज, संत नामदेव, एकनाथ महाराज, ज्ञानेश्वर माऊली, समर्थ रामदास वगैरे संत हे नामानंच भवसागर तरून गेले व ईश्वराशी एकरुप झाले याचं स्मरण ठेवावं. त्यांची वचनंच याची साक्ष आहेत. उदा.-

नामाविण साधन दुजे नाही। - संत नामदेव

निजनिष्ठे नाम गावे। विठोबासी शरण जावे।। - तुकाराम महाराज

एकतत्व नाम दृढ धरी मना। - ज्ञानेश्वर माऊली

सदा सर्वदा नाम वाचे वसो दे। - समर्थ रामदास

म्हणून 'नामाच्या चिंतने। बारा वाटा पळती विघ्ने।।' नाम घेऊनच ही विघ्ने दूर करावी.

मी :- महाराज, आपल्याकडे देवाच्या प्राप्तीचे बरेच मार्ग सांगितले आहेत ना ?

महाराज :- हो. आपल्याकडे ज्ञानयोग, ध्यानयोग, राजयोग, कर्मयोग, भक्तियोग, समर्पणयोग असे ईश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग सांगितले आहेत. पण भक्तीतला 'नामयोग' हा या सर्वांत सोपा मार्ग आहे.

मी :- महाराज, तो कसा काय ?

महाराज :- ज्ञानयोग हा 'ब्रह्मसत्य जगन्मिथ्या' या तत्वावर आधारलेला आहे. यात ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून भासणारं हे जग मिथ्या म्हणजे खोटं मानून बुध्दीच्या पलिकडील ब्रह्म हे सत्य आहे अशी साधना करावी लागते. ही साधना नेति नेति (न इति म्हणजे हे नव्हे) या तत्वावर आधारलेली असते. आता ही साधना सामान्य संसारी माणसांना विशेषतः स्त्रियांना फारच कठीण जाते. कारण नऊ मास उदरी वाहून जन्म दिलेल्या पोटच्या गोळ्याला मिथ्या म्हणजे खोटा असं मानायला त्यांचं मन धजत नाही. त्यामुळे ही माणसं ज्ञानयोगाच्या वाटेलाच जात नाहीत.

ध्यानयोगात देवाचं रुप डोळ्यासमोर आणायचं असतं. आता सर्वांच्याच ठिकाणी ही क्षमता असेल असं नाही. म्हणून हा योग सर्वांना जमणारा नाही. राजयोगात द्रष्टा आणि स्वरुप यांचं अभ्यासानं म्हणजे स्वतःच्या प्रयत्नानं मिलन घडवून आणायचं असतं. त्यासाठी प्रथम मन निर्विचार अवस्थेत आणावं लागतं. हे काम फारच कष्टाचं व जिकीरीचं आहे. म्हणून फारच थोडे साधक योगाभ्यासाकडे वळतात.



कर्मयोगात कर्मफळाचा मानसिक पातळीवर त्याग करून कर्म निरपेक्ष भावनेनं

Scanned by CamScanner

व कौशल्यानं करावं लागतं. हेही काम फार कष्टाचं आहे कारण फळाची अपेक्षा करायची नाही मग कर्म करायचं कशाला अशी सामान्य माणसाची भावना असते. नवविधा भक्तीतल्या इतर प्रकारात स्वतःखेरीज आणखी इतर गोष्टींची गरज लागते. पण नामस्मरणात मात्र स्वतःच्या मनाशिवाय इतर कशाचीही गरज लागत नाही. शिवाय आश्चर्य म्हणजे नामस्मरणाच्या मार्गातून भक्ती केल्यास इतर सर्व मार्गांची फळं त्यात आपोआपच मिळतात. उदा.- योगमार्गांत होणा-या सर्व योगिक प्रक्रिया नामधारकाला योग्य वेळी आपोआप होऊ लागतात.

योगाची अष्टांगे। नामीच मिळती।। - गुलाबराव महाराज

तेव्हा सारांश असा की सोप्यात सोपं असं जे देवाचं नाव ते आपण घ्यावं.

मी :- महाराज, आजकाल बरीच माणसं नाम घेताना दिसतात. त्यांच्या नाम घेण्याच्या पध्दतीत काही प्रकार असतात का ?

महाराज :- माणसांच्या हेतूंमध्ये बरेच प्रकार दिसतात. काही माणसं अगदी वरवर नाम घेताना दिसतात. ती यांत्रिकपणे नाम घेतात. त्यात कोठलाही भाव नसतो, व नाम घेणं उरकून टाकून केव्हा एकदा दुस-या कामाकडे वळतो, असं त्यांना झालेलं असतं. दुस-या प्रकारातली माणसे एरवी देवाकडे ढुंकूनसुध्दा पहात नाहीत, पण एखादं संकट आलं की मग त्यांना देवाची आठवण येते. मग ते जोरजोरात नाम घेऊ लागतात. संकट दूर झालं की पुन्हा त्यांचा देवाशी संबंध सुटतो. तिस-या प्रकारातील माणसं मात्र देवाचं नाम भक्तिभावानं व प्रेमानं जास्तीत जास्त वेळ घेताना दिसतात. अशा लोकांना नामाशिवाय जगणं म्हणजे मरणं असंच वाटत असतं.

मी :- महाराज, माझ्या प्रश्नांच्या सरबत्तीला तुम्ही कंटाळले असाल नं ?

महाराज :- नाही बुवा. अरे हा विषयच इतका गोड आहे की तू जन्मभर प्रश्न विचारत राहिलास तरी मला कंटाळा येणार नाही. फक्त माझा प्रश्न असा आहे की तू जर जन्मभर प्रश्नच विचारत बसलास तर साधना केव्हा करणार ? असो. आणखीन् काही विचारायचं आहे का ?

मी :- महाराज, आता आणखी एक प्रश्न. अनुसंधान म्हणजे काय ?

महाराज :- गोंदवलेकर महाराज म्हणतात की ,

हाचि सुबोध गुरूंचा । अनुसंधाना कधी न चुकवावे।।

तर अनुसंधान म्हणजे क्षणोक्षणी भगवंताचं स्मरण असणं.

मी :- महाराज, ते कसं काय शक्य आहे ? आम्ही संसारी माणसं.



Scanned by CamScanner

दिवसाकाठी तास, दोन तास, शिकस्त म्हणजे तीन तास नाम घेऊ. पण उरलेल्या वेळात त्याचं स्मरण कसं करणार ?

महाराज :- भगवंत हा विश्वनिर्माता, विश्वव्यापक व विश्वनियंता आहे हे आपण पाहिलंच आहे. याचं स्मरण सतत केल्यास भगवंताचं अनुसंधान अनायासे ठेवता येतं.

मी :- ते कसं काय महाराज ?

महाराज :- त्याला स्वतःपासूनच सुरूवात करायची. मी जिवंत आहे तो त्या भगवंताच्याच कृपेनं. मी निरोगी आहे तो त्याच्याच दयेनं. माझ्या जीवनात त्याचीच दया मला क्षणोक्षणी अनुभवास येत असते.

डोळ्यांनी बघतो, ध्वनि परिसतो कानी, पदी चालतो।
जिव्हेने रस चाखितो मधुरही, वाचे आम्ही बोलतो।
हातानी बहुसाल काम करतो, विश्रांतीही घ्यावया।
घेतो झोप सुखे, फिरूनी उठतो, ही ईश्वराची दया।।

माझं शरीर, बुध्दी व जीव ही सर्व त्या भगवंतानं धारण केलेली रुपं आहेत. यातून जे गुणधर्म प्रकट होतात, ते माझे नसून भगवंताचे गुणधर्म आहेत व माझ्या जीवनात माझ्या जन्मापासून या क्षणापर्यंत ज्या घटना घडलेल्या आहेत, त्या माझ्या कर्तृत्वामुळे नसून भगवंताच्या संकल्पामुळे घडलेल्या आहेत, व या क्षणापासून माझ्या मृत्यूपर्यंत जे प्रसंग येणार आहेत, ते मला माहित नसले तरी ते ईश्वरी संकल्पानुसारच घडणार आहेत. असं सदैव चिंतन करावं म्हणजे भगवंताचं अनुसंधान टिकतं. तसंच आपल्याला एखादी वस्तू दिसली किंवा एखादा माणूस भेटला की त्याचा निर्माता भगवंत आहे असा विचार करावा. मग त्याचं रुप व गुणधर्म हेंही त्याचे नसून ते रूप भगवंताचं एक रूप आहे व त्याचे गुणधर्म भगवंताचेच गुणधर्म आहेत, ही वस्तुस्थिती ध्यानात घ्यावी, व त्या वस्तूबरोबर किंवा माणसाबरोबर जो आपला संबंध येईल, तो भगवंताच्याच इच्छेने किंवा संकल्पाने येत आहे असा विचार करावा. इतकंच नव्हे तर त्याच्या संदर्भात मला जे जे करावंसं वाटतं तेंही माझं कर्तृत्व नसून भगवंताचा तसा संकल्प असतो, म्हणून मला तसं वाटत असतं. असा विचार, चिंतन पुन्हा पुन्हा दिवसभर करावं, म्हणजे भगवंताचं अनुसंधान टिकतं.

मी :- महाराज, हे ऐकायला बरं वाटतं पण करायला फारच कठीण आहे.

महाराज :- आपल्याला ही एका क्षणात जमणारी गोष्ट नाही. म्हणून एका क्षणापासून अनुसंधानाच्या अभ्यासाला सुरूवात करावी. मग हा अभ्यास

हळूहळू वाढत जातो. यालाच ज्ञानेश्वर माऊलीनं अवधान असा शब्द वापरलेला आहे. ती म्हणते,

जरी अवधान एकले दीजे। तरी सर्व सुखासी पात्र होईजे।
हे प्रतिज्ञोत्तर माझे। उघड आईका।।

या अनुसंधानाचंच पुढे संपूर्ण शरणागतीत रुपांतर होतं.

मी :- महाराज, शरणागती म्हणजे काय ?

महाराज :- अरे, शरणागती म्हणजे संपूर्णपणे त्याचंच होऊन जाणं. त्याच्या इच्छेत आपली इच्छा मिसळून देणं. आपली स्वतःची वेगळी इच्छा न ठेवणं. आपलं स्वतंत्र अस्तित्व भगवंताच्या अस्तित्वात व जीवन त्याच्या संकल्पात विलीन करुन टाकणं म्हणजे शरणागती. यासंबंधात मी तुला महात्मा कबीरांची गोष्ट सांगतो.

कबीर एका रात्री आपलं काम संपवून घराच्या बाहेर येऊन रस्त्यावर उभे होते. तेवढ्यात एक चोर पळत पळत आला व त्यांच्या हातात त्यानं एक वस्तू कोंबली. ते म्हणाले, "रामाची इच्छा." तेवढ्यात मागून पोलिस आले, त्यांनी यांच्या हातातली ती वस्तू पाहिली. त्यांना यांचाच संशय आला. ते त्यांना पकडून पोलिस चौकीत घेऊन गेले. कबीर म्हणाले, "रामाची इच्छा." पोलिस अधिका-यासमोर कबीरांनी सर्व हकीकत सांगितली. ते म्हणाले, "मी घराबाहेर उभा होतो, रामाची इच्छा. तेवढ्यात एक माणूस पळत आला व माझ्या हातात एक वस्तू कोंबून पळत गेला, रामाची इच्छा. नंतर तुमचे पोलिस आले व मलाच चोर समजून त्यांनी मला पकडून तुमच्यासमोर उभं केलं आहे, रामाची इच्छा." अधिकारी भला माणूस होता. तो कबीरांना ओळखत होता. त्यानं त्यांना सोडून दिलं. ते म्हणाले, "धन्यवाद, रामाची इच्छा." अशी शरणागती महात्मा कबीरांना साधली होती.

मी :- महाराज, ही फारच कठीण गोष्ट असली पाहिजे.

महाराज :- ही गोष्ट अवघड तर आहेच, पण जर का साधली तर मात्र मधुर व फारच बहारोची अवस्था आहे. या स्थितीत मी आणि भगवंत एकच होऊन जातात. माऊली म्हणते,

पै आपुलेनि भेदेविण। माझे जाणिजे जे एकपण।
तयाचि नाव शरण। मज येणे गा।। - १८-१३९८

त्यामुळे या शरणागतीतून भगवंताशी व त्याचंच रुप असलेल्या विश्वाशी आपण एकरुप होऊन जातो व अंतिम ऐक्याचा सुखसोहळा आपण उपभोगू

शकतो. पण ही गोष्ट भल्याभल्यांनासुध्दा साधत नाही.

भगवान श्रीकृष्ण द्वारकेत असताना एकदम अस्वस्थ झाले. ही त्यांची चलबिचल रुक्मिणीमातेच्या ध्यानी आली. तिने विचारल्यावर भगवान म्हणाले, "माझी भगिनी द्रौपदी हिच्यावर भरसभेत दुःशासनाकडून वस्त्रहरण होण्याचा मोठा वाईट प्रसंग गुदरला आहे. मला तिला मदत करण्याची इच्छा असूनही जाता येत नाही. कारण अजून तिने दातांत पदर धरून ठेवला आहे. त्याअर्थी तिला माझ्यापेक्षा तिच्या दातांच्या आधाराचा जास्त भरवसा वाटत आहे." इतक्यात तिकडे द्रौपदीने 'कृष्णा धाव' हे म्हणण्यासाठी 'कृ' हे अक्षर उच्चारल्यावर दातातला पदर सुटला. त्याबरोबर 'ष्णा' हे अक्षर पूर्ण होण्याच्या अगोदर भगवान श्रीकृष्ण तिच्या मदतीला धावले व तिला वस्त्र पुरवून तिच्या अब्रूचं व लज्जेचं रक्षण केलं.

मी :- महाराज, एखादा माणूस असं म्हणाला, की अनुसंधान, शरणागती, विवेकशक्ती या गोष्टींची या मार्गात गरज असल्यामुळे मी अगोदर या गोष्टी अंगी बाणवण्याचा प्रयत्न करीन आणि मग नाम घ्यायला सुरूवात करीन. तर ते बरोबर होईल का ?

महाराज :- असं करणं चूक होईल. त्यानं अगोदर नाम घ्यायला सुरूवात करावी. जशीजशी त्याची प्रगती होत राहील, तशातशा या अवस्था त्याला आपोआप प्राप्त होतील. समजा एखाद्या मुलीनं असं म्हटलं की अगोदर मला सासू, सासरे, दीर, जावा, नणंदा, पुतणे हे सर्व लाभू देत, मग मी लग्न करीन. तर ते अशक्य आहे. याउलट तिनं लग्न केलं, तर तिची ही सर्व नाती आपोआप जोडली जातील. म्हणून प्रथम नाम घ्यायला सुरूवात करावी.

मी :- महाराज, शरणागतीनं काय होतं ?

महाराज :- शरणागतीनं मनाला परमशांती लाभते. एका गावात एक मोठी फॅक्टरी होती. तिच्या कुंपणाच्या मुख्य दरवाजाच्या बाहेर एक मोठं झाड होतं. त्या झाडाच्या खाली एक साधू शांतपणे बसलेला सर्वांना दिसत असे. फॅक्टरीचा मालक रोज मोटारीने येई. तेव्हा त्याला असं वाटे, की हा साधू काही कामधंदा का करत नाही ? म्हणून एक दिवस तो साधूला म्हणाला-

मालक :- अरे, तू येथे आळशासारखा दिवसभर बसून काय करत असतोस?

साधू :- महाराज, मी ईश्वराचं स्मरण करत बसलेला असतो.

मालक :- त्यापेक्षा तू काही कामधंदा का करत नाहीस ? मी तुला माझ्या

फॅक्टरीत लावून घेतो. त्यामुळे तुला पैसे मिळतील.

साधू :- मग पुढे काय होईल ?

मालक :- मग तुला रहायला घर मिळेल.

साधू :- मग पुढे काय ?

मालक :- नंतर तुझं लग्न होईल.

साधू :- मग पुढे ?

मालक :- तुला मुलं-बाळं होतील.

साधू :- मग ?

मालक :- अरे, मग मग काय ? या सगळ्यातून तुला आनंद मिळेल.

साधू :- (हसून) अहो महाराज, तुम्ही सांगता तोच आनंद मला इथे काही न करता झाडाखाली बसून ईश्वराचं स्मरण करून मिळत आहे.

यावर मालक निरुत्तर झाला व 'हेचि काय फळ मम तपाला' असं म्हणत फॅक्टरीत गेला.

मी :- महाराज, ही ईश्वराशी एकरुप होण्याची स्थिती यायला किती वेळ लागेल?

महाराज :- हा वेळ, आपल्या पूर्वजन्मीच्या अपु-या वासना, आपण आत्तापर्यंत जमा केलेलं पाप-पुण्य, आपली सध्याची परिस्थिती व आपल्याला असलेली नामस्मरणाची तळमळ इतक्या गोष्टींवर अवलंबून असते. म्हणून आपल्याला तीव्रतम तळमळ असेल, तर या जन्मातच व त्यातसुध्दा लवकरात लवकर ही स्थिती साधकाला प्राप्त होऊ शकेल.

मी :- महाराज, लवकरात लवकर म्हणजे केव्हा ?

महाराज :- नाम घ्यायला सुरूवात केल्यावर अगदी पुढच्या क्षणीसुध्दा.

मी :- बराय, महाराज. आज नामासंबंधी खूप सखोल ज्ञान मिळालं. येतो मी.

महाराज :- ये बरं, व्यवस्थितपणे जा.

-----ooooooo-----



Scanned by CamScanner

# प्रकरण सातवे
# नामधारकाची प्रगती

मी :- महाराज, मी येऊ ना ?

महाराज :- ये, बैस. आज नवीन काय आणलं आहेस ?

मी :- महाराज, गेल्या वेळी आपण मला नामस्मरणाबद्दल खूपच माहिती सांगितलीत. आज आता नामानं प्रगती कशी होते, त्यासंबंधी जरा सविस्तरपणे सांगा.

महाराज :- बरं, समजा तुझ्यासारखा एक सज्जन माणूस, ज्याचा भक्तिमार्गाशी अजून काही संबंध आला नाही, असा माणूस काही मित्रांबरोबर ऑफिसमधून पैसे मिळतात, म्हणून ते घेऊन कौटुंबिक सहलीला गेला व येता येता इतरांनी आग्रह केला म्हणून फॅमिलीसकट गोंदवल्याला उतरला. तिथलं अन्न फुकट कसं खायचं, म्हणून काही देणगी द्यावी यासाठी तो तिथल्या ऑफिसमध्ये गेला. तिथे त्याला कळलं की तीन रूपयांची पावती फाडली, की महाराजांच्या समाधीला आपल्या माळेचा स्पर्श करून पुजारी ती आपल्याला परत देतात व रोज कमीत कमी एक माळ जप करायला सांगतात. अशा रीतीने आपल्याला महाराजांचा नामाचा अनुग्रह मिळतो. तीन रूपयांत अनुग्रह मिळत असेल तर तो का सोडा म्हणून तो तीन रूपयांची पावती फाडून महाराजांचा अनुग्रह घेऊन घरी येतो. घरी येऊन पहातो, तो महाराजांच्या समाधीला स्पर्श करून घेतलेली माळ प्रवासात हरवून गेलेली असते. आता त्याला प्रश्न पडतो की आपण काय करावं? पुन्हा गोंदवल्याला जाऊन त्यांच्या समाधीला स्पर्श करून नवीन माळ आणावी तर तो खर्च आता त्याला स्वतःच्या खिशातून करायचा असल्यामुळे परवडणारा नसतो. बरं, ज्या माळेला समाधीचा स्पर्श झाला, ती तर जप सुरू करायच्या अगोदरच हरवलेली असते. मग सांग, त्याला अशा स्थितीत महाराजांचा अनुग्रह झालेला आहे की नाही ?

मी :- महाराज, तुम्हाला काय वाटतं ? मला तर काही सांगता येत नाही.

महाराज :- अरे, ज्याक्षणी त्याला महाराजांचा अनुग्रह घ्यावासा वाटला, त्याच क्षणी त्याला महाराजांचा अनुग्रह झालेला आहे. ज्याक्षणी त्याच्या माळेने समाधीला स्पर्श केला त्याक्षणीच ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी त्याच्या जीवनाला आतून-बाहेरून परीसस्पर्श केला. त्यामुळे ती माळ गेली की राहिली हा प्रश्नच आता गौण आहे. आता नाम घेण्याचं त्याचं कर्तव्य फक्त बाकी राहिलं आहे.

मी :- (उत्सुकतेनं) पुढे काय होतं महाराज ?

महाराज :- मग महाराजांच्या कृपेनं त्यांच्याच एका मुरलेल्या अनुग्रहीत भक्ताची व त्याची भेट होते व त्यांच्याच सांगण्यावरून तो नवीन माळ विकत घेतो. ती माळ त्याच्या मित्राच्या माळेला, जिला समाधीचा स्पर्श झालेला आहे, अशा माळेला स्पर्श करून नामस्मरणाला सुरूवात करतो. सुरूवातीला काही दिवस त्याचा जप एक माळच होतो.

मी :- यातून त्याची प्रगती होत आहे की नाही हे कसं ओळखायचं ?

महाराज :- या अवस्थेत त्याच्या प्रगतीची खूण अशी, की एकदा नाम घेऊन उठल्यानंतर पुन्हा केव्हा बसेन असं मनाला वाटणं. उदा.- याचा पहिल्या दिवशी आंघोळ झाल्यानंतर एकच माळ जप झाला तरी दिवसभर आज आपण एका चांगल्या गोष्टीची सुरुवात केली याच्या आठवणीने त्याचं मन प्रसन्न राहील, व दुसरे दिवशी त्याचा जप जमल्यास दोन माळा होईल. मग असे काही दिवस गेल्यानंतर त्याच्या मनात असा विचार महाराजांच्याच कृपेने येईल, की आपल्याला रविवारी सुट्टी असते तर त्या दिवशी जास्त वेळ बसावं. मग रविवारी त्याचा जप ८ ते १० माळा सुध्दा होईल. अशी त्याची जपसंख्या एका मर्यादेपर्यंत हळूहळू वाढत जाईल व दिवसाकाठी ठराविक वेळी ठराविक काळापर्यंत जप करण्याची त्याच्या मनाला सवय होऊन जाईल. आता रोज सकाळी एक तास व रविवारी दोन तास अशी त्याला जप करायची सवय लागली आहे. म्हणजेच त्यावेळी बसण्यासाठी त्याला वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत. ही अवस्था काही काळ टिकते.

मी :- मग पुढं काय होतं महाराज ?

महाराज :- मग देवाच्या कृपेनं त्याला कोणाकडून तरी गुरुवर्य बेलसरे यांनी लिहिलेलं गोंदवलेकर महाराजांचं चरित्र वाचायला मिळतं. आता इतके दिवस नामस्मरण झाल्यामुळे त्याला ते विलक्षण आवडतं. मग तो त्याची पारायणं करू लागतो व त्यांचं तत्वज्ञान आपल्या जीवनात आचरणात आणावं असं त्याला वाटू लागतं. त्या दृष्टीनं तो स्वतःच्या जीवनाचं निरीक्षण करू लागतो. त्यात त्याला कामक्रोधादि विकारांच्या रूपाने खूपच उणीवा जाणवू लागतात. आपल्या मनाच्या दुर्बलतेतून या उणीवा निर्माण होतात, हे आता त्याला समजतं व मनाला सामर्थ्य येण्यासाठी नामावर जोर मारला पाहिजे, म्हणजे नामस्मरणाचा वेळ व गुणवत्ता ही दोन्ही वाढवली पाहिजेत, हेही त्याला पटतं.

मग तो सकाळच्या जोडीला संध्याकाळीही १५ मिनिटं जपाला बसू लागतो. नंतर हळूहळू संध्याकाळचा वेळ अर्धा तासपर्यंत वाढतो. काही दिवसानंतर त्याचा तास होतो. म्हणजे आता सकाळी एक तास व संध्याकाळी एक तास अशी त्याची दिवसाकाठी दोन तास साधना होऊ लागते. याच्याच जोडीला तो दिवसभरात जाता-येता थोडासा मोकळा वेळ मिळाला, की नाम घेऊ लागतो. उदा.- तो गाडीतला त्याचा गप्पा मारणारा ग्रुप सोडून देतो व अगोदरच्या गाडीने एकटा जाऊन त्यावेळात तो गाडीतच निवांतपणे डोळे मिटून जप करू लागतो. असा सकाळचा १ तास व संध्याकाळचा १ तास मिळून दोन तास त्याचा जप वाढतो. आता त्याचा जप दिवसाकाठी ४ तास बसून किंवा उभं राहून होऊ लागतो. आता याच्या जोडीला तो दिवसभर जाता-येता मोकळ्या वेळात जप करू लागतो. ही किमया त्या महाराजांच्या चरित्रानं केलेली असते.

नाम घेताना सुरुवातीला जप यांत्रिकपणे होऊन त्याचं मन इतर विचारांत गुंग होऊन जात असे. पण आता विचारांकडे लक्ष न देता नामाकडे जास्त लक्ष दिल्याने विचारांचं प्राबल्य कमी होऊ लागतं व नामात त्याचं मन हळूहळू एकाग्र होऊ लागतं. ही एकाग्रता हळूहळू जास्त वेळ टिकू लागते व त्याचा त्याला आनंद होऊ लागतो. हा आनंदही हळूहळू वाढू लागतो. इथून त्याला नामसाधनेचा खरा आनंद मिळू लागतो. हा आनंद प्रसन्नतेच्या रूपानं त्याला दिवसभर पुरतो.

साधना करत असताना त्याच्या लक्षात येतं की सकाळी किंवा पहाटे खूप शांत असतं. म्हणून तो हळूहळू लवकर उठून साधना करू लागतो. त्याचा परिणाम असा होतो की महाराजांच्या कृपेनं त्याला आता पहाटे चार वाजताच जाग येऊ लागते. कारण आता त्याला दिवसभर काम केलं तरी ५-६ तास झोप पुरेशी होते. म्हणून रात्री ११ला झोपूनसुध्दा त्याला पहाटे ४ ते ६ असे साधना करण्यासाठी दोन तास जास्तीचे मिळू लागतात. आता त्याचं नाम आपोआप चालू रहातं. अशी त्याची क्रमाक्रमाने प्रगती होऊ लागते.

या साधनेचा त्याच्या जीवनावरही हळूहळू परिणाम दिसू लागतो. त्याच्या नजरेतली वखवख कमी होते. मुद्रा प्रसन्न होते. तो शक्यतो दुस-याचं मन दुखवत नाही. त्याचं अवांतर व फालतू बोलणं बंद होतं. तो अगदी कमी पण जे बोलेल ते अगदी गोड असं बोलतो. दुसरा माणूस बोलल्याशिवाय हा बोलणं सुरू करत नाही. कारण याचं आतून नाम चालू असतं. प्रश्नाचं उत्तर देण्यापुरतंच ते बंद होतं व नंतर पुन्हा बोलण्याचा प्रसंग येईपर्यंत पुन्हा चालू रहातं. हा आता आपण होऊन



Scanned by CamScanner

दुसऱ्याच्या नसत्या भानगडीत पडत नाही. घरातदेखील त्याचं बोलणं कामापुरतंच होतं. त्याचं सगळं लक्ष मनात चालणाऱ्या नामावर केंद्रित झालेलं असतं. जरासा एकांत मिळाला की ते लक्ष आतल्या नामावर एकाग्र होऊ लागतं. त्यातून आनंद व त्यातून प्रसन्नता ओसंडत असते. आता विकारांचा पगडा कमी होऊ लागतो. कारण त्याचं मन शांत असतं व ते विकारांशी (सुपरहिट) मुकाबला करण्यास समर्थ असतं. तसंच त्याची बाह्य विषयांच्या मागे लागून सुख मिळवण्याची धडपड कमी होऊ लागते.

मी :- मग पुढे काय होतं ?

महाराज :- महाराजांच्या कृपेनं त्याला वाल्मिकी रामायण किंवा तुळसी रामायण किंवा एकनाथमहाराजांचं भावार्थ रामायण वाचायला मिळतं. आतापर्यंत झालेल्या साधनेमुळे तेही त्याला विलक्षण आवडतं. प्रभू रामचंद्रांच्या सद्गुणांविषयी त्याला आकर्षण वाटू लागतं व रामाविषयी त्याला नितांत प्रेम व आदर वाटू लागतो. मग आपल्या जीवनातही हे सद्गुण यावेत अशी त्याला तळमळ वाटू लागते. म्हणून मग फावल्या वेळात तो रामरायांच्या सद्गुणांचं चिंतन करू लागतो व ते आपल्या अंगी बाणवण्यासाठी प्रयत्न करू लागतो. त्यात त्याचं व्यावहारिक नुकसान झालं तरी आता त्याला चिंता नसते. मग हळूहळू हे सद्गुण त्याच्या अंगी दिसू लागतात.

या सगळ्याचा संयुक्त परिणाम असा होतो की नामसाधना करू लागल्यावर त्याच्या ठिकाणी अष्टसात्विक भावापैकी काही भाव प्रकट होऊ लागतात. उदा.- त्याचा कंठ दाटून येतो, गळ्यातून हुंदके येऊ लागतात, डोळ्यांतून अश्रू पाझरू लागतात, अंगावर रोमांच उभे रहातात, तर एखाद्या वेळी हास्य अनावर होऊ लागतं. 'कंठी प्रेम दाटे। नयनी नीर लोटे।।' अशा तऱ्हेनं त्याची भावयुक्त नामसाधना चालू रहाते. मग या साधनेत तो इतका रंगून जातो, की त्याला स्वतःचा विसर पडू लागतो. यापुढे शारीरिक वेदना त्याला बेचैन करत नाहीत व शारीरिक दुःख त्याला त्रास देत नाही. नंतर त्याला स्वतःची आठवण राहिनाशी होते. मी जप करत आहे किंवा मी नाम घेत आहे ही त्याची भावना लोप पावू लागते. यासंबंधी मी तुला नानामहाराज तराणेकर यांनी सांगितलेली एक भावकथा सांगतो. ऐक.

एका गावात एक निपुत्रिक दशग्रंथी ब्राह्मण आपल्या पत्नीसह रहात होते. घरातच ते संस्कृत पाठशाळा चालवत होते. एकदा सकाळी त्यांच्या घरासमोर एक लहान मुलगी उभी राहून भीक मागू लागली. धुळीनं चेहरा माखलेला.



Scanned by CamScanner

कपडे घाण झालेले, केस पिंजारलेले, पायात काही नाही. ती म्हणत होती, "मी दोन दिवसाची उपाशी आहे हो. मला काहीतरी भीक वाढा." गुरूपत्नींना तिची दया आली. तिला अगोदर त्यांनी पोटभर खाऊ घातलं. मग तिला स्वच्छ करून 'माणसांत' आणलं. तेव्हा तिनं आपली हकिकत सांगितली. तिला तिच्या सावत्र आईनं 'खायला काळ आणि धरणीला भार नको' म्हणून घरातून हाकलून दिलं होतं व ती चालत इथपर्यंत येऊन पोहोचली होती. पोटी मुलबाळ नसल्यामुळे गुरूपत्नींना तिची दया आली व त्यांनी यजमानांना सांगून तिला घरकामासाठी मदतनीस म्हणून आपल्या घरीच ठेवलं. झालं, ती मुलगी त्या आश्रमात रमली. घरकाम करू लागली, पाठशाळा स्वच्छ व पवित्र ठेवू लागली व ती सर्वांची लाडकी झाली. एक दिवस तिने गुरुजींना विनवलं की मलाही एखादा श्लोक शिकवा ना. त्यावेळी गुरुर्जीनी विष्णूसहस्त्रनामातला "शंखभृन् नंदकी चक्री" हा श्लोकार्थ शिकवला. तिला पहिला शब्द तर म्हणताच येईना. व 'नंदकी चक्री' च्या ऐवजी ती 'नंदकी छोकरी' असंच म्हणू लागली. तेव्हा गुरुर्जीनी तिचा नाद सोडला. पण ती एकसारखं जाता-येता, उठता-बसता, काम करताना "नंदकी छोकरी" असा जप करू लागली. तिला त्या "नंदकी छोकरी" चा ध्यासच लागला व त्यात ती स्वतःला विसरून जात असे. त्याचा सुपरिणाम असा झाला की एक दिवस तिने डोळे मिटले असताना साक्षात् भगवान् श्रीकृष्णानी तिला नंदाच्या मुलीच्या म्हणजे "नंदकी छोकरी"च्या म्हणजेच तिच्याच वयाच्या एका दिव्य बालिकेच्या स्वरूपात दर्शन दिलं. त्या अद्‌भुत दर्शनानं तिला परमानंद झाला. यापुढे हे दर्शन तिला नेहमीच होऊ लागलं. नंतर काही दिवसांनी ती छोकरी तिच्यासमोर नृत्य करू लागली. ती केर काढत मागे येऊ लागली, की ही बालिका नाच करत करत पुढे पुढे येत असे. तिने ही गोष्ट कोणालाच सांगितली नव्हती. पण एक दिवस पहाटे ही मुलगी उठून केर काढत होती व गुरुजी कृष्णाचं ध्यान करत होते. तेव्हा त्यांना अचानकपणे नूपुरांचा दिव्य व वेड लावणारा ध्वनी ऐकू येऊ लागला. हा ध्वनी कमी-जास्त होऊ लागला, जणू काही एखादी नर्तिकाच पुढे-मागे होऊन नृत्य करत आहे असं त्या आवाजावरून वाटत होतं. त्या आवाजानं गुरुजी हरखून गेले, पण आवाज कोठून येतो ते कळत नव्हतं. म्हणून त्यांनी या मुलीला विचारलं, "बेटा, तुला कुठे नूपुरांचा आवाज येतो का ?" ती म्हणाली, "हो." गुरूजी म्हणाले, "हा आवाज कोठून येतो बेटा ?" त्यावर ती म्हणाली, "ही काय माझ्यासमोर माझी दीदी नाचतेय ना, तिच्या नूपुरांचा आवाज आहे." गुरूजी अवाक् झाले. त्यांनी विचारलं, "बिटिया, ही दीदी तुझ्यासमोर का आणि



Scanned by CamScanner

केव्हापासून नाचते आहे ?" ती मुलगी निरागसपणे म्हणाली, "मागे तुम्ही नाही का 'नंदकी छोकरी' चा श्लोक शिकवला होतात, त्याचा मी दिवसभर जप करत असे. गेल्या काही महिन्यांपासून मला ही दीदी समोर दिसू लागली. मग ती माझ्यासमोर नाचू लागली. तिच्या पायातल्या नूपुरांचा आवाज आज तुम्हाला ऐकू आला आहे." तेव्हा गुरुजींच्या लक्षात सर्व प्रकार आला व त्यांच्या मनी या मुलीच्या महद्‌भाग्याचं अपार कौतुक दाटून आलं व तिच्या पूर्वजन्मीच्या साधनेची कल्पनाही आली. त्यांनी अधीरपणे तिला विचारलं, "बेटा, तुझी 'दीदी ' मला दिसेल का गं ?" ती म्हणाली, "मी दीदीला विचारून सांगते." दुसरे दिवशी ती म्हणाली, "गुरूजी, दीदी म्हणतेय की तुझ्या गुरुजींना म्हणावं की तुमचा पुण्यसंचय व साधना अजून पूर्ण झाली नाही. म्हणून तुम्हाला या जन्मी माझं दर्शन होणार नाही. पण तुझ्या सत्संगतीमुळे त्यांना आज माझ्या नूपुरांचा अनाहत ध्वनी ऐकायला मिळाला. त्यांना या जन्मी तरी नूपुरांच्या ध्वनीवरच समाधान मानायला सांग." भावसमाधीत गेलेल्या साक्षात नानामहाराज तराणेकरांच्या तोंडून ही गोष्ट ऐकत असता माझ्याही शरीरावर आनंदाचे रोमांच फुलले होते. बरं, ते असो. नामसाधनेत असा भाव असला, की साधकाची प्रगती होत रहाते. मग एका पुण्यक्षणी त्याला असा आतूनच शोध लागतो, की मी ज्याचं नाम घेतो तो देवाचा सगुण अवतार, महाराज दशरथांचा पुत्र राम आणि माझ्यासकट हे विश्व चालवणारा आत्माराम हे एकच आहेत. त्यांच्यात अणूइतकाही फरक नाही. अगदी अणूपासून ब्रह्मांडापर्यंत सर्व काही तो रामच झाला आहे व त्याच्याच संकल्पानं हे विश्व चालतं व माझ्या जीवनाचाही तोच स्वामी आहे. इतकंच काय तर माझ्या जीवनातले आकर्षक व सुखदायक विषय हीही त्याचीच रूपं आहेत. तसंच मला दुःख देणारी माणसं हीही त्याचीच दुसरी रूपं आहेत. मला होणारं सुखदुःख हेही त्याच्याच संकल्पाचं फल असतं.

अणूमाजी राम। रेणूमाजी राम।तृणकाष्ठी राम। वर्ततसे।।
बाहेरी भीतरी। राम चराचरी। विश्वी विश्वाकारी। वर्ततसे।। - परिसा भागवत

राम राम राम अवघेचि म्हणती। कोणी न जाणती आत्माराम।।
राम तो कालचा सुत दशरथाचा। अनंत युगीचा आत्माराम।।
रामासी त्या राम ठावे जरी असता। शरण का जाता वसिष्ठासी।।
तुका म्हणे राम तुझा तुजपाशी। विचारुन घेसी गुरुमुखे।।

- तुकाराम महाराज



Scanned by CamScanner

हे ज्ञान पचनी पडल्यावर मग त्याचा संसाराकडे व विश्वाकडे बघण्याचा दृष्टीकोन हळूहळू अंतर्बाह्य पालटून जातो. त्याचं स्वतःवर जितकं प्रेम असतं, तितकं प्रेम तो विश्वंभर रामावर व त्याच्या विश्वावर करू लागतो.

मी :- महाराज, याच्यापुढे आणखी काही होतं का ?

महाराज :- यापुढे बाह्य विषयातून सुख मिळवण्याची त्याची धडपड आता पूर्णपणे थांबते. कारण नाम घेण्यापूर्वी त्याची सुखाची कल्पना ही अहंकारातून निघालेल्या वैयक्तिक सुखावर अवलंबून असल्यामुळे वस्तूंच्या मालकीवर अवलंबून असलेलं सुख हे तात्पुरतं व क्षणिक असतं हेच त्याच्या लक्षात आलेलं नसतं. पण आतापर्यंतच्या नामसाधनेमुळे आता त्याचं अंतःकरण सुख-दुःखविरहित अशा आनंदाच्या व कृतज्ञतेच्या लहरींनी भरून जाऊ लागतं. आता कृतज्ञतापूर्वक तो देवाचं साधारणतः अशासारखं चिंतन करू लागतो.

हे रामा, तू सर्व-निर्माता, सर्वनियंता, सर्वज्ञानी, सर्वव्यापक आणि आमच्यासारख्या भक्तांसाठी परमप्रेममय असा आहेस. तूच आम्हाला सद्‌गुरूरूपाने मार्गदर्शन करतोस. तुझे उपकार काय वर्णावे आणि कसे फेडावे ? फेडणं अशक्यच आहे.

हे रामा, तूच मला आईच्या उदरात ठेऊन ९ महिने वाढवलंस व सुखरूपपणे या जगात प्रवेश दिलास. माझा जन्म झाल्यावर आईच्या शरीरात माझ्यासाठी दुधाची सोय केलीस व तिच्या मनात माझ्यासाठी प्रेमपान्हा निर्माण केलास. तूच मला तिच्या रूपानं लहानाचं मोठं केलंस, वडिलांच्या रूपानं तूच मला योग्य शिक्षण दिलंस, माझ्यावर सुसंस्कार केलेस व लहानपणी माझा योगक्षेम चालवून अन्नोदकाची व वस्त्रप्रावरणाची सोय केलीस.

हे श्रीरामा, माझं जीवन तुझ्या कृपेनं ओतप्रोत भरलेलं आहे. फार काय माझा श्वासदेखील तुझ्याच कृपेनं चालत असतो. मी खाल्लेल्या अन्नाचं पचनदेखील तुझ्याच किमयेमुळे होत असतं. म्हणून मी तुझा अपार ऋणी आहे.

हे प्रभुराया, जगातील सर्वात बुध्दिमान शास्त्रज्ञांची मती गुंग व्हावी असं सुंदर शरीर आणि कुशाग्र बुध्दी तू मला दिली आहेस. तूच मला ही इंद्रिये देऊन त्यांच्याद्वारा सुखदायक संवेदनांचा रसिकपणे आस्वाद घेण्याची वृत्तीही दिली आहेस. ज्ञान मिळवून ते लोकांना वाटावं, तसंच इतरांना मदत करून जगाचं कल्याण व्हावं असा सुविचार करणारं मन तूच मला दिलं आहेस. तूच मला दया, क्षमा, शांती,



Scanned by CamScanner

मुदिता (आनंद), प्रेम वगैरे भाव निर्माण करणारं हृदय दिलं आहेस. तसंच तूच मला नानाविध कलांचा आस्वाद घेऊ शकणारं रसिक व्यक्तिमत्व दिलं आहेस. मी तुझ्याबद्दल वाटणारी कृतज्ञता कोणत्या शब्दात व्यक्त करू ?

हे रामराया, तूच माझं सर्वस्व आहेस. माझं तुझ्यावर अलोट व निःसीम प्रेम आहे. व्यावहारिक प्रेमाला विरहाचं ग्रहण कधी ना कधी लागतंच, पण तू नाहीस असं कधीच होत नाही. म्हणून माझ्या तुझ्यावरच्या परिपूर्ण प्रेमाच्या चंद्राची सदैव पौर्णिमाच असते. जसा सूर्याला अंधार अज्ञात व अगोचर असतो, तसंच तुझ्यावरच्या प्रेमाला विरह माहितच नसतो. म्हणून या विश्वातल्या तूच धारण केलेल्या सर्वच सुंदर, सजीव व निर्जीव रूपांवर माझं विलक्षण प्रेम आहे. ही तुझी रूपं मला अननुभूत असा अनोखा आनंद मिळवून देतात.

म्हणून तुझं सदैव स्मरण करावं असा मला ध्यास लागतो.

मी :- महाराज, असंच व्यवहारातील कोठल्या गोष्टींचं स्मरण केलं, तर ते परमार्थाला उपयोगी पडेल ?

महाराज :- अरे, त्यासाठीच भगवान् कृष्णानं गीतेत दहाव्या अध्यायात विभूतीयोग सांगितला आहे. मी आता तुला व्यवहारातील विभूतीयोग सांगतो. माणसाला मी आता सांगतो, त्या सर्व गोष्टींचं स्मरण असावं.

१ ) आपल्याला जिवंत ठेवणा-या भगवंताच्या कृपेच्या वर्षावाचं.

२ ) आईच्या दुधाचं, जिच्यामुळे आपण लहानपणी जिवंत राहिलो.

३ ) वडिलांनी दिलेल्या आधाराचं व शिक्षणाचं.

४ ) आजीच्या प्रेमाचं.

५ ) आजोबांच्या कौतुकाचं.

६ ) मुलांच्या लडिवाळपणाचं आणि त्यांच्या विसरून जाण्याच्या वृत्तीचं.

७ ) दादाच्या आपल्याला सांभाळून घेण्याच्या वृत्तीचं.

८ ) लहान भावाच्या आपलेपणानं हट्ट करण्याच्या वृत्तीचं.

९ ) बहीणीनं बांधलेल्या राखीचं आणि ओवाळलेल्या दिव्याचं.

१०) पतीला पत्नीच्या समर्पणाचं आणि अन्नाच्या रूपानं आपल्या पोटात फिरत असलेल्या तिच्या हाताचं.

११) पत्नीला वटपौर्णिमेचं आणि पतीच्या कष्टांचं.

१२) मित्रांच्या सदैव साहचर्याचं.



Scanned by CamScanner

याशिवाय आणखी काही गोष्टींचं नामधारक भक्ताला स्मरण असलं पाहिजे. त्याही आता सांगतो.

१) सदसद्विवेकबुध्दीचं.

२) सर्वत्र व सदैव भगवंत पहाण्याच्या दृष्टीचं.

३) अंतःकरणातील व विश्वातील भगवंतावर प्रेम करण्याच्या वृत्तीचं.

४) भगवंतमय होणा-या चित्ताचं.

५) प्रत्येक क्षण भगवंताच्या स्मरणात अमृतमय होत असल्याच्या ज्ञानाचं व चिंतनाचं.

६) आपल्याला भगवंताचं आकलन होण्याची क्षमता असलेल्या कुशाग्र बुध्दीचं.

मी :- महाराज, या चिंतनातून पुढे काय होतं ?

महाराज :- आता त्याच्या अहंकाराचं निर्मूलन होऊ लागतं.

मी :- महाराज, नामस्मरणाच्या कोणत्या प्रक्रियेनं अहंकाराचं निर्मूलन होऊ लागतं? कारण अहंकार जाणं ही फारच कठीण गोष्ट आहे, असं म्हणतात.

महाराज :- एखादं आकस्मिक संकट आलं व सर्व उपाय थकले की स्वतःच्या कर्तृत्वाची दुर्बलता व आपल्या बुध्दीच्या मर्यादा सामान्य माणसालासुध्दा कळून चुकतात. तसंच नामसाधनेतून आलेल्या याच अनुभूतीमुळे माझ्या जीवनात मी कर्ता नसून रामच कर्ता आहे हे नामधारकाला आतून पटतं. मग त्याच्या अहंकाराला पहिला सुरुंग लागून त्याच्या प्रभावाचे कडे कोसळू लागतात. व त्याची विवेकप्रज्ञा जागृत होऊ लागते. विवेक याचा अर्थ आपल्याला आतापर्यंत असलेल्या सर्व ज्ञानाचा योग्य तो उपयोग करून, परिस्थितीला असलेल्या सर्व बाजूंचा सम्यक् विचार करून अहंकाररहित बुध्दीने घेतलेला निर्णय असा आहे. यासंबंधात माऊली म्हणते-

मज हृदयी सद्‌गुरू। जेणे तारिलो हा संसारपुरू।।
म्हणोनि विशेषे आदरू। विवेकावरी।।

तेव्हा नामस्मरणानं विवेकशक्ती जागृत कशी होते हे पहाण्यापूर्वी अहंकाराच्या वर्चस्वामुळे आपली कृती कशी होते ते प्रथम पाहू या.

बाह्य वस्तूंपासून निघालेल्या कण/लहरी या ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून बुध्दीत पोहोचतात. त्याबरोबर बुध्दीत असलेल्या स्मृतीच्या मदतीने त्या वस्तूंची ओळख पटते. त्याचबरोबर त्या वस्तूचं मोजमाप व तुलना होऊन तिचे विशेष गुणधर्मही बुध्दीत नोंदले जातात. तसंच या वस्तूने आपल्याला पूर्वी सुख दिलं असेल, तर या क्षणी सुखाची वृत्ती आपल्या अंतःकरणात उठू लागते आणि इथून अहंकाराचं कार्य



Scanned by CamScanner

सुरू होतं. हे सुख आपल्याला जास्तीत जास्त वेळ व जास्त प्रमाणात मिळावं असा विचार अहंकारामुळे आपल्या मनात निर्माण होतो व या विचारातून मग आपण प्रयत्न करू लागतो. तसंच या वस्तूने आपल्याला पूर्वी दुःख दिलं असेल, तर या वस्तूला टाळण्याचा प्रयत्न सुरू होतो. कारण आपल्या आयुष्यात दुःखाचा लवलेशही नसावा असं आपल्याला वाटतं. आता या प्रयत्नातून ममत्व, अयोग्य महत्त्व, विकार, वासना वगैरेची साखळी सुरू होते, आणि या सर्व अनुभवांचे बरे-वाईट संस्कार पुन्हा स्मृतीत जातात. ब-याच वेळा असं होतं की आपल्याला हवं ते मिळत नाही व नको असेल ते टळत नाही. यामुळे पुन्हा दुःख होतं. आता आपण सतत नाम घेत असलो की आपल्याला ईश्वराचं स्मरण रहातं व मी व ती सुखमय वस्तू ही दोन्ही ईश्वराची निर्मिती व रूपं आहेत व दोन्ही ठिकाणी ईश्वरी शक्ती काम करत असते (ज्ञानशक्ती व वस्तू-गुणधर्मशक्ती) असं ज्ञान आपल्याला ह्या वस्तूंच्या ज्ञानाबरोबरच होतं. आणि या ज्ञानातून विवेकशक्ती जागृत होऊन मग अहंकारातून विचारांची निर्मिती न होता विवेकातून सुविचार पाझरू लागतात व वस्तूबद्दल आसक्ती किंवा घृणा न वाटता फक्त प्रेम वाटतं. आणि आपलं अंतःकरण सुख-दुःखाच्या वृत्तींनी भरून न जाता ईश्वराच्या प्रेमानं भरून जातं. तसंच एकाच ईश्वरानं शक्तीच्या मदतीनं या सृष्टीतली सर्व रूपं धारण केली आहेत हे समजल्यावर आपला, मी व समोरचं रूप ही दोन्ही वेगळी आहेत, हा द्वैतभाव मावळून जातो व ईश्वरासंबंधी ऐक्यभाव उदयास येतो.

मी :- पण महाराज, आम्हाला तर नेहमी भेदच जाणवतो. ऐक्य कधीच जाणवत नाही. असं का ?

महाराज :- याचं कारण तुमचं लक्ष नेहमी वस्तूंच्या सुख-दुःख देणा-या गुणधर्मांकडेच असतं. त्या वस्तूचं व तुमचं रूप धारण करणा-या ईश्वराकडे असत नाही. मुळात भेद हा तीन प्रकारचा आहे. १) विजातीय- म्हणजे भिन्न गुणधर्म असलेल्या वस्तू. उदा. रेडिओ व टेबल. २) सजातीय- समान गुणधर्म असलेल्या वस्तू. उदा.- एकाच कारखान्यातून तयार होणा-या साबणाच्या वड्या. ३) स्वगत- एकाच वस्तूचे अनेक भाग. उदा.- माणसाचे हात, पाय, डोळे, वगैरे.

मी :- पण महाराज, व्यवहारात या भेदांची गरज आहे की ? नामधारक भक्ताला हा भेद जाणवत नाही का ?

महाराज :- भक्ताला व्यवहार करत असताना फक्त स्वगत भेद जाणवतो. जसं आपल्याला शरीराच्या अवयवांचं काम वेगळं असल्यामुळे एकाचं काम दुसरा

करू शकणार नाही हे समजतं, पण सर्व अवयवांचा नियंता जीव असल्यामुळे सर्व अवयवांत सहकार्य असतं. स्पर्धा अगर संघर्ष कधीही नसतो.

मी :- तो कसा काय ?

महाराज :- (गमतीनं) उदा.- १) एका डोळ्यानं जरी एखाद्या दृश्याकडे डोळेझाक केली व त्यामुळे दुस-या डोळ्याला जरी जास्त काम पडलं, तरी तो पहिल्या डोळ्याकडे काणाडोळा करतो व डोळे वटारून पहात नाही.

२) एका कानात बोळा असल्यामुळे दुस-या कानाला जरी वरिष्ठांचा दम ऐकून घ्यावा लागला, तरी तो कान पहिल्या कानाची कानउघाडणी करत नाही.

३) एका हातानं काम केलं नाही म्हणून दुसरा हात हातचलाखी करून त्याला हातोहात फसवत नाही.

४) एका पायाला जखम झाल्यामुळे दुस-या पायावर चालण्याचा भार पडला म्हणून तो पहिल्या जखमी पायाला पायात पाय घालून पाडत नाही.

५) सर्दीनं एक नाकपुडी चोंदली, तर दुसरी नाकपुडी पहिलीला नाक मुठीत धरून शरण यायला लावत नाही.

पण माणसांच्यामध्ये असलं काही घडलं की ताबडतोब भांडण, झगडा, संघर्ष सुरू होतो.

मी :- महाराज, खरंच की! पण भक्ताच्या बाबतीत असं का होत नाही ?

महाराज :- कारण सर्वांचा नियंता जो ईश्वर, त्याचं त्याला सतत स्मरण असतं. सर्वांभूती भगवद्भाव असणं हा नामसाधनेचा परिणाम आहे हे त्याला आतून पटलेलं असतं. म्हणून तो इतर माणसांकडे ईश्वरानं धारण केलेली जीवांची अनेक रूपं या दृष्टीकोनातून पहात असतो. त्यामुळे प्रत्येक माणसाचं नाव व्यवहारात वेगळं असलं, तरी त्याच्या दृष्टीनं सगळ्यांचं नाव एकच असतं. ते म्हणजे 'जिवाजीपंत सदाशिवराव देव.'

मी :- महाराज, आपल्या परिचयात असं एखादं भक्ताचं उदाहरण आहे का ?

महाराज :- होय. माझ्या ओळखीचे एक गृहस्थ आहेत. ते मूर्तिमंत कृष्णभक्त आहेत. म्हणजे त्यांचं मन सदैव कृष्णाभोवतीच घोटाळत असतं व ते काहीही करत असले, तरी कृष्णाबद्दलचेच भाव त्यांच्या मनात जागृत होत असतात. त्यांची दिनचर्याच तुला सांगतो.

सकाळी जेव्हा ते डोळे उघडतात, तेव्हा आपण गोकुळात जागे झालो आहोत,

असं त्यांना वाटतं. बाहेर पक्ष्यांचा किलबिलाट ऐकून त्यांना असं वाटतं की ही किलबिल शेजारच्या गोवर्धन पर्वताच्या वृक्षराजीत विसाव्याला आलेल्या पक्ष्यांचीच आहे. रेडिओवर मंगलप्रभात चालू असते तेव्हा त्यांना वाटतं की 'उठी उठी गोपाळा' ही भूपाळी यशोदामाता कृष्णासाठी आळवित आहे. ते प्रातर्विधी आटोपतात, तेव्हा त्यांची मनोभूमिका हे शरीर म्हणजे जगन्नाथाचा रथ आहे व त्या रथाची आपण साफसुफीच करत आहोत, अशी असते. ते दूध पितात, तेव्हा यशोदामातेनं आणलेला धारोष्ण गोरसच ते जणू पीत असतात. ते दाढी करत असतात, तेव्हा गोकुळातल्या गाईंसाठी असलेल्या चा-याची कापणी चालू आहे असा त्यांना भास होतो. ते आंघोळीसाठी शॉवरखाली उभे असतात, तेव्हा आपण गोवर्धन पर्वतातल्या धबधब्याच्या जलवर्षावाखाली उभे आहोत, अशी त्यांची भावना असते. ते अंगाला साबण चोळून लावत असतात, तेव्हा आपण कालियामर्दन करतो आहोत, असं त्यांना वाटतं. ते आंघोळ करून आरशात पहातात, तेव्हा आपला खडबडीत चेहरा पाहून ते जणू काही कृष्णकन्हैयाला खडसावून विचारत असतात, की

"कान्होबा तुझी घोंगडी चांगली। आम्हाला का दिली वांगली।।"

ते जेव्हा केसांना तेल लावतात, तेव्हा तैलबुध्दी भगवंताचा स्नेहच जणू आपल्या मस्तकात पाझरत आहे याची त्यांना बालंबाल खात्री असते. ते जेव्हा कंगव्याने काळ्या कुळकुळीत केसांचा भांग पाडतात, तेव्हा त्यांच्या डोळ्यासमोर पुढील प्रसंग येतो. वसुदेवाच्या टोपलीमध्ये नुकतेच जन्माला आलेले बालमुकुंद आरामात पहुडले आहेत. त्यांच्या चरणस्पर्शासाठी यमुना (कालिंदी) आतुर झाली आहे. शेवटी नवजात भगवान आपला पाय टोपलीच्या बाहेर काढून यमुनेची पदस्पर्शाची इच्छा पुरी करतात. मग कालिंदीच्या पाण्याचे दोन भाग होऊन मधून वसुदेवाला वाट मिळते. या प्रसंगाच्या आठवणीने ते स्वतःच भावविभोर होतात. रेडिओवर कोणाचं तरी बासरीवादन चालू असतं, तेव्हा साक्षातं कन्हैयाच्या मुरलीचा त्यांना भास होतो व त्यात ते स्वतःचं भान विसरून जातात. ते जेवणाचा डबा बरोबर घेतात, तेव्हा त्यांना बालकृष्णाबरोबर अंगतपंगत करण्यासाठी गोपबालकांनी (ग्वाल-बाल) घेतलेल्या शिदोरीची याद येते. डोंबिवलीच्या रस्त्यांतल्या गाई पाहून आपण गोकुळातच आहोत याची खात्री पटते. ते गाडीत चढतात तेव्हा श्रीकृष्णाच्या विशाल रथात आपण प्रवेश केला आहे असं त्यांना वाटतं. गाडीचा चालक त्यांना चक्रधारी सारथी श्रीकृष्णासारखा वाटतो. हा विद्युत्-रथ त्या रथासारखाच तेज (फास्ट) असतो. गाडीवर पेंटॅग्राफच्या रूपाने



Scanned by CamScanner

हनुमंत विराजमान झालेला असतो व त्याला चिकटलेली वायर त्यांना मारुतीच्या शेपटासारखी वाटते. गाडीत ते कोणाच्याही भानगडीत पडत नाहीत. कारण 'न धरी शस्त्र करी मी' अशी त्यांची भूमिका असते. स्टेशनवर चढणारांची व उतरणारांची खेचाखेच पाहून त्यांना कौरव-पांडवांच्या सैन्याच्या धुमश्चक्रीची आठवण येते. ऑफिसच्या बिल्डिंगमध्ये शिरताना स्वतः द्वारकेच्या दरबारात प्रवेश करत असल्याची धन्यता त्यांच्या चेह-यावर दिसते. काम करत असताना निष्काम व निरपेक्ष भावनेने कृष्णाने नेमून दिलेले काम आपण कर्तव्य म्हणून करत आहोत असा त्यांचा भाव असतो. साहेबाला माझी चूक नाही हे पटवून देताना त्यांच्या मुखावर 'मैं नही माखन खायो' हा भाव दिसतो. जेवणाच्या सुट्टीत मित्रमंडळींच्या समवेत डबे एकत्र करून जेवताना आपण गोपगड्यांसह 'गोपाळकाला' भक्षण करत आहोत, अशी त्यांची भावना असते. त्यांच्या ऑफिसमधील बायका ऑफिसच्या वेळेतच खरेदीसाठी अपना बझार किंवा भाजी बाजारात जातात, तेव्हा गोकुळच्या गौळणी मथुरेच्या बाजारात खरेदीसाठी चालल्या आहेत, असं त्यांना वाटतं. घरी येताना ते कन्हैयाबरोबर गुरं चारून परत येणा-या गोपबालकाच्या भूमिकेत असतात. आपल्या मित्राच्या घरचा कांदे-बटाटे-पोहे असा पाहूणचार स्वीकारताना त्यांना सुदाम्याच्या पोह्यांची याद येते व पोहे खारट झाले असले, तरी ते कुरकुर करत नाहीत, कारण त्या पोह्यांत दुःखी सुदामपत्नीचे अश्रू मिसळले असतील, असं त्यांना वाटतं. गरीब मित्राच्या घरी जे काही त्यानं पुढं केलं असेल, त्याचा ते विदुराच्या कण्या समजून आनंदाने स्वीकार करतात.

निळं आकाश व निळा सागर पाहून त्या घननीळाची त्यांना आठवण येते. तर झाडांवर चमकणारे पावसाचे थेंब पाहून त्यांना त्या घननीळाच्या मुखमंडलावरील घर्मबिंदू आठवतात. इतकंच काय पण काळी-पिवळी टॅक्सी पाहिली, तरी त्यांना द्वारकाधीशाच्या काळ्या कुंतलांवर पिवळा मुकुट विराजमान झाला आहे असं वाटतं. दूर-दर्शनवर जेव्हा नायक-नायिका एकमेकांना मिठी मारतात, तेव्हा त्यांना -

'हृदया हृदय एक झाले। ये हृदयीचे ते हृदयी घातले। द्वैत न मोडता केले। आपणाऐसे।।
मग सावळा सकंकणु। बाहू पसरोनि दक्षिणु। आलिंगिला स्वशरणु। भक्तराजु जो।। '

या ओव्यांची आठवण येते.

जेव्हा ते झोपतात, तेव्हा गादीच्या रूपानं भगवान श्रीकृष्णाने आपलं अंतःकरणच जणू त्यांच्यासाठी अंथरलेलं आहे, असं समजून त्या हृदयाला जराही धक्का लागू नये, इतक्या हळूवारपणे ते शय्येवर शयन करतात.



Scanned by CamScanner

आणि भगवंताच्या मायेची चादर आपल्या अंगावर ओढून निद्रादेवीच्या कुशीत प्रवेश करतात. आता त्यांच्या देहाची चादर आणि भगवंताच्या मायेची चादर अशा दोन्ही चादरी एक होतात. "चादर हो गयी बहुत पुरानी" आपल्या देहाची चादर जुनी-पुराणी झालेली असते पण प्रेमाची पाखर घालणारी भगवान श्रीकृष्णांच्या मायेची चादर मात्र नित्यनूतन असते.

मी :- (आश्चर्याने) वा, वा, महाराज, असे भक्त फारच दुर्मिळ असतील, नाही ? पण महाराज, नामस्मरण चालू असताना भक्ताच्या मनाच्या अवस्थेत जो बदल होत असतो, त्याचं संतांनी वर्णन केलं आहे काय ?

महाराज :- होय, त्याच्या मनाची अवस्था काही कालाने कशी अंतर्बाह्य बदलून जाते, त्याचं तुकाराम महाराजांनी अभंगात वर्णन केलं आहे आणि विनोबांनी त्याचं स्पष्टीकरण फारच सुंदर केलं आहे. ते तुला सांगतो-

घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे।।
डोळे तुम्ही घ्या रे सुख। पहा विठोबाचे मुख।।
तुम्ही आईका रे कान। माझ्या विठ्ठलाचे गुण।।
मना तेथे धाव घेई। राही विठ्ठलाचे पायी।।
तुका म्हणे जीवा। नको सोडू या केशवा।।

आपल्या सर्व इंद्रियांना तुकाराम महाराज देवाविषयीची कामं सांगताहेत. वाणीनं विठोबाचं गोड नाव घ्यावं. डोळ्यांनी विठोबाचं दर्शन घ्यावं. कानांनी विठ्ठलाचे गुण ऐकावेत. मनानं विठ्ठलाच्या पायापाशी रहावं आणि जीवानं केशवाला सोडू नये, असा याचा साधा सरळ अर्थ आहे. म्हणजे कीर्तन, दर्शन, श्रवण, मनन आणि निदिध्यासन हे भक्तीचे प्रकार महाराज इंद्रियांना शिकवत आहेत. पण या अभंगात महाराजांनी जी सर्वनामं वापरली आहेत, ती फारच सूचक व बोलकी आहेत. साधकाच्या सुरूवातीच्या अवस्थेत अहंकार व ममत्व हेच साधकाला सत्य वाटत असतं. मात्र देव असेलच याची खात्री वाटत नाही. इंद्रियसुखाच्या मागे लागल्यामुळे ती त्याला शाश्वत वाटत असतात. आणि अविनाशी भगवंत त्याला अनिश्चित वाटत असतो. थोडक्यात त्याला भगवंत लांबचा, त्यामुळे अस्पष्ट व धूसर वाटतो व आपली इंद्रिये ही जवळची, त्यामुळे ती मात्र 'माझी' वाटतात, हे तुकाराम महाराजांनी पहिल्या ओळीत सांगितलं आहे.

घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे।।



Scanned by CamScanner

हा पहिला टप्पा ओलांडून साधक थोडासा पुढे सरकतो. तेव्हा ज्या इंद्रियसुखाच्या मागे आपण लागतो, ती शाश्वत नसून तात्पुरती व कालांतराने कमी होणारी व अंती दुःखदायक आहेत, हे त्याच्या लक्षात येऊ लागतं व इंद्रियसुखावरचं ममत्व कमी होऊ लागतं. पण सर्वव्यापी भगवंत मात्र अजूनही आपला किंवा जवळचा वाटत नाही. ही अवस्था दर्शविण्यासाठी ते म्हणतात,

डोळे तुम्ही घ्या रे सुख। पहा विठोबाचे मुख।।

हा दुसराही टप्पा ओलांडून साधक पुढे जातो. तेव्हा मात्र त्याला इंद्रियसुखं लांबची आणि भगवंत मात्र आपला, जवळचा म्हणजे माझा वाटू लागतो. हे दाखवण्यासाठी महाराज म्हणतात,

तुम्ही आईका रे कान। माझ्या विठ्ठलाचे गुण।।

हीही अवस्था कालांतराने ओलांडून साधक पुढे जात असतो. आता इंद्रियसुखाचा ऐलतीर नजरेच्या टप्प्याच्या पलीकडे राहिलेला असतो व भगवंताचा पैलतीर दिसत असतो, जवळ येत असतो. पण तरीसुध्दा अजून मनात किंचित् दुरावा असतो. ही अवस्था वर्णन करताना महाराज सांगतात,

मन तेथे धाव घेई। राही विठ्ठलाचे पायी।।

अजून विठ्ठल तिथे म्हणजे अंतःकरणाच्या बाहेर, मंदिराच्या गाभा-यात असतो. पण ईश्वरकृपेने हीही अवस्था ओलांडली जाते. आणि भगवंत थेट साधकाच्या अंतःकरणात विराजमान होतो. मग तिथलं 'इथं' येतं आणि तो भगवंत 'हा' होतो. म्हणून महाराज शेवटच्या ओळीत म्हणतात,

तुका म्हणे जीवा। नको सोडू या केशवा।।

हे जीवा, अंतःकरणात आलेल्या या देवाला आता बाहेर सोडू नकोस. त्याचं सतत स्मरण ठेव. तुझं अंतःकरण शुध्द ठेव, म्हणजे त्याला बाहेर जावंसंच वाटणार नाही.

दया, क्षमा, शांती। तेथे देवाची वसती।।

दया, क्षमा, शांती तुझ्या हृदयात नित्य वसू दे. हृदयात दया निर्माण झाल्याशिवाय क्षमा येणार नाही व त्याशिवाय मन शांत होत नाही. अशा शांत मनात अखंड समाधान नांदत असतं.

अखंड राहे समाधान। हेचि ईश्वर दर्शन।।



Scanned by CamScanner

मी :- महाराज, साधक नाम घेत असताना त्याच्या दैनंदिन व्यवहारावर काही परिणाम होतो का ?

महाराज :- साधक जर तळमळीने नाम घेत असेल, तर त्याच्या व्यवहारावर परिणाम नक्की होईल. अगदी सुरुवातीला त्याच्या व्यवहारावर दृश्य असा परिणाम दिसणार नाही. पण नंतर साधक जेव्हा स्वतःच्या वागणुकीचं निरीक्षण करू लागतो, तेव्हा त्याच्या लक्षात येतं की इतर सामान्य प्रापंचिक माणसांसारखा त्याचाही व्यवहार अहंकारावर व स्वार्थावर आधारलेला आहे. त्यातून मग त्याचे दोष त्याच्या लक्षात येतात. उदा.- पैसा मिळवण्यासाठी त्याला कधीकधी अप्रामाणिकपणा किंवा लबाडी करावी लागते किंवा स्वतःची चूक छपवण्यासाठी त्याला खोटं बोलावं लागतं किंवा एखादी लोणकढी थाप मारावी लागते. असे अनेक दोष त्याच्या हळूहळू लक्षात येऊ लागतात. एरवी सामान्य माणूस म्हणून यांचं त्यानं समर्थन केलं असतं, पण साधक म्हणून त्याला हे दोष पांढ-या स्वच्छ वस्त्रावरील डागांप्रमाणे खुपू लागतात. मग जसंजसं नामसाधनेनं याचं मन समर्थ व बलवान होऊ लागतं, तसंतसं हे दोष काढण्यासाठी तो प्रयत्न करू लागतो. उदा.- लबाडीच्या बाबतीत गोंदवलेकर महाराज म्हणतात, आपण लबाडी करू नये पण दुस-यानं केलेली लबाडी कळण्याइतकं आपल्याला ज्ञान असावं, म्हणजेच व्यवहारात आपण फसत नाही. मग त्याचे दोष हळूहळू नाहीसे होतात.

यापुढची पायरी म्हणजे स्वतःवर जो विकारांचा पगडा बसतो, त्याची साधकाला जाणीव होऊ लागते व या विकारांच्या विळख्यातून मोकळा होण्याचा तो सतत प्रयत्न करू लागतो. ईश्वराच्या कृपेनं एक दिवस त्याच्या या प्रयत्नांना यश येतं.

नामसाधनेतून जेव्हा सर्वत्र ईश्वर असल्याचं त्याला आतून जाणवू लागतं, तेव्हा त्याचं वर्तन पूर्णपणे पालटून जातं. इतके दिवस तो घेणा-याच्या भूमिकेत असतो तो आता देणा-याच्या भूमिकेत प्रवेश करतो. देणा-याने देत जावं, घेणा-याने घेत जावं. घेणा-यानं इतकं घ्यावं, इतकं घ्यावं, की एक दिवस देणा-याचे हातच घ्यावे. त्याचं यापुढील जीवन, जीवनाप्रमाणे म्हणजे संथ वाहणा-या पाण्याप्रमाणे सागररूपी ईश्वराकडे वाटचाल करत असतं. पाणी ज्याप्रमाणे समोरचा खड्डा भरल्याशिवाय पुढे जात नाही, तसं समोरच्या माणसाच्या अडचणींचं यथाशक्ती निवारण केल्याशिवाय याला चैन पडत नाही.



Scanned by CamScanner

ज्यासी अपंगिता नाही। त्यासी धरी जो हृदयी।
दया करी जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी।

आता त्याची विवेकशक्ती जागृत झाल्यामुळे व्यवहारातील घडणा-या प्रसंगाचं व त्याच्या दोन्ही बाजूंचं पूर्णज्ञान त्याला होतं. त्यामुळे त्याचा जो व्यवहार एरवी स्वार्थावर किंवा फायद्यावर किंवा काहीतरी मिळवण्याच्या कल्पनेवर आधारलेला असतो, तो व्यवहार आता पूर्ण समजुतीवर व प्रेमावर आधारलेला असतो. हा व्यवहार शुध्द अंतःकरणानं केलेला असल्यामुळे उभयपक्षी आनंदाचा ठरतो. यानंतर त्याचा व्यवहार आणि साधना एकच होऊन जातात. आता त्याच्या मते आपल्यातील ईश्वराशी एकरूप होणं म्हणजे साधना व विश्वातील विश्वंभराशी एकरूप होणं म्हणजे व्यवहार.

थोडक्यात सारांश असा की अहंकाराचा लय आणि वासनानाश झाला, की या नामधारक साधकाला मुक्ती मिळते. एकदा एका सद्गुरूंना त्यांच्या शिष्यानं विचारलं, की सद्गुरुनाथ महाराज, मला मुक्ती पाहिजे पण ती मिळत नाही, असं का होतं ? त्यावर महाराज हसून म्हणाले, अरे तुझी मुक्ती 'मला' आणि 'पाहिजे' या दोन शब्दांत अडकली आहे. म्हणजे ती अहंकार आणि वासना यामध्ये गुंतून पडली आहे. म्हणजेच साधकाचा अहंकार गेला व वासना अदृश्य झाली, की जीवाची जी स्थिती असते, तिला मुक्ती असं म्हणतात. या स्थितीत जुन्या वासना संपलेल्या असतात व नवीन निर्माण होत नाहीत.

नामानं विवेकशक्ती जागृत होते, त्याचं एक उदाहरण तुला सांगतो. एक भक्त एका कंपनीत मॅनेजरच्या हुद्यावर काम करत होता. त्याचा एक मित्र आपल्या मुलासाठी कॅरॅक्टर सर्टिफिकेट मागण्यासाठी त्याच्याकडे रविवारी संध्याकाळी गेला. त्यावेळी हा भक्त घरीच आणलेलं ऑफिसचं काम करत बसला होता. मित्राने आपलं काम सांगितल्यावर या भक्तानं आपल्या हातातलं ऑफिसचं काम व पेन बाजूला ठेवलं. स्वतःचं लेटरहेड व वेगळं पेन घेतलं व मित्राला शिफारसपत्र दिलं. यावर मित्रानं त्याला विचारलं, की मला शिफारसपत्र देण्याचे वेळी तू हातातलं पेन ठेऊन दुसरं पेन का घेतलंस ? त्यावर भक्त हसून म्हणाला, की पहिलं पेन त्याला ऑफिसनं ऑफिसच्या कामासाठी वापरायला म्हणून दिलं होतं. पण तुला शिफारसपत्र देणं हे माझं खाजगी काम होतं. माझ्या खाजगी कामासाठी ऑफिसनं दिलेलं पेन वापरणं योग्य नाही, याची मला विवेकशक्तीनं जाणीव करून दिली, म्हणून मी माझ्या पगारातून विकत घेतलेलं पेन वापरून तुला शिफारसपत्र दिलं. हे ऐकून तो मित्र सद्गदित

झाला. तुझ्यासारखी चारित्र्यवान व शीलवान माणसं ज्या कंपनीत असतील त्या कंपनीची भरभराट होईल यात काही नवल नाही. यावर तो भक्त हसून म्हणाला, की बाबा रे, यात माझं कर्तृत्व काही नाही. ही सर्व रामाची कृपा आहे. रामभक्तीतून माझी विवेकशक्ती जागृत झाली आहे.

रामभक्तीवरून आठवण झाली. श्रीरामप्रभूंनी हनुमंताला तुझा माझा खरा संबंध काय आहे हे विचारल्यावर ज्ञानी माणसालाही लाजवील, असं उत्तर त्यानं दिलं होतं. तो म्हणाला,

देहदृष्ट्या तु दासो ऽहम्।
जीवदृष्ट्या तवाँशकम्।
आत्मदृष्ट्या त्वमेवाहम्।
इति मे निश्चिता मतिः।

अर्थ - प्रभू, देहाच्या पातळीवर विचार केला, तर तुम्ही स्वामी आहात व मी तुमचा दास आहे. जीवाच्या बाजूनं विचार केला, तर तुम्ही परिपूर्ण आहात व मी तुमचा अंश आहे व निव्वळ आत्म्याच्या दृष्टीनं विचार केला, तर तुम्ही व मी एकच आहोत असं मला निश्चितपणे वाटतं. केवढं प्रगल्भ तत्वज्ञान या उत्तरात भरलं आहे पहा.

मी :- शेवटी काय होतं ?

महाराज :- अशा त-हेनं ईश्वराशी संपूर्ण एकरूप झाल्यावर भक्ताचं जीवन कृतार्थ व सफल होतं. तो मुक्त होतो व यापुढचं त्याचं उर्वरित जीवन ईश्वरी कल्याणकारक शक्तीकडून 'आत्मनो मोक्षार्थं जगत् हिताय च।' या न्यायानुसार इतरांच्या प्रगतीसाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वापरलं जातं. 'तुका म्हणे आता। उरलो उपकारापुरता।' या स्थितीलाच मुक्ती किंवा नामाने उद्धार होणे असं म्हणतात.

मी :- महाराज, आज आपण या विषयावर इतकं काही ऐकवलं आहे की 'ऐकायाचे ऐकिले। मिळवायाचे मिळवले। आता काही अवशेष न राहिले। ' अशी माझ्या मनाची स्थिती झाली आहे. महाराज, आपण खरोखरच माझं मन निःशंक आणि तृप्त केलंत, याबद्दल मनापासून धन्यवाद.

महाराज :- अरे, माझे कसले आभार मानतोस, तर जो रामाचं नाव घेतो, त्याच्या दरवाज्याशी जन्मभर कुत्रा म्हणून पडून रहाण्याची माझी तयारी आहे असं म्हणणा-या ज्या महात्म्याच्या कृपेनं आपल्याला हा नामसाधनेचा महिमा समजला, त्या गोंदवलेकर महाराजांचे आपण दोघेही आजन्म ऋणी राहू या. कारण हे ऋण



Scanned by CamScanner

न फिटण्यातच आनंद आहे.

मी :- महाराज, आता घरी जाऊन नाम घ्यायला सुरूवात करतो.

महाराज :- तसं कशाला ? नाम घेत घेतच घरी जा ना !

-----००० समाप्त ०००-----

।। श्रीराम ।।



Scanned by CamScanner